# प्रभुतरुण दिवाळी अंक २०१६

## अंतरंग


संपादकीय ४
विस्तारीत संपादकीय- मिनाक्षी जयकर ५
कुरघोडी- सुहासिनी कीर्तिकर ६
रूप पाहता तुझे लोचनी- नलिनी तळपदे ७

### सुहाना सफर

सफर लेह लडाखची- बागेश्री धुरंधर परीख ११
Bhutan: A Journey In The Happy Land- Ketaki Jayakar 16
Nam-Myoho-renge-kyo: Anuradha Desai 20

### छायांची छाया

स्मिता अरविंद राव २३
जान्हवी नील कीर्तिकर २४
अदिती अनिकेत तळपदे २५
श्वेता शिरीष कोठारे २६
शौनक कौशिक जयकर २६
अनिष्का अनिकेत तळपदे २६
अदिती सीमित देसाई २७
मिथील वेलकर २७
विवान श्रीपाद आगासकर २७
श्रिया कौशिक जयकर २७
स्मिता अरविंद राव २९
श्वेता शिरीष कोठारे ३०

**रांगोळी चित्रे-**

मिनाक्षी कौशिक जयकर २८
सुगंधा शिरीष कोठारे २८
बागेश्री योगेन धुरंधर परीख २९

---

Mahim Island & Fort- Sol. Rajan Jayakar ३१
निमूताई- सौ. अलका मिनलकुमार तळपदे ३४
गाणं गोडच हवं - पं. सुजन राणे ३७
खेड्यामधले घर कौलारु-डॉ. मीनाक्षी देसाई ३९
चाळीशी-उज्ज्वल ब्रह्मांडकर ४०
Unwanted Guests- Shubhada Agaskar 43
उरलेलं-राहिलेलं- हेमंत विनायकराव तळपदे ४५
श्री वांच्छा सिद्धीविनायक गणेश मंदिर-गौरांग कीर्तिकर ४७

### गुण गाईन आवडी

माझी नेमबाजी- वैजयंती विश्वास अजिंक्य ४८
जिवलग सखी- मृदुला जोशी ५१
Father Figure To Me- Achala Subhash Desai 54
An Unsung Hero- Vinod Pradhan 56
माझी मुलगी- अपर्णा उदय कीर्तिकर ५७

---

अपंगत्व: एक आजार की अवस्था- प्रणिता प्रभाकर ५९
Log Kya Kahenge: Mihika Navalkar 61
बाल्कनीतून- नंदकुमार विजयकर ६३
लेट लतिफ - कल्पना कोठारे ६६
कन्या- शैलेश विजयकर ८१

### छोट्या-मोठ्यांकरिता

चुटपूट- डॉ. सुमन नवलकर ७०
आरती कोठारे ७३

**कविता:-**

विजयश्री नवलकर, सुहासिनी कीर्तिकर, उज्ज्वल ब्रह्मांडकर, नेहा दळवी, कल्पना कोठारे, हेमंत तळपदे

Superstition- Pooja Mandar Kothare
If Cricket is Religion... Rohan Talpade 56

**वात्रटिका:-** डॉ. सुमन नवलकर

**व्यंग्य / हास्यचित्रे -**

प्रदीप कोठारे
सुहासिनी कीर्तिकर
नंदकुमार विजयकर

---

प्रभुतरुणासाठी देणग्या, प्रभुतरुणाची डायरी, ज्ञाती संस्थावृत्त इ.
भाऊबीज,
**मुखपृष्ठ:** श्रीनल कोठारे

तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?

# प्रभुतरुण

दिवाळी अंक

मूल्य रुपये दहा

( स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

संपादिका : **सुहासिनी कीर्तिकर**

www.prabhutarun.com

कार्यकारी संपादक मंडळ:
**मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

सहाय्यक संपादक:
**त्वरिता दळवी, भक्ती शेटये, राजेश नवलकर**

**वर्ष ५० वे)** **ऑक्टोबर २०१६** **(अंक ४**

# संपादकीय

**सुहासिनी कीर्तिकर**

'प्रभुतरुणा'चे आधीचे काही दिवाळी अंक दिवाळी साजरी झाल्यानंतर देव दिवाळीत निघाले. काही ऐन दिवाळीत! यंदाचा अंक मात्र सोळा ऑक्टोबरला म्हणजे अश्विनी पोर्णिमेला साहित्याचं चांदणं घेऊन प्रसिद्ध होत आहे. किती छान! आदल्या रात्री कोजागिरी अन् दुसऱ्या दिनी आपल्या ज्ञातीतील कलाकार, साहित्यिकांच्या प्रतिभेचं चांदणं ल्यालेला मधुमासी 'प्रभुतरुण' दिवाळी अंक - शिवाय दिवाळीची सुकडी करायलाही थोडी फुरसत असताना असा अंक फुरसतीनं वाचायला हाती असणं; आनंदाची दिवाळीच जणू. या अंकात किती अन् काय काय आहे हे आपली कार्यकारी संपादिका मिनाक्षी जयकर सांगणारच आहे. इतकेच सांगते की हा अंक विविधतेनं नटलेला, आनंदाला भरती आणणारा असा समृद्ध आहे. नेहमीप्रमाणेच.

आनंदाला भरती आलीय आणखी एका कारणानं. चतुरंग प्रतिष्ठानचा 'जीवनगौरव पुरस्कार' यंदा डॉ. सदाशिव गोरक्षकरांना जाहीर झालाय. त्यांच्या कर्तृत्वाची श्रीमंती जाहीर करायला त्यांना स्वत:ला आवडत नाही. पण आम्हाला आमचा आनंद जाहीर करताना आम्हीच श्रीमंत झाल्यासारखं वाटतंय. रत्न स्वत: कोंदण शोधत फिरत नाही, ते आपसूक लाभतं. रत्नाचा शोध घेतला जातो - 'रत्नंही अन्विष्यते तत्।' तसं 'जीवन गौरवा'चं कोंदण पद्मश्री डॉ. गोरक्षकांना शोधत आलं आहे. येत्या डिसेंबरमध्ये ते लाभेल. पण त्याआधीची आपली सर्वांची दिवाळी या बातमीने अधिक आनंदाची असणार आहे. त्या आनंदात 'प्रभुतरुण' परिवार सामील आहेच. मित्रहो, 'प्रभुतरुण' दिवाळी अंक वाचताना हा आनंदही त्यात विरघळून जाईल, 'आनंदाचे डोही आनंद तरंग' निर्माण करेल.

'प्रभुतरुणा'च्या सर्व हितचिंतकांना, लेखक/कलावंतांना, वाचकांना या आनंदाची साक्ष ठेवून

मन:पूर्वक शुभेच्छा. अन् हो! जाहिरातदारांनाही हार्दिक शुभेच्छा; त्यांचे आभार. दरवर्षी 'भाऊबीज' जमा करणाऱ्या सौ. प्रतिमा प्रधानांना आभार मानलेले कदाचित आवडणार नाही. जाहिराती, भाऊबीज यामुळे दिवाळी अंक प्रकाशनाचे आर्थिक गणित सोडवणे सोपे होते. जाहिरातींसाठी प्रणव देसाई, नंदकुमार विजयकर, बन्सी धुरंधर यांनी हातभार लावला. त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करते. कृतज्ञतेचीही एक संस्कारसमृद्धी असतेच.

ही समृद्धी जपत, राखत तुम्हा सर्वांना पुन्हा एकदा शुभेच्छा. येणारं नववर्ष तुम्हा सर्वांना सुख, शांती, समाधानासह समृद्धीचं जावो!

*

# विस्तारीत संपादकीय

**- मिनाक्षी जयकर**

नाट्यसंगीत ही महाराष्ट्राची रंगभूमीला दिलेली देणगी. त्याचप्रमाणे आणखी एक परंपरा खास महाराष्ट्राशी निगडीत आहे - दिवाळी अंकांची. त्याच परंपरेला अनुसरून यंदाचा 'प्रभुतरुणा'चा दिवाळी अंक आम्ही आपल्या हाती देत आहेत.

'प्रभुतरुणा'च्या यंदाच्या दिवाळी अंकाचं मुखपृष्ठ सजवलंय श्रीनल कोठारे यांनी. या अंकामध्ये ज्येष्ठा-श्रेष्ठांपासून अनेकांचे वेगवेगळ्या प्रकारचे लेख आणि कथा समाविष्ट आहेत. या लेखांमध्ये करमणूकीबरोबरच काही विचार करायला लावणारेही लेख आहेत. काही शैलीदार प्रवासवृत्तं आहेत. एकांकिका आहे. बालसाहित्य विभाग डॉ. सुमन नवलकरांच्या सिद्धहस्त लेखणीनं नटला आहे. तऱ्हेतऱ्हेची छायाचित्रं आहेत. चित्रांमधली विविधता तर किती सांगू! रंगाकृती, रेखाचित्र, रांगोळी चित्र, छोट्या मोठ्यांच्या शिल्पाकृती! या सगळ्या आनंदात भर घालणाऱ्या कविता आहेत. तोंडी लावणं म्हणून डॉ. सुमन नवलकरांच्या वात्रटिका आहेत. आणि त्याच्या जोडीला भर पडली आहे ती नेहमीप्रमाणे प्रदीप कोठारेंच्या व्यंगचित्रांची. यावर्षीच्या अंकात मात्र प्रदीप कोठारेंच्या जोडीने नंदकुमार विजयकर आणि प्रा. सुहासिनी किर्तीकर यांचीही व्यंगचित्रं आहेत. (तशी प्रा. सुहासिनी कीर्तिकरांची व्यंगचित्र प्रभुतरुणाच्या वाचकांसाठी काही नवीन गोष्ट नाही. विहंग नायक संपादक असतानाच्या काळात जेव्हा त्यांनी पहिल्यांदा आपली व्यंगचित्र प्रभुतरुणासाठी दिली तेव्हा प्रदीप कोठारे म्हणाले होते, की कदाचित प्रा. सुहासिनी किर्तीकर या पहिल्या परभू महिला व्यंगचित्रकार असाव्यात.)

तर असा हा २०१६ सालचा 'प्रभुतरुणा'चा दिवाळी अंक. दिवाळीची सुकडी अधिक खुसखुशीत, चमचमीत करणारा. गौरी-गणपती, नवरात्रीनंतर येणारा वर्षातला शेवटचा मोठा सण - दिवाळसण. या सगळ्या सणावारांच्या धांदली - गडबडीनंतर श्रमपरिहार करण्यासाठी या बहुढंगी अंकाची नक्कीच मदत होईल. 'प्रभुतरुणा'च्या या वैविध्यपूर्ण अंकाला हातभार लावणाऱ्या सर्व लेखक, कवी, चित्रकार, शिल्पकार, जाहिरातदार, हितचिंतक आणि अर्थातच सर्व वाचक यांना दिवाळीच्या मन:पूर्वक शुभेच्छा. येणारं नवं वर्ष आपणां सर्वांना सुख-समृद्धीचे, भरभराटीचे जावो ही सदिच्छा.

एकांकिका

# कुरघोडी

**✶ सुहासिनी कीर्तिकर ✶**

[**पात्रे** : उर्मी (बंडखोर, आधुनिक विचारांची)
अनुरेष (उर्मीचा साथीदार / नवरोबा) - टोपण नाव : अनु
विक्रम (उर्मी, अनुरेषचा मित्र)- टोपण नाव : बुभूक्षित ऊर्फ 'बुभू']

**दृश्य** - पडदा उघडल्यावर मंच रिकामा. सकाळची वेळ दर्शविणारा सौम्य प्रकाश. नंतर बेडरूमचा पडदा सारून उर्मी येते. मॉड. अस्ताव्यस्त. आळसावलेल्या सुरात-

उर्मी : विक्रम, विक्रम (प्रतिसाद नाही)

विकी : बुभू, काही घेणार? (??)बुऽऽभू (??)
(चमत्कारीक शांतता. मग किचनमधून अनुरेष येतो. हातात तीन चहाचा ट्रे.)

अनुरेष : गुडमॉर्निंग उर्मी.

उर्मी : अरे, तू काल रात्री येणार नव्हतास ना? कधी आलास? अन्... हे काय? चहा? एकदम तीन कपं?

अनुरेष : आय सेड गुड मॉर्निंग. मला गुडमॉर्निंग नाही केलंस? चहा हातात असून? काऽऽ ते फक्त त्या बुभूक्षितालाच?

उर्मी : (थोडीशी विरमून...) अं. तसं नाही. पण समोर एकदम तू अन् चहा दोन्ही आलं ना! आधी कुणाला 'विश' करावं कळलं नाही. तुला की चहाला?

अनुरेष : अरे! मला वाटत होतं की बायको म्हणजे मनकी बात; दोघांनाही एकदमच 'विश' करेल. एकाच वेळी मी अन् बुभू... (पॉझ) सवय आहे तुला दोघादोघांची.

उर्मी : (एकदम उसळून...) मी... मी चहाविषयी बोलतेय तर तुझ्या डोक्यात काय वळवळतंय? हं?
(अनुरेष सरळसरळ दुर्लक्ष करत बेडरूममध्ये जातो. विक्रमला कसंबसं उभं करत घेऊन येतो. विक्रम भेलकांडत सोफ्यावर आडवा.)

अनुरेष : बुभू... बुऽऽभू. (कपातला चहा त्याच्या तोंडावर मारत -) चऽऽहा! पहा, पहा, चऽऽहा!
(विक्रम आता मात्र धडपडून जागा होतो. अनुरेषकडे पहात -)

बुभू : अरे! यार मित्रा! अनुरेषा - चहाची चहा काय वर्णू मी वाचे? तुला मी आशीर्वाद देतो वत्सा. तुला अख्खी उर्मी लाभू दे.

उर्मी : (उसळून!) व्हॉट डू यू मीन बाय इट? मी त्याचीच आहे. कळलं? त्याचीच. (पाय आपटत टेबलाशी खुर्चीवर बसत उगाच टेबललॅम्प उघडबंद करत म्हणते-) काय? पडतोय का प्रकाश?

बुभू : होऽऽ! अगदी उज्जेड पडला बघ. अरे अनु, तुला सांगतो - काल हिनं... हिनं मला बोलावून घेतलं. बघ. अजून एक गंमत बघ. तू एखाद्या सालस बायकोसारखा चहा घेऊन आलास. बेडरूममधनं मला उठवलंस. मालकाला उठवावं तसं. अन् उर्मी बघ एखाद्या मांजरीसारखी फिस्कारत म्हणतेय काय; तर म्हणे मी अख्खी अनुचीच आहे.

अनुरेष : (अगदी थंडपणे-) चहा घे. थंड होतोय.

विक्रम : (आकांडतांडव करीत-) चहा घे? थंड होतोय? व्वा! अन्या, किती 'थंड' रे तू! माझा... माझा राग नाही येत तुला?

उर्मी : बुऽऽभू, तुला आम्ही 'बुभू' का म्हणतो? मी

नव्हे; आम्ही बरंका; आम्ही! चांगलं विक्रम नाव तुझं. पण स्वत:च्या सॉफ्टवेअर कंपनीचा विक्रम मोडीत काढत तू बुभूक्षितासारखा हिचा, तिचा वास घेत फिरतोय्स. हुंगेगिरी किती करावी हं? हलकट, मूर्ख अन् बुभूक्षित. आमचा मित्र तू! वर तोंड करून अनुरेषलाच म्हणतोयस 'कित्ती थंड तू!'

(बोलता बोलता ती अनुरेषजवळ जाते, चहाचा कप घेऊन घोट घेते.)

क्या बात है! अन्या, चहा गरम आहे बरं का. छान.

अनुरेष : उर्मी बच्चा, अजून हवा का? आता बुभू काही घेणार नाहीच. हो!

अन् तुला 'वॉश' घ्यायचा असेल नं?

(बुभू काही न कळून पाय आपटत बेडरूमकडे जातो.)

(मुद्दामच मोठ्ठ्याने-) अगं, वॉशसाठी तुझे कपडे काढू का? म्हणजे कपाटातले गं!

(बुभूने जोरात दार आपटल्याचा आवाज.)

मला प्रश्नच पडतोय - तुझा नवरा कोण आहे? हं उर्मी; कोण?

मी की (बेडरूमकडे नजर वळवून, टाळी वाजवत-) तो बुभूक्षित?

उर्मी : (मोठ्ठ्यानं.. अनावर हसत...) नवरा? नवऱ्याचं काय सांगतोयस्? अरे, नवरा म्हणजे कोऽऽण?

अनुरेष : (किचनमध्ये जात आतूनच..) कोण? सांग, सांग प्राणनाऽऽथ; नवरा म्हणजे तरी कोण?

उर्मी : (त्याच तालात) सांगते सांगते प्राणनाऽऽथ
जो घेतो हातात हात
करतो वरण भात
देतो सतत साथ
तोच माझा नवरा
फिरेल गरागरा

अनु : (आतूनच) ......... अच्छा?

उर्मी : मला हवा तेव्हा पहा
देतो करून चहा
पाणी काढून, कपडे काढून
जो करतो तयारी

अनु : (आतूनच) आंघोळीची!

उर्मी : (हसत) हाऽऽ हाऽऽ हाऽऽ
आंघोळीची
तोच माझा नवरा
करीत नाही नखरा

अनु : (आता अनुरेष बाहेर येत -) ए, माझ्या नखऱ्याच्या पोरी, पुरे झालं. (सहेतूक बेडरूमकडे बघत-) काय गं? काम झालं का?

उर्मी : (खाजगीतला आवाज काढत) झालं? झालं का काय विचारतोस? शंभर टक्के झालं. त्या बुभुक्षिताबरोबरचं सगळं सगळं... अगदी सऽऽगळं कॅमेऱ्यानं टिपलंय. तो अगदी उधाणला होता.

अनु : (तिला टाळी देत) - आता बोंबल म्हणावं. त्याची सगळी प्रॉपर्टी गेली बाराच्या भावात. आपण ताणून धरायचं. त्याची सगळी कंपनी अब्रुनुकसानीसाठी घशात घालायची... हाऽऽ हाऽऽ. मी थंड काय? आता बघ... तू कसा थंड पडत जातोयस ते!

(संवाद चालू असतानाच बेडरूमच्या पडद्याआड 'तो' उभा. नीटनेटके कपडे केलेला. बुभू उर्फ विक्रम. अचानकच मग पुढे येत...)

बुभू : (उपरोधाने) सॉरी, सॉरी, सॉरी. नवरा बायकोच्या प्रेमळ संवादात मी पडू नये खरं तर. पण उर्मी अख्खी तुझीच उरलीय का अनुरेष? हं? कॅमेऱ्याचं शूटींग मला कळलंच नाही असं वाटतंय तुम्हाला? एका बिझिनेसमनला? हाऽऽ! मोठ्ठा विनोदच.

(अनु अन् उर्मी चकीत. बुभू पुढे बोलतच आहे...)

अरे! अनु; तू घराबाहेर. मी अन् उर्मी आत बेडरूममध्ये. विक्रम नाव आहे माझं. बुभूक्षित वगैरे वाटत असलो ना; तरी कंपनी काय उगाच उभी नाही केली मी. डोकं आहे या धडावर. उर्मीचा लाडेलाडे बोलणारा फोन आला ना; तेव्हाच 'प्रॉफिट लॉस'चं गणित गेलं मेंदूत माझ्या. म्हटलं, चला; धडा शिकवूया तुम्हाला.

'फ्लेशकरन्सी' वापरता काय? उर्मीबरोबरचं सगळं संभाषण मी रेकॉर्ड केलंय. मी 'नाही, नाही' म्हणत असतानाच उर्मीनंच मला फुसलावलंय. गंमत ऐकायचीच पुढची? हे 'रेकॉर्डेड' संभाषण मी माझ्या पोलीस मित्राला कल्पना देऊन त्याच्याकडे 'सेफ' ठेवलंय. रम्या आठवतो का रे आपला? तो पोलिसात असतो सध्या. इन्स्पेक्टर झालाय.

अरे, चार पाच सेकंद पुरुषानं स्त्रीकडे रोखून पाहिलं तरी स्त्रीचे अत्याचारी शोषण होते असा कायदा आलाय. अन्या, तुला मला सर्वांनाच माहित्येय रे! पण एखाद्या स्त्रीनं पर पुरुषाला एका रात्रीसाठी आपल्या बेडवर घ्यावं; हा काहीच गुन्हा नाही?

हं, उर्मी; 'मी अख्खी अन्याचीच आहे' या वाक्याला आता काही अर्थ आहे का?

अन्या; माझी कंपनी गिळायला बसलात तुम्ही. रात्रीची माझी 'कंपनी' कशी होती, विचार ना उर्मीला? काय? आता कुणाचा चेहरा थंड पडणार आहे?

हां! बाकी तू (शेल्फकडे बोट दाखवीत-) पुस्तकं छान जमवलीस हं.

(उर्मीकडे वरपासून खालीपर्यंत हात दाखवत-) हे 'पुस्तक'ही मी वाचलं बरं का.

(सोफ्यावर बसत) थकलो बुवा. अन्या; चहा आणतोस!

(उर्मी - अनुरेष मागच्या प्लॅटफॉर्मवर संथपणे समोरासमोर, जवळजवळ येतात. दारावरची बेल वाजते.) एक कप आणखी आण बरं का. रम्याच आला असेल बहुतेक.


('सांग, सांग प्राणनाऽऽथ'ची हलकी धून वाजत रहाते.)

पण नकोच रे तो नवरोबाचा चहा. चला; बाय... बाऽऽय.

(धून वाजत असतानाच मंचावर
हलके हलके अंधार.)

*

## हास्यचित्र



**लेख**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# रूप पाहता तुझे लोचनी

**✶ नलिनी तळपदे ✶**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

पुरुषाच्या काळजाचा ठोका चुकवणारा तुझा हा उंच उंच जाणारा झोका सांगतो ना तुझ्यात झालेला बदल. तुझ्यात बदल होणं ही काळाची गरज होती. किती सफाईनं सोडवलंय तू हे काळ, काम, वेगाचं गणित. तुझा कामाचा आवाका आणि उंच उंच जाणारा झोका. त्यातच सळसळत्या उत्साहानं सणवार साजरे करण्याची हौस; पाहूनच मन थक्क होतं.

जमिनीला पाय लावल्याशिवाय उंच झोका घेता येत नाही याची जाणीव ठेवून अनेक विधायक कार्यात तू गुंतून राहिली आहेस. माझ्या दृष्टीनं तू झमगमगणारी तेजाची शलाका आहेस. अंगभूत कर्तृत्वानं लखलखणारी हिरकणी आहेस.

शिवाय सर्वप्रथम तू एक स्त्री आहेस.

स्त्रीच्या ठिकाणी असलेली सावधानताच अशी व्यवधानं लीलया पेलू शकते.

तुझ्यातल्या तेजाची, प्रतिकाची, आत्मविश्वासाची जाण तुला आलीच आहे. आकाशात उंच भरारी घेण्याइतकं बळही तुझ्या पंखात आलं आहे. पुरुषाच्या बरोबरीनं हक्क मिळवून समाजात तुझ्या यशाची कमानही तू चढती ठेवली आहेस.

कर्वे, आगरकर, फुलेंच्या सुधारणेचा, शिक्षणाचा वारसा पुढे चालवणाऱ्या तुम्ही सावित्रीच्या लेकी.

तुमची पाठ थोपटायला माझे आठ हातही अपुरे पडतील. अशा चकीत होऊ नका थांबा -

तुमचा नारीशक्तीचा जागर पाहून प्रभावित झालेली मी बोलतेय् अष्टभुजा अंबा!

मी माहेरवाशीण गौराई म्हणून तुमच्या घरी येते तेव्हा माझ्या तीन दिवसांच्या वास्तव्यात कुठेही उणं राहू न देण्याची तुम्हा सासुरवाशिणींची धडपड मला नेहमीच लुभावून टाकते. तरीही मला वाटतं तुमच्या पाठी कामाचा इतका व्याप असताना कशाला हा घोळ घालता? परिस्थितीनुसार रुढी परंपरांना मुरड घालायला हवी. तसा तुम्ही मनोभावे केलेला नमस्कारही मला पोहोचणार आहे. कारण भाव तिथे देव असतोच. मी दुर्गा आहे, तशीच शान्ताही आहे. खरोखर 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हती' पासून 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवता' पर्यंतचा तुमचा प्रवास प्रत्यक्ष काळानंही तुम्हाला लवून मुजरा करावा असा आहे.

धन्य आहे तुझ्या दुर्दम्य इच्छाशक्तीची, जिद्दीची, निर्धाराची.

तुम्ही शास्त्रज्ञ आहात, तंत्रज्ञ आहात, वैज्ञानिक आहात, वैमानिक आहात, कार्यकुशल तर आहातच. शिक्षण, कला, क्रीडा, साहित्य, पर्यावरण, अनाथ अपंगत्व पुनर्वसन, समाज प्रबोधन; असं एकही क्षेत्र नाही जिथे तुमच्या कर्तृत्वाची मोहोर उमटली नाही. शिवाय घराची ओढ आहेच. तिथेही पैपाहुणे, नातीगोती, सणवार सगळं सांभाळून गृहिणींची कर्तव्य पार पाडता. तुझी ही मनोहारी रुपं कुणाच्याही काळजाचा ठाव घेणारी आहेत. साक्षात्, बुद्धीदाता गणेशही ज्यांनी दिलेल्या वरदानाचा तू केलेला सुयोग्य विनियोग पाहून भारावून गेला आहे.

स्वत्व, स्वाभिमान, स्वावलंबनाचा त्रिशूल हाती घेऊन हे तेजस्विनी, ज्या आत्मनिर्भरतेने आपल्या दमदार पावलांनी अंगावर चालून येणाऱ्या संकटांना गाडून टाकतेस ते पाहून मी आदिशक्ती पार्वती, जगन्माता, सीमन्तीनी तुझ्या रूपात प्रतिबिंबीत झालेलं माझं रूप प्रसन्नतेनं न्याहाळते आणि मला जाणवतं; माझ्याहून तू निराळी नाहीसच!

✳

# आधुनिक अक्षरलिपी (स्पष्टीकरणासह....)

सुहासिनी अशोक कीर्तिकर



# MAHIM ISLAND & FORT

✶ Solicitor Rajan Jayakar ✶

The history of Pathare Prabhus in Bombay starts from Mahim Island. In the late 13th Century, the second son of King Ramdev of devgiri, Raja Bimb after captivating Sopara and Salasette came to Bombay, which was then a group of seven Islands and established his capital temple of his patron-goddess Prabhavati, now called Prabhadevi Temple. Alongwith Raja Bimb, came four communities viz. Pathare Prabhus, Chaukalshis, Panchkalshis and Palshikar Bhahmins. In around 1296, Bimb constructed a palace for himself and various mansions for his ministers viz. Rajguru Purshotam Kavle, Prime Minister Srinivas Mahadev, Patangrao Nyayadhish, Chitnavis Chandrabhan Prabhu and others on the Island of Mahikavati.. According to famous historian of the 19th Century Gerson D'Cunha feels that Raja Bimb was a Pathare Prabhu. He also established a Court of Justice on the neighbouring Island, Parel - Matunga, which was then called Nyaygaon, where he sat in Court and dispensed justice. Over the years the said word Nyaygaon, got corrupted and became Naigaum which exists today near Dadar. Mahikavati was of great importance for protection of the Bombay Island, since the enemy attack could come from the north i.e. Salsette island, on the southern tip was Bandra. After the Bombay Islands were taken over by the Sultan of Gujarat sometime in 1348, a Pir called Baba Makhdoom came to Bombay and stayed on Mahim Island and after his demise, a Dargah was construced in his name and which over a period of time has been extended and became a place of pilgrimage for the residents of Bombay Island. After the Portuguese took over the Bombay Island sometime in 1534, they realized the importance of Mahim Island and constructed a small fort to prevent direct attack from Salsette on the Bombay Island and since they also had captured Salsette, they started charging ships passing through the narrow opening between Mahim and Bandra. The said Fort over a period of time had seen various attacks by different forces including shivaji. At the time of handing over of Bombay Islands to




**Map of Bombay Islands - 1300**

the British, as part of dowry pursuant to the marriage between catherine of Braganza of Portugal and the English King Charles II in 1662, Mahim Fort was in a very dilapidated condition and S.M. Edwardes, the famous British Historian in his book ''Rise of Bombay'' remarked that Mahim was the strongest place held by East India Co. in India. The importance of Mahim Fort was realized by East India Co. when they were given lease of the Bombay Islands by the British Crown in 1668. The second Governor of East India Co., Gerard Aungier, decided to construct new forts and restore the existing forts on the northern periphery of Bombay including Worli Fort, Mahim Fort, Dharavi Fort, Rewa Fort, Sion Fort and Sewri Fort. In around 1701, English Officer Lieutenant Shaw undertook the task of reconstruction of Mahim Fort. The famous brick-laying expert Durren was called from England to lay the foundation stone of reconstruction, which the help of local masons by making some changes as per requirement. The Fort was rebuilt in 1702 and became ready for withstanding invaders. Durren ensured that proper quality of stone was used so that the Fort would stand firmly on the sandy bed, as the Fort was on Mahim Beach. The shape of the Fort is square and had three bastions. It also had Officer's quarters with attached garden and also a mezzanine for storage of ammunition. The area around the Fort was heavily spiked to prevent intruders from invading the Fort through shallow sea waters.

In 1739, Marathas had conquered Salsetter (Sasthi - 60 villages), from the Protuguese. Realising that the Mahim Fort was likely to be attacked by the new occupants of Salsette, the President of the Board of East India Co. sanctioned additional expenditure to ensure that Mahim Fort was well guarede. Mahim Fort was the symbol of British Military, might & pride. The



**Mahim Fort - 1860**


Custom House was set up inside the Fort and all the vessels passing through the Channel between Mahim and Bandra were checked at Mahim. After the war of 1818, the Maratha power diminished and the Fort became redunadant as there was no chance of any local or foreign power attacking Bombay Island particularly after the heavy defeat at the hands of East India Co. by the Mutineers in 1857-1858. In around 1920 the Collector's Office was set up in the Mahim Fort and a Custom Officer also lived in the Fort, almost upto 1960, when all offices were shifted. Sometime in 1980's, a portion of the upper sotrey of the Fort, on seaside, caved in and created a big apperture in the Fort wall and thereafter it was declared unfit for human habitation. It is only thereafter that massive encroachment of smugglers, drug peddlers and slum dwellers, took place and now it is almost impossible to enter the Fort and the roof has given way. It is supposed to be a ''protected monument'' under the Ancient Monument and Archaeological sites Act and it is duty of the Government to not only restore the dilapidated portion but to remove all the encroachment. However successive Governments have taken no steps in that direction and Raja Bimb must be turning in his grave, at the sight of a major relic of his, once prosperous capital.

## वात्रटिका

### जीवनगौरव

म्हणे मोठा साहित्यिक, वर्षाला पुस्तक नवं,
लेखणी तेच लिहायची, जे वाचकांना हवं.
लिहून-लिहून संपला एकदा लेखणीचा खेळ,
'जीवन गौरव पुरस्कार' द्यायची आली वेळ.

**-डॉ. सुमन नवलकर**




**Mahim Road - 1900**


SURGICAL STRIKES IN PAKISTAN
आतंकवादीयों को सजा देना
सिर्फ अल्ला का काम है।
— डॉ. झाकिर नाईक
लेकिन उन्हे अल्लाह तक
पहुंचाना हमारी जिम्मेदारी है।
— इंडियन आर्मी

With Best Compliments from:

# MICROTROL

## STERLISATION SERVICES PVT. LTD.

Kripalani Estate, Saki Vihar Road, Mumbai-400072
Tel. 91-22-28570097, 98 Fax: 91-22-28572938
E-mail: info@microtrol-india.com

कथा

# निमूताई

**★ सौ. अलका मिनलकुमार तळपदे ★**

आईला भेटून घरी परतले. चावीने दरवाजा उघडला तर दारात पोस्टकार्ड पडले होते. आजच्या मोबाईल युगात हे पोस्ट-कार्ड, तेही माझ्या नावे. माझे मलाच 'आऊट-डेटेड' असल्यासारखे वाटले. कोणाचे आहे हे!

पाहिले तर निमूताईचे पत्र होते. फक्त एका ओळीत 'यावर्षी गणपतीसाठी तुझ्याकडे चार दिवस विज्याला घेऊन येते आहे'' ''बापरे!'' माझ्या तोंडून नकळत उद्‌गार निघाला. यांनी तो ऐकला व माझा उतरलेला चेहरा पाहून म्हणाले, ''काय गं! काय झालं?'' मी यांना पत्र दाखवले.

''अगं, येऊ दे की मग. बऱ्याच वर्षांनी येत आहे. जरा हसून स्वागत कर.'' त्यांच्या या शब्दांनी मन भूतकाळात पाठी, बऱ्याच पाठी गेले....

निमूताई आमची चुलत बहीण. एकत्र कुटुंबात आम्ही सर्व चुलत, आतेभावंडं सख्ख्यासारखी रहात होतो. एकूण आम्ही चार बहिणी, चार भाऊ व दोघे मामे भावंडं अशी दहाजणं. निमूताई सर्वात मोठी आणि आमचा म्होरक्या. तिच्या डोक्यातून एक एक गमतीशीर गोष्टी निघत आणि आम्ही सर्व तिला साथ देत असू. ताई-माई, भाऊ-दादाबरोबर बालपण अगदी मजेत गेलं. पण आम्ही जसजसे मोठे होत गेलो तसे एक एक जण शिक्षण, नोकरी, लग्न या निमित्ताने नियतीने ठरवलेल्या मार्गांनी पांगू लागलो. निमूताई मात्र होती तिथेच होती. आजी नेहमी म्हणत असे, ''निमे! कसलं घाणेरडं नशीब घेऊन आली आहेस, कुठेतरी उजवं असावं.'' त्यावेळी आजीचा राग यायचा. पण आज त्याचा अर्थ कळत होता. निमूताईच्या पत्रिकेत मंगळ आणि शिक्षण, रूपही सुमार. सगळ्या बाजूने नकारघंटा. तोपर्यंत आम्ही सर्व शिक्षण घेऊन, लग्न होऊन संसाराला लागलो होतो. बऱ्याच प्रयत्नानंतर निमूताई बोहल्यावर चढली पण चाळीशी झाल्यावर आणि भाओजींनी पन्नाशी गाठलेली. पण 'गंगेत घोडं न्हालं' म्हणत सर्व खूष होते.

बिचाऱ्या निमूताईच्या आयुष्यात थोडेतरी सुखाचे क्षण आले. एक दिवस बातमी आली, निमूताई गरोदर आहे.

''काय? या वयात?'' असे म्हणत सर्वांच्या भुवया उंचावल्या. निमूताईला मुलगा झाला. तिने आवडीने त्याचे नाव 'रवीराज' असे ठेवले. त्यातली दोन अक्षरे घेऊन ती त्याला लाडाने 'विज्या' बोलत असे. लहान असताना निमूताईचा विजा खूप रडायचा. बिचारी निमूताई रात्रभर त्याला मांडीवर घेऊन शांत करण्याचा प्रयत्न त्रागा न करता करायची. आम्ही सर्व भावंडं तिला सल्ला देत असू. 'अगं दोन थपडा लगावून दे म्हणजे बसेल गप्प' पण त्या माऊलीने त्याला कधीही हात उगारला नाही.

विज्या जसजसा मोठा होत गेला तसतसा आम्हाला त्याच्यातला वेगळेपणा जाणवू लागला. तो नॉर्मल मुलासारखा दिसायचा; पण नव्हता. तो जेव्हा बोलू लागला तेव्हा त्याचं असंबद्ध बोलणं सर्वांना खटकायचे; पण निमूताईला ते कधीच जाणवले नाही. जेव्हा त्याचे शाळेत नाव घालायचे वय आले तेव्हा तिला ते नाईलाजाने मान्य करावे लागले. शेवटी ती डॉक्टरकडे जाण्यास व त्याच्या सर्व 'टेस्ट' करून घेण्यास तयार झाली. सर्व टेस्ट करून तोच निष्कर्ष निघाला ज्याची आम्हाला भीती होती. त्याच्या मेंदूची वाढ मंद गतीने होती. निमूताई मनातून कोसळली. तिच्या दुर्भाग्याने परत उसळी मारली. सिविअर आर्ट अटॅकनी भाओजी गेले. जणू तिच्या जीवनातला आनंद, हसू सर्व घेऊन गेले. आम्ही सर्व

भावंडं जिथून मिळेल तिथून अशा मुलांच्या शिक्षणासंबंधी, संस्थांसंबंधी माहिती, पत्ते, फोन नंबर देत होतो. सुरुवातीला ती त्याला घेऊन जात असे. पण पुढे काही नाही. कारण ती त्याला 'मतीमंद' मानायला तयार नव्हती. शेवटी ते आईचे काळीज होते. आम्ही सांगून सांगून दमलो. जेव्हा जेव्हा आम्ही भावंडं भेटत असू तेव्हा निमूताईचाच विषय निघे आणि निमूताईच्या रडण्याने तो संपे.

शेवटी कंटाळून निमूताईने मुंबईची जागा विकली आणि ती कोल्हापूरला लहान जागा घेऊन राहू लागली. आम्हाला कुणालाच ही गोष्ट पटली नाही. पण आम्ही कोरडी सहानुभूती सोडून काहीच करू शकत नव्हतो. यातून एक चांगली गोष्ट झाली ती म्हणजे भविष्याची तरतूद करण्यासाठी तिच्या गाठी पैसा आला होता. आम्ही वर्षातून एकदा वाढदिवसानिमित्ताने भेटून येत होतो. कधी लग्नकार्यात ती येत होती. प्रत्येकवेळी दोघांच्याही आकारात व वजनात वाढ झालेली कळत होती. निमूताईला स्वत:ला गोड खायची खूप आवड आणि त्यात लेकाचे लाड किती करू, किती नको असे तिला वाटे. तिच्या तब्येतीची काळजी आम्हाला वाटे. पण प्रत्येक गोष्टीत तिला टोकणेही रास्त वाटत नव्हते. आम्ही सर्व दुरूनच चौकशी करत होतो.

एकेदिवशी तिच्या शेजाऱ्यांनी दादाला फोन केला. निमूताई चक्कर येऊन पडली होती. तिला माईल्ड अटॅक आला होता. आमच्या घरातलं आवरून, तिकीट मिळून जाता जाता आम्हाला दोन दिवस लागले. तोपर्यंत शेजाऱ्यांनी तिला हॉस्पिटलमध्ये ॲडमीट केलं होतं. तिला आयसीयूमध्ये ठेवलं होतं. बातमी कळल्यावर सर्वात प्रथम विचार आला तो विज्याचा. काय केलं असेल त्यानं एकट्याने? डोक्यात विचारांचे काहूर घेऊन मी व दादा कोल्हापूरला गेलो. आम्हाला पाहिल्याबरोबर धावत आला व मिठी मारून म्हणाला, 'माझ्या आईला बरं करशील ना?' त्याच आवेगात मीही त्याला जवळ घेऊन म्हणाले, 'हो रे बाबा, तुझी आई लवकर बरी होईल' पण दुसऱ्या क्षणी मनात आले - ''हे लचांड माझ्या गळ्यात पडले तर!' पण मला माझ्या कोत्या मनाची लाज वाटली. ज्याला आम्ही वेडा समजत होतो तोच खरा शहाणा निघाला. तोच पुढे म्हणाला, 'मी एकटा राहीन आणि आईला सांभाळीन.' आमच्या येण्याने त्याच्या चेहऱ्यावरचं भीतीचे सावट कमी झालेलं दिसलं. दादा मला म्हणाला, ''सुमे, तू याला घेऊन घरी जा व काहीतरी खायला दे. मी जरा डॉक्टरांना भेटून येतो.' दादाला नाही बोलायची शामत नव्हती. नाईलाजाने त्याला घेऊन निघाले. विज्याला एकटीने हँडल करायचे दिव्य पार पाडायचे होते. छातीत धडधडत होते. पर्समध्ये निमूताईचा पत्ता लिहून आणला होता. मी तो पर्समधून काढेपर्यंत विज्याने रिक्षा थांबवून त्याला घराचे नाव पत्ता सांगून मला बसण्यासाठी हाक मारत होता. निमूताईचे घर थोडं लांब होतं. जाता जाता विज्या मला कोल्हापूरची ओळख करून देत होता! आम्ही इथून हे आणतो, तिथून ते आणतो. ही आमची बँक आणि हे आमचे फीश मार्केट. इथे आम्ही हे खातो आणि तिथे आम्ही देवळात जातो. अशी ही ओळख नॉन-स्टॉप चालूच होती. तेवढ्यात घर आले आणि विज्याने रिक्षा थांबवायला सांगितली. तो खाली उतरला. पैशाचा व्यवहार मात्र त्याला कळत नसावा कारण ते काम त्याने माझ्यावर सोपवले. मी त्याला विचारले, ''अरे! घराची चावी कुणाकडे असते?'' तर त्यानं खिशातून चाव्या काढून दिल्या. मी म्हटलं, ''दे मी उघडते'' पण त्यानं त्या दिल्या नाहीत, स्वत:च लॅच उघडले व घरात गेला. मला 'ये' म्हणाला आणि दार बंद केले. नंतर पटापट एखाद्या सराईत गृहिणीप्रमाणे दोन दिवसांचे पडलेले पेपर उचलून जागेवर ठेवले. खिडक्या उघडल्या, पंखा लावला. कचऱ्याची पिशवी खाली सोसायटीच्या मोठ्या डब्यात नेऊन टाकली. कपडे धुवायला टाकले. कपाटातून कपडे काढून आंघोळीला गेला. मी नुसती 'आ' वासून त्याला पाहात होते. कुठून सुरवात करावी हेच कळत नव्हते.

आंघोळीहून आल्यावर त्याने धुतलेले कपडे कपाटातून काढून घातले, देवाला अगरबत्ती दाखवून पाया पडला. हे सर्व पाहून मी पुतळ्यासारखी उभी होते, निशब्द.

तेवढ्यात बेल वाजली. शेजारची बाई त्याच्यासाठी चहा बिस्किटं घेऊन आली होती. तिला पाहून विज्या म्हणाला, ''आंटी, माई-मावशी आली. ती आता आईला बरं करील'' ती शेजारीण म्हणाली, ''हो का! बरं तू चहा-बिस्कीटं खा. मी तुझ्या मावशीसाठी चहा आणते.''

## वात्रटिका

### चुकीची दुरुस्ती

एक पंखा फारच फिरायचा हळू,
मेकॅनिकचा हात लागताच पंखा लागला पळू.
पळता-पळता पंखा आता वाजवतो बंदूक,
सगळे म्हणतात, 'नको बाबा वाऱ्याचं सूख'.

**-डॉ. सुमन नवलकर**

विज्या लगेच म्हणाला, 'पण आंटी चहामध्ये साखर एकच चमचा घाला. तिला जास्त गोड चहा आवडत नाही.'

आता बाकी अटॅक येण्याची पाळी माझी होती. माझी एवढी नगण्य सवयही या बापड्याच्या मंद-बुद्धीने टिपली व लक्षात ठेवून योग्यवेळी सांगीतली होती. असेच धक्के खात खात एक आठवडा निघून गेला. वास्तविक विज्याला सांभाळायला मी आले होते, पण प्रत्यक्षात तोच मला सांभाळत होता. या थोड्या दिवसात वेगळाच विज्या माझ्या समोर साकारत होता. मुंबईहून येताना आम्हाला वाटत असलेल्या भीतीचा लवलेशही त्याच्या तोंडावर दिसत नव्हता.

निमूताई मात्र खूपच घाबरली होती. एका अटॅकनी तिला भविष्यातल्या संभाव्य धोक्याचे चित्र दाखवून दिले होते. बहीण-भाऊ झाले तरी कुणीही कायमची जबाबदारी घेणार नाही हे कटुसत्य तिला स्वीकारावंच लागलं. खूप रडली. म्हणाली, 'त्याचवेळी तुमचं ऐकलं असतं तर आज तो स्वावलंबी असता. खरंच त्याची काहीतरी सोय करायलाच हवी. माझ्यामागून त्याचा संभाळ करेल अशी संस्था पहायला हवी.'

दादा म्हणाला, 'फक्त त्याचाच नाही तर तुझा सुध्दा.'' कारण डॉक्टरांनी निमूताईला सांभाळायला व पथ्य-पाणी करायला सांगितले होते.

दादानी धावपळ करून 'आधार' या संस्थेत त्या दोघांची व्यवस्था लावून दिली. तिथे निमूताईला समवयस्क मैत्रिणी मिळणार होत्या आणि विज्याला पद्धतशीर स्वावलंबनाचे शिक्षण. सही करण्यापुरता लिहायला, वाचायला शिकला असता तरी खूप होते. सर्व व्यवस्था लावेपर्यंत एक महिना लागला. तोपर्यंत निमूताई पूर्ण बरी झाली होती. आम्हालाही आमच्या संसाराची काळजी सतावू लागली होती.

दोघांना तिकडे सोडून आलो तेव्हा निमूताई खरं म्हणजे तेवढी खूष दिसत नव्हती. पण आम्ही मनावर दगड ठेवून जो निर्णय घेतला होता तो त्यांच्याच हिताचा होता.

कुणावरही अवलंबून न रहाता स्वावलंबनाने जगण्याचा. या गोष्टीला वर्ष होऊन गेले. मधल्या काळात आमच्यापैकी कुणी ना कुणी जाऊन खबर घेत होतोच. पण निमूताईने स्वत:हून कधीच फोन केला नाही. आज अचानक तिचे एक ओळीचे पत्र! त्यातल्या रिकाम्या जागेत तिच्या मनातला ठासून भरलेला राग तर नसेल? हाच विचार करत करत गणपतीचा दिवस उजाडला. बाप्पाच्या आगमनाची तयारी करता करता माझे कान दरवाजावरच्या बेलकडे होते. विज्याची जोरजोरात बेल वाजवण्याची सवय लक्षात होती. मी त्याच बेलची वाट पहात होते. अचानक हलकीशी बेल वाजली. ही काही विज्याची बेल नाही अशा विचार करतच मी दार उघडले. तर दारात सडपातळसा तरुण व त्याच्या पाठी साठी ओलांडलेली पण काटक अंगकाठीची एक बाई. मला निशब्द बघून तीच ओरडली, 'सुमे, गधडे' आत या तरी बोल.'' गधडे, या शब्दांनी मी भानावर आले आणि 'निमूताई तू!' असे आश्चर्याने ओरडत तिला मिठी मारली.

दोघांमधला हा आमूलाग्र बदल फारच सुखकारक होता. निमूताई समाधानी दिसत होती. तिचा राग गेला होता. संस्थेच्या शिस्तबद्ध जीवनाचा परिणाम त्यांच्या शरीरावरही दिसत होता. मनं व शरीरं दोन्ही स्वस्थ दिसत होती. माझे हात हाती घेऊन म्हणाली, ''तुम्हा सर्वांमुळे आज मी निश्चिंत जीवन जगत आहे.'' तिच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि समाधान पाहून मी अगदी तृप्त झाले. या वर्षीचा गणपती बाप्पा मला खरोखरच 'सुखकर्ता - दु:खहर्ता' ठरला होता.

*


Fun **workshops** for groups and **corporate offices** on de-mystifying wine, whisky, beer, cocktails, mocktails & more by **Shatbhi Basu**, Indias's foremost beverage consultant and mixologist.
Her easy style, wit and irreverent approach makes even the most difficult to understand subjects, simple!
Cocktail bar
Shatbhi Basu
STIR
ACADEMY OF BARTENDING
shatbhi@gmail.com
www.shatbhibasu.com


20% OFF
kromakay
artists at work since 2000
AVAIL A 20% DISCOUNT ON PERSONAL HAIR & MAKEUP
FOR FURTHER DETAILS CONTACT:
02226462015/02226465644/ 9820359702
Facebook: Kromakay Salons & Academy |
Instagram: kromakaysalon & kromakaymakeupdiaries |
Twitter: @kromakaysalon
*Terms & Conditions Apply

लेख

# गाणं गोडच हवं

**★ पं. सुजन राणे ★**

दिवाळीसारख्या सणी नवे कपडे घालण्यात किंवा निरनिराळे गोड खाद्यपदार्थ खाण्यात जसा आपण आपला आनंद व्यक्त करतो त्याप्रमाणे एखादं गोड गाणं ऐकण्यातसुद्धा आपला आनंद द्विगुणीत होतो हे स्वाभाविक आहे. दिवाळीच्या दिवशी पहाटेस एखादं गोड भजन कानावर पडलं तर तो आनंद वेगळाच असतो. उदाहरणार्थ पं. भीमसेन जोशी यांचं भजन 'माझा भाव तुझे चरणी' किंवा छोटा गंधर्वांचं भजन 'बोलू ऐसे बोल जेणे बोले विठ्ठल डोले'. या भजनांत अवीट गोडवा आहे आणि तो अवर्णनीय आहे. तर हा गोडवा एखाद्या गाण्याला अमर करून जातो. लोकं कित्तेक वर्षं, किंबहुना कित्तेक पिढ्या ते गाणं गुणगुणत फिरत असतात. अशा वेळी, गाणं हे गोडच असावं या संदर्भात मला माझे विचार मांडावेसे वाटतात.

पुरषोत्तम दारव्हेकरांचं नाटक 'कट्यार काळजात घुसली' नं काही वर्षांनंतर पुन्हा एकदा लोकांच्या आवडीचा उच्चांक गाठलङ महाराष्ट्रात आणि अमेरिकेत काही शहरात लोकांची गर्दी पाहण्यासारखी होती. याचं मुख्य कारण त्यातलं प्रभावी संगीत, पण विशेषतः 'घेई छंद मकरंद'. त्या नाटकातल्या हिंदू गवयानी (प्रसाद सावकार यांनी) सादर केलेलं शांत लयीतल गाणं. तेच गाणं मुसलमान गवयानी (वसंतराव देशपांडेंनी) फार तडफदार पद्धतीने सादर करूनसुद्धा गोडव्याच्या बाबतीत मागे पडते. अगोदरच्या गाण्यातला गोडवा हृदयाला एकदम भिडतो. मागे वळून पाहिलं तर तसा गाण्यातला गोडवा आपल्याला छोटा गंधर्वांच्या गाण्यात सापडतो. १९५० ते १९७० या काळात त्यांनी नाट्यगीतांच्या गाण्यातला गोडव्याचा कळस गाठला होता असं म्हणावं लागेल. 'दिलरुबा मधुर हा दिलाचा', 'सुखवी तया संसारा' 'रजनीनाथ हा नभी उगवला' 'छळी जीवा दैव गती' 'प्रिये पहा रात्रीचा समय सरुनी' अशा त्यांच्या अनेक गाण्यांनी मराठी मनावर अधिराज्य केलं. अजूनसुद्धा कितीतरी गाणारे आपल्या मैफिलीमध्ये ही गाणी न चुकता सादर करीत असतात व तोच त्यांच्या गोडव्याचा पुरावा आहे. त्याच्याअगोदर बालगंधर्वांनी म्हणजे १९०५ ते १९३० काळात लोकांना त्यांच्या गोड़ नाट्यगीतांनी वेडं केलं होतं. सौभद्र नाटकातील 'वद जाऊ कुणाला शरणा ग', संशय कल्लोळमधील 'संशय का मनी आला' व 'मजवरी तयांचे प्रेम खरे', मूकनायकमधील 'उगीचका कांता गांजिता' तसंच मानापमान नाटकातील 'खरा तो प्रेमा', 'मला मदन भासे हा' 'मी अधना', स्वयंवरमधील 'नाथ हा माझा'. 'मम् आत्मा गमला', 'नरवर कृष्णा समान' 'अमृतची गोपाला' व शेवटी एकच प्यालामधील 'दया छाया घे', 'सत्य वदे वचनाला' व 'प्रभू अजी गमला', ही नाट्यगीतं ऐकावी म्हणजे गाण्यातला गोडवा याला किती महत्त्व आहे हे स्पष्ट होते. तो काळ माझ्या जन्माच्या अगोदरचा असल्याकारणाने मला त्या बाबतीत अधिक बोलण्याचा अधिकार नाही असं म्हणावं लागेल. पण त्याच काळात किराणा घराण्याचे अब्दुल करीम खान यांचं गाणं इतकं गोड व भावनाप्रधान होतं की तसं गाणं पुन्हा होणं कठीण आहे. त्यांचं स्वर्गीय गाणं ऐकण्याचं भाग्य मला लाभलं नाही कारण ते बालगंधर्वांचे समकालीन होते, परंतु त्यांची किराणा गायकी शिकण्याची संधी त्या घराण्याच्या जेष्ठ गवयाकडून, पं. फिरोझ दस्तुरांच्याकडून मिळाली ही ईश्वरी कृपा असावी. मला सांगायला विशेष अभिमान वाटतो की ते माझ्या गुरूंच्या गुरूंचे गुरू होते. माझे गुरू प. फिरोझ दस्तूर होते व त्यांचे गुरू सवाई गंधर्व होते, तर सवाई गंधर्वांचे गुरू अब्दुल

करीम खान होते. गाण्यातला गोडवा याचं प्रतीक अनुभवायचं असेल तर अब्दुल करीम खानच्या ध्वनिमुद्रिका 'गोपाला मेरी करुणा क्यू नही आवे', 'पिया बिन नाही आवत चैन', 'पियाको मिलनकी आस' या ऐकाव्यात. त्यात त्यांनी गोडव्याची सीमा गाठली आहे. सिनेसंगीताच्या प्रांताबद्दल बोलायचं तर कुंदनलाल सैगल यांचं गोड व हृदय हलवणारं गाणं अप्रतिम होतं. त्यांच्या 'मैं क्या जानू क्या जादू है' (चित्रपट-जिंदगी १९४०), 'बाबूल मोरा' व 'अय कातिबे तकदीर मुझे इतना बता दे' (चित्रपट स्ट्रीट सिंगर १९४४) 'चाह बरबाद करेगी हमे' व 'जब दिलही तूट गया' ( चित्रपट -शाहजहान १९४५) ह्या ध्वनिमुद्रिका ऐकल्यावर असं वाटतं की ईश्वरानी त्यांच्या गळ्यात असा काय गोडवा किंवा आर्तता ठेवली होती की ऐकणाऱ्याच्या डोळ्यात पाणी आल्याशिवाय राहत नाही. त्यांच्या गाण्याचा प्रभाव इतका होता की त्यांच्यानंतरचे गाणारे सी. एच. आत्मा, मुकेश आणि तलत मेहमूद त्यांची नक्कल करण्यात स्वत:ला धन्य समजत. मोहमद रफी, तलत मेहमूद आणि लता मंगेशकरांनी याच गुणाने लोकांच्या मनाचा ठाव घेतला आणि सिनेसंगीत अजूनपर्यंत जीवंत ठेवलं आहे. त्यांच्या अनेक गोड गाण्याची यादी इथे देणं कठीण आहे. परंतु इथे नमूद करावं लागेल की या संगीतातल्या गोडव्याचं पुष्कळसं श्रेय नौशाद, अनिल बिश्वास, खेमचंद प्रकाश, गुलाम हैदर, गुलाम मोहमद, सी. रामचंद्र, खय्याम व रोशन अशा संगीतदिग्दर्शकांना द्यावं लागेल. त्यानंतरच्या पार्श्वगायकांनी ही जबाबदारी कितपत सांभाळली आहे हे वादग्रस्त आहे. अर्थात् काळाप्रमाणे हे संगीत बदलत गेलं आहे आणि ते त्या प्रवाहात वाहत गेले आहेत असं म्हणायचा मोह होतो. गझल या गाण्याच्या प्रकारात बेगम अख्तर उर्फ अख्तरीबाई फैझाबादी यांच्यासारख्या गझला अजून कोणी गाऊ शकत नाही असं मला वाटतं. त्यांचा गोडवा आणि आर्तता त्यांच्या गझलांत इतकी ओतप्रोत आहे की तो त्यांचं खासगी जीवन प्रतिबिंबीत करतो. त्यांच्या गझला 'ऐ मोहब्बत तेरे अंजामपे रोना आया', 'हमको मिटा सके जमानेमे दम नही' 'ये ती हमारी किस्मत, के विसाले यार होता' त्यांच्या उंच स्वरात, तंबोऱ्यात घुसणाऱ्या आवाजात ऐकल्या की हृदयाला पीळ पडतो. वाटते की, या बाईच्या आवाजात ईश्वरानी इतकं दु:ख भरून ठेवलं आहे की त्याची खोली अजमावता येत नाही, पण ते दु:ख सादर करताना त्या त्यांच्या गाण्यातला गोडवा विसरत नाहीत हे सर्वात महत्त्वाचं आहे.

'गोडवा' ही कुठल्याही गाण्याची प्रमुख बाजू आहे. तेव्हा त्यातली तांत्रिक बाजू याला दुय्यम स्थान देणं हे क्रमप्राप्त आहे. म्हणजे लय, ताल किंवा सरगम हे घटक तितके महत्त्वाचे नाहीत. गाणं पद्धतशीर करण्यासाठी त्यांचा उपयोग केला जातो. जर त्यांनी गाण्याच्या गोडव्यावर कुरघोडी केली तर कुठलंही गाणं जिवंत न राहून ते टिकत नाही. अब्दुल करीम खान म्हणायचे 'ताल गया तो बाल गया लेकिन सूर गया तो सर गया'. वरील गाणी नीट ऐकली तर आपल्याला आढळते की जलद लयीला, तालाला किंवा गाण्यात सरगम म्हणायला महत्त्व दिलं गेलं नाही. जिथे सरगम म्हटलं आहे ते केवळ गाण्याच्या गोडव्याला पूरक म्हणून म्हटलं गेलं आहे. हिराबाई बडोदेकर किंवा भीमसेन जोशी यांच्या ध्वनिमुद्रिकेत सरगमचा उपयोग मुळीच आढळत नाही. गेल्या काही वर्षांत विशेषत: शास्त्रीय गाण्यात सरगमचा व अति जलद लयीचा भरमसाट उपयोग केला गेला आहे. असं वाटते की ते गवई त्यांचं गाणं लोकांच्या हृदयाकडे पोहचवण्यापेक्षा त्यांचं पांडित्य किंवा तय्यारी दाखवण्याच्या खटपटीत आहेत. गोडव्याच्या संदर्भात, ६०व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनात छोटा गंधर्वाचे अध्यक्षीय भाषणातले (२३ फेब्रुवारी १९८०) बोल लाखाचे आहेत. ते बोलतात, ''संगीत दिग्दर्शकांनी आपली विद्वत्ता व ज्ञान दाखविण्यापेक्षा आपले संगीत नाटकाला परिपोषक कसे होईल याकडे जास्त लक्ष देणे आवश्यक आहे. मला जुन्याचे प्रेम व नव्याचे आकर्षण आहे. तरीही असे म्हणावे वाटते की जुने ते जुनेच राहू द्या. दुसरे नवे जरूर करा. पण जुन्याला नवे बनवू नका. त्याला आधुनिक 'टच' देऊ नका.. गाणे मग ते नाटकातले असो की कोणतेही असो... ते गोडच असायला पाहिजे. जे गोड नाही ते गाणंच नाही. जशी साखर ही गोडच पाहिजे तरच तिला साखर ही संज्ञा प्राप्त होते. मुखाशी आणि कानाशी ज्या गोष्टींचा संबंध येतो , त्या गोष्टी गोडच हव्यात.''

*

लेख

# खेड्यामधले घर कौलारू

## कर्जतच्या गौळवाडी गावातले 'स्वप्नगुलाब' नावाचे एक घरकुल

✶ डॉ. मीनाक्षी शिवनाथ देसाई ✶

गुलाबआजींनी स्वत:च्या घराचे स्वप्न वर्षानुवर्षे पाहिले. मध्यंतरी काही वर्षांपूर्वी घर होण्याचा योग आला पण वेळ आली नव्हती, योग हुलकावणी देऊन गेला. मग कुठल्यातरी शुभसमयी योग व वेळ हातात हात घालून आले. हे घरकुल हिरवळ, डोंगर यांनी वेढलेले, अपार नीरवतेत पहुडलेले स्वप्न साकार झाले.

इथे एक गोडाऊन होते. मूळ वास्तू पाहिलेल्या सर्वांनाच 'काय हा वेडेपणा' असेच वाटून गेले. पण आमचे पारिवारिक मित्र सतीश साठे यांनी हे आव्हान स्वीकारले, पेलले आणि आजचे आकर्षक, आल्हादक रूप साकारले.

आजची वास्तु या दहा वर्षात टप्प्याटप्प्याने सजत गेली. खरं म्हणजे दहा वर्षे हा काळ गणण्यालायक नसतोच. २५ वर्षे, ५० वर्षे वगैरे टप्पे महत्त्वाचे. पण मला प्रत्येक क्षण महत्त्वाचा वाटत होता. तेव्हाची उत्सुकता, काळजी काही विचारू नका. कम्पाऊंड वॉल, झोपाळा, नियोजनबद्ध झाडे लावणे आणि शेवटी स्विमिंग पुल! समस्त बच्चे कंपनीचे ठाण मांडण्याचे ठिकाण. हाका मारून उत्तर न आल्यास समजावे की मस्ती, भांडणे, कटकटी स्विमींग पुलमध्ये पोहोचली आहेत. केवळ लहानच नाही तर; मोठी मंडळीही तिकडेच हरवली आहेत. घरातल्या घड्याळाचे टोले तिकडे पोहोचत नाहीत आणि तिकडची घड्याळे मूक प्रेक्षक झालेली असतात. बदल म्हणून मोबाईल्सही जरा शांत झोपतात.

काही फुलझाडे आहेत, काही फळझाडे आहेत. केव्हा केव्हा वांगी, भेंडी, गवार, बोंडे, शेंगा वगैरे भाजीही जेवणाची चव वाढवून जाते. स्वत:च्या वाड्यातील फुलांचा गंध, फळांचा गोडवा अवर्णनीयच.

या निसर्गरम्य वातावरणात माणूस स्वत:ला विसरला नाही तरच नवल. फुलांचे, पानांचे रंग, आकार, पक्ष्यांचा आवाज कधी मधुर कधी कर्कश, कधी भारद्वाजाचे लयबद्ध 'टक टक', पक्ष्यांचे लहान मोठे आकार भान विसरवून टाकतात. निसर्गाचे हे लाडिवाळ रूप अनुभवताना घड्याळाचे काटे फिरून दमतात; आपले मन ताजे तवाने होते, नवीन ऊर्जा मिळवते.

पावसाळ्यात वाडा तर हिरवागार होतोच पण भोवतालचे डोंगर नुसते हिरवेगारच होत नाहीत तर; धबध्यांच्या रूपात दुधाचा अभिषेक करू लागतात. पूर्वेकडच्या नाल्याचे पाणी उसळू लागते, उड्या मारू लागते आणि जवळच्या पुलाच्या कठड्याशी शिवाशीवी खेळू लागते.

हां, इकडे विजेला मात्र लपंडाव खेळायला फार आवडतो. एरवीसुद्धा आणि पावसाळ्यात ती आकाशातल्या विजेबरोबर झिम्माफुगडी खेळायला जाते की काय कोण जाणे!

गाव नसलेल्या आम्हाला आता कर्जत हे आमचे गावच झाले आहे.

येथे आवर्जून येणारे नातेवाईक, मित्रमंडळी सर्व प्रसन्न होतात, तृप्त होतात असे वाटते. या सर्वांच्या पदस्पर्शाने, शुभेच्छा व आशीर्वादाने ही वास्तु समृद्ध झाली आहे, होत आहे व होतच राहील असा विश्वास आहे.

✳

*Best compliments from*

*

Bombay Bronx



*Best compliments from*

**Mr. Akhilesh Bhargava**

**Avi Global Plast Pvt. Ltd.**

कथा

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# चाळीशी

**✶ सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर ✶**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

कॉम्प्युटरच्या स्क्रीनवर नजर खिळवून मी बसले होते. बराच वेळ आकड्यांशी झटापट चालू होती. डोकंही दुखत होतं. आधीच ताळेबंद चुकत होता. त्यात डोकेदुखीनं कहर केला.

थोड्या वेळानं फारच कंटाळले म्हणून पेन खाली ठेवलं नी जरा पाणी पिऊन यावं म्हणून उठले.

तोच...

डोकं एका विलक्षण वेगानं गरगरलं. मला उठताच येईना. दोन्ही हातांची ओंजळ चेहऱ्यावर धरून डोळे बंद करून बसून राहिले.

थोड्या वेळानं बरं वाटलं. हळूच डोळे उघडून आजुबाजूला बघितलं. सगळ्यांच्या माना खाली होत्या. सर्वजण कामात गर्क होते. कुणाचंच लक्ष नव्हतं. ते पाहून मला खूप बरं वाटलं.

मी तशीच थोडा वेळ बसून राहिले. मनाशी काहीतरी आठवू लागले... हे हल्ली बऱ्याच वेळा होत होतं.

परवा सकाळी उठता उठताच चक्कर आली होती. पण त्याच्या आदल्या रात्री दोन वाजेपर्यंत जागून लेखन करीत होते. त्यामुळे जागरणामुळे झालं असेल अशी मी मनाची समजूत केली होती. नंतरही दोन तीनदा घरी, ऑफिसात काम करताना असं डोकं गरगरायचं, दुखायचं आणि आता पुन्हा तसंच झालं होतं. आज डॉक्टरकडे जायलाच हवं होतं.

मी संध्याकाळी घरी जाता जाता आमच्या डॉक्टरांकडे गेले.

''या सुधाबाई - काय म्हणताय्? थकल्यासारखं वाटतंय? की आणखी काही होतंय? तुम्हा लेखकांचं काही सांगता येत नाही बुवा. उगीचच काहीतरी वाटत असतं तुम्हाला...''

डॉक्टर तसे वयाने मोठे होते. त्यामुळे स्वत:च्या लेकीची, पुतणीची घ्यावी तशी ते माझी फिरकी घ्यायचे.

''हे हो काय डॉक्टर? नेहमी नेहमी काय थट्टा करता? उगीचच लेखक वर्गावर ताशेरे मारू नका हं. मी कधी आजारी पडूच शकत नाही का?''

''नाही कसं? पडू शकता तर - नव्हे आजारी पडलंच पाहिजे. नाहीतर आमचं पोट कसं भरायचं? आणि हो, लेखकांबद्दल बोललो ती खरी थट्टाच होती बरं का! नाहीतर लिहीशील एखाद्या लेखात किंवा कथा, कांदबरीत आणि समस्त लेखक वर्ग नाराज होऊन मोर्चा वगैरे आणतील माझ्या दवाखान्यावर.''

''आता थट्टा पुरे हं डॉक्टर...''

''बरं बरं आता सीरिअसली सांग, काय होतंय?''

''डॉक्टर, माझं नं डोकं गरगरतं. खूप दुखतं सुद्धा.''

''एवढंच? जागरणाने असेल.''

''मलाही तसंच वाटलं होतं. पण काल तर मी नेहमीपेक्षा लवकर झोपले होते.''

''तर मग अतिझोपेमुळे असेल. तू तशी झोपाळू आहेसच.''

''बघा - पुन्हा थट्टा? प्लीज जरा बघा नं ब्लडप्रेशर वगैरे आहे का?''

''का? खूप चिडतेस, मुलांवर, नवऱ्यावर?

''अहो, चिडू नको तर काय करू?''

''हस, दुर्लक्ष कर. पण चिडू नकोस.''

''तुम्हाला काय होतंय चिडू नको म्हणायला? माझ्या जागी असतात नं तर....''

''अगं, पण एवढं घडतं तरी काय चिडण्यासारखं? अं?''

मी उत्तरादाखल नुसतेच डोळे वटारले.

''हां... असे डोळे वटारू शकते'' डॉक्टर मिष्कीलपणानं म्हणाले. पण नंतर मुकाट्यानं माझ्या

## वात्रटिका

### सेल

आधीच होती भरती, त्यात पाऊस पडला खूप,
समुद्राने धारण केलं मग रौद्र रूप.
गतवर्षीच्या मूर्ती आल्या परत किनाऱ्याला,
रंगवून त्यांनाच मूर्तींचा मोठ्ठा सेल लावला.

**-डॉ. सुमन नवलकर**

दंडाला पट्टा गुंडाळायला सुरुवात केली.

बराच वेळ डॉक्टर पुन्हा पुन्हा बघत होते. मला मनात धास्ती वाटत होती. ब्लडप्रेशर असलं तर?

इथं मलाच सगळ्यांचे मूड्स सांभाळावे लागतात. माझे कोण सांभाळणाराय? काय येईल नशिबाला ते खरंच...

बऱ्याच वेळानं डॉक्टरांनी कानातला स्टेथोस्कोप काढला आणि हाताचा पट्टा सोडायला सुरुवात केली. नी शांतपणे सांगायला सुरुवात केली.

''तुला या जन्मात ब्लडप्रेशर होणं शक्य वाटत नाही.''

हे ऐकताच माझ्या मनावरचं मणामणाचं ओझं उतरलं. पण क्षणभरच. पुन्हा शंकासुर अक्राळविक्राळ रूप धारण करून समोर उभा ठाकला.

ब्लडप्रेशर नाही?... मग ... मग हे कशामुळे?

काही क्षण डॉक्टर काहीच बोलले नाहीत. मग त्यांनी विचारलं

''डोळे दुखतात?''

''हो डॉक्टर... कधी कधी खूपच दुखतात.''

''मग तू असं कर - एकदा डोळे तपासून घे. तुझं वय काय?''

असं विचारून डॉक्टर थांबले नी लगेच म्हणाले - 'सॉरी हं - बायकांना वय विचारू नये म्हणतात. पण डॉक्टरांना हा नियम लागू नाही. नाहीतर असं कर, सांगू नकोस तुझं वय. फक्त मी काय सांगतो ते ऐक. जर तुझं वय चाळीसच्या आसपास असेल तर नक्कीच तुला चष्मा लागेल. तेव्हा आता माझा वेळ अधिक न घेता घरी जायचं की डोळ्यांच्या डॉक्टरांकडे जायचं ते ठरवं.''

मी तिथून निघाले नी सरळ डोळ्यांच्या डॉक्टरकडे गेले. मला आता त्या धास्तीचा शेवट करायचा होता. हे डोळ्यांचे डॉक्टर तर माझ्या वडिलांचे मित्रच होते.

त्यांच्या दारात मला पाहताच डॉक्टरकाका उद्गारले - ''अरे सुधा! परत आलीस? पण आता खूप वर्षांनी आलीस कायऽऽ? पुन्हा चष्मा लागतोय असं वाटतंय की काय?''

''होय हो. पण डॉक्टर काका, आता मात्र मी स्वत: नाही हो म्हणत. आमच्या फॅमिली डॉक्टरांनी डोळे तपासून घ्यायला सुचवलंय म्हणून आले.''

''अगदी खरंच का? जशी काही तुला चष्म्याची आवडच नाही?''

''नाही... म्हणजे... मला आवडतोच चष्मा. तुम्हाला माहीतेय नं! पण आता मात्र डोकं दुखतं, डोळे दुखतात नी डोकंही गरगरत.''

''हं! म्हणजे खरंच डोळे बिघडलेयत म्हणायचे. काय गं, तुझी चाळीशी जवळ आली का?''

''अं.... '' मी जराशी घुटमळले.

तशी डॉक्टरकाका मिष्कीलपणे उद्गारले ''सांगू नकोस हवं तर. पण आता डोळे तपासल्यावर कळेलच मला. पण काय गं? खरंच सांगतेयस नं हे सगळं? नाहीतर लहानपणी तीनचारदा आली होतीस तसं खोटं खोटं सांगत आली असशील लांबचं दिसत नाही म्हणून!''... असं म्हणून ते मोठ्याने हसले.

मलाही हसू येत होतं. लहानपणी मला चष्मा खूप आवडायचा. त्यामुळे दोन तीनदा मी घरी खोटंच सांगितलं होतं की पहिल्या बाकावरूनसुद्धा मला फळ्यावरचं नीट दिसत नाही म्हणून. नी तिसऱ्यांदा डॉक्टरकाकांनी हे जाणून माझी चांगलीच खोड मोडली होती.

डॉक्टरकाकांनाही ते सगळं आठवत असावं. कारण ते हसत म्हणाले -

''त्या वेळचं औषध टाकू का डोळ्यात?''

''नको हं डॉक्टरकाका. तेव्हा तब्बल पंधरा दिवस त्या नुसत्या औषधामुळे नीट दिसत नव्हतं. खूप वैताग आला होता आणि राग पण आला होता तुमचा तेव्हा!''

''पण खोड मोडली की नाही?''

''तेव्हा मोडली खरी. पण आता मला खरोखरच चष्मा द्यावा लागणार आहे तुम्हाला नि शिवाय आता जर ते औषध घातलंत तर चालणार नाही डॉक्टर. तेव्हा मी शाळेत होते. खेळायला मिळत नव्हतं खरं. पण

अभ्यासपण वाचला होता. आता ऑफिसात नोकरी करतेय मी तेही बँकेत. दांड्या मारून चालणार नाही की रजासुद्धा मिळणार नाहीय.''

''बरं बरं - चल आता तपासायला'' असं डॉक्टरांनी म्हणताच मी उठले. त्यांच्या त्या विशिष्ट खुर्चीवर बसले. बराच वेळ डॉक्टर डोळ्यांत बॅटरीनं उजेड टाकून, त्यांच्या विशेष कॉम्प्युटरमधून आणि निरनिराळी भिंगं माझ्या डोळ्यांना लावून डोळे तपासत होते. शेवटी त्यांची तपासणी पूर्ण झाली नी मला चष्मा लागल्याचं त्यांनी जाहीर केलं.

मी आनंदातच त्यांनी दिलेलं नंबरचं कार्ड घेऊन परतले. चष्म्यानं कसं रुबाबदार वाटतं. व्यक्तिमत्व भारदस्त वाटतं. आता मी पण तशीच दिसेन. नाहीतरी 'ऑफिसर' पदाला चष्मा शोभूनच दिसतो.

घरी मात्र मी हा गौप्यस्फोट केलाच नाही. येताना चष्म्याची ऑर्डर देऊन आले. एका आठवड्यानंतर चष्मा मिळणार होता. आठ दिवसांनी मी चष्म्याच्या दुकानातून चष्मा घेतला. तो लावूनच निघाले. चष्मा बायफोकल होता. रस्त्यात एक मैत्रीण भेटली. मला खूप आनंद झाला. मनात आलं ती आता हा चष्मा बघेल नी मला तो किती खुलून दिसतोय ते सांगेल. ती जवळ आली.

आणि... जवळ येताक्षणीच ओरडली -

''अय्या! सुधा तूऽऽ? तुला चष्मा कधी लागला? चाळीशी झाली वाटतं? मला अजून वेळ आहे बाई...''

खरं तर या पमीला चष्मा कधीचाच लागला होता. पण माझ्यासारखा बायफोकल नव्हता ना? म्हणून हा गर्व.

माझा अर्धा उत्साह ओसरला.

तशीच घरी आले तर शेजारच्या निमाताईंनी गाठलंच.

''अग्गोबाईऽऽ! चष्मा कधी लागला? चाळीशी वाटतं?

माझा उरलासुरला उत्साह पाऽऽर ओसरला.

मी रडवेली होऊन घरात शिरले नी आधी आरशासमोर उभी राहिले.

चष्मा तसा वाईट दिसत नव्हता. केसात रुपेरी छटा कधीच्या डोकावत होत्याच. त्या मात्र आज जास्तच जाणवू लागल्या. आपण आता वृद्धत्वाच्या उंबरठ्याजवळ आलो ही जाणीव मन पोखरून गेली.

बराच वेळ मी सुन्नपणे बसून होते. मैत्रिणीचे, शेजारणीचे शब्द डोक्यात घणघणत होते.

संध्याकाळी मुलं आली. मला बघताच मुलगा चित्कारला'' - ओ मम्मीऽऽ काय मस्त वाटतेयस गं! अगदी भारदस्त वाटतेस.''

मुलगी म्हणाली- ''आई, आता तू खरी ऑफिसर, लेखिका वगैरे वगैरे वाटतेस. अगदी प्रगल्भ व्यक्तिमत्त्व वाटतंय तुझं.''

ह्यांनी माझ्याकडे बघून एक हलकी शीळ घातली नी मुलं आजुबाजूला नाहीत हे बघून म्हटलं - ''लव्हली! मार्व्हलस! क्यूटच दिसतेयस.''

पण माझा चेहरा फुलेना. तसं यांनी काळजीनं विचारलं

''का गं? काय झालं?''

''अं.... काही नाही... पण हा चष्मा लागला.''

''पण... तुला तर चष्मा खूप आवडतो ना?''

''होय हो! पण आता केसात रुपेरी छटा...''

''त्या सुद्धा तुला 'परिपक्वतेचं लक्षण' का कायसं वाटतं ना?''

''खरंय हो. पण हा चष्मा म्हणजे वाचायला चष्मा लागला. आता... ही वृद्धत्वाची चाहूल.....''

तसे खो खो हसत ते म्हणाले -

''वेडी कुठली! अग, चाळीशी म्हणजे म्हातारपण कुठलं? हे तर खरं मॅच्युअर्ड झाल्याचं वय. आता तुझ्या व्यक्तिमत्वाकडे लोक जास्त आदरानं पाहतील. तू किती भारदस्त दिसतेयस! पण म्हातारी नाही वाटत. विदुषी तर तू आहेसच. आता बघूनच कळतं. हे तुझं रूप आपल्याला तर फारच आवडलं बुवा. बघ तरी. इथे ये. आरशात बघ माझ्या शेजारी उभं राहून...''

त्यांच्या शेजारी उभं राहून त्यांच्या दृष्टीनं मी माझ्याकडे बघितलं...

नी माझ्या मनावरचं मळभ पार दूर दूर पळालं.

डोळ्यांवरच्या चाळिशीनं. चष्म्यानं हो - ''चाळीशी'' या वयाच्या टप्प्याबद्दलचा माझा दृष्टीकोनच बदलून टाकला होता. नाहीतरी आता पोरकटासारखं एवढ्या तेवढ्या कारणानं प्रत्येकावर रागावणं बरं दिसणार नव्हतं.

आता मैत्रिणीची, शेजारणीची कीव वाटत होती. चाळीशीचा खरा अर्थ त्यांना उमगलाच नव्हता..

*

*Best Compliments from*

Mr. Siddarth Bhargava

&

Minal Bhargava

*Best Compliments from*

**Mr. Omkar Agarwal**

**&**

**Mr. Jatin Agarwal**

**Chemicals and Allied Industries**

विनोदी लेख

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# Unwanted Guests

**✶ *Shubhada Suresh Agaskar* ✶**

*(neè Vaishali Madhav Jayakar)*

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

As hubby exited the front door of our home, this morning, and walked down the stairs, he casually turned to me and said "Don't close the door, dear". "Uhh! Why?" I thought. 'Has he changed his mind about going to office and is he going to take me somewhere out instead?' went my optimistic brain. "There's a lizard near the door hinge" he said and walked off. What a letdown!

Now, our home is generally free of all pe(s)ts! Mosquitoes cannot enter due to the netted windows while cockroaches are debarred, due to the same reason and also due to our excellent nanitraps. Though, I must confess, that we had a mouse that came over to stay for about a week !

Topping the list of unwanted guests, he made his presence felt one early morning, when hubby and I sat down for a nice, hot cup of green tea. "Dhud, dhud,dhud!" went the ceiling. For the first 2 days, I thought that it was just our upstairs neighbour scampering about the hall, trying to pack off her daughter to school.




Then, pieces of black, rubber tubing started falling out of our AC duct. Every day, this continued, until we came to the scary conclusion that we had a mouse in the house. Immediately, we tried rat cake and sticky traps but to no avail!

One fine morning, I went into the kitchen, intending to sweep the floor before starting the cooking for the day. As I moved my onion-potato stand from the corner, there he was! Curled up into a black ball, he immediately started squeaking. I, on the other hand, began shrieking at the top of my voice! Setting a pace that would have put Usain Bolt to shame, I flew through the kitchen door, slamming it shut and vaulting onto our living room armchair, all the while, yelling for hubby.

The poor guy, who was busy shaving, poked his sleepy head out of the bathroom and asked "What's the matter with you?" "M..m..m…mouse in the kitchen" I said and then told him" You kill him". Then I realised whom I was talking with. My hubby is one of those non-violent persons who cannot even kill a cockroach, choosing instead to toss even caterpillars out of windows, rather than simply squashing them! I thought fast! "Go get Bahadur from downstairs. I am not going into the kitchen unless that mouse is killed!"

With visions of his office dabba being in jeopardy and no breakfast or tea on top of it, hubby rushed down to get our chowkidaar. Bahadur came up with a swagger, and what was more important, a stout, bamboo stick. The brave guy ventured inside the kitchen and slid the door shut.

I, still balancing myself on the back of the armchair, could hear the sounds of the stick being rapped, doors of cabinets being checked and then simultaneously, two things happened. Our bedroom door opened, with a bewildered Radhika (our 5 year old daughter), sleepily rubbing her eyes and exclaiming "What's all that noise, Aie?" and Bahadur, emerged from the kitchen saying "Kya memsaab! Kuch chooha nahi hain idhar!"

Pulling Radhika onto the armchair with me for safety, I shrieked at Bahadur "Arre! Kaise nahi hain?" Maine khud dekha usko!" Bahadur cheekily retorted "Kya Good Morning wish kiya usne aapko?" Hubby burst out laughing, while I turned red in the face and insisted with wounded pride that it was very much there in the kitchen and would someone please go in and get rid of him!

Hubby went in this time and rummaged about for 5 minutes. "Shubhada, come here!" When hubby calls, you have to go! So, with a heavy heart, and a stern warning to my daughter to stay on the armchair and not step down, I entered the kitchen.

Bahadur was making me nervous by standing near the door (and blocking my exit). I said "He couldn't have gone anywhere else. I shut the door as I left. He has to be here! Did you check behind the microwave? What about behind the fridge?"

Bahadur moved the fridge ahead. There was nothing. It was as he moved the fridge back into place, that the mouse decided to give us a darshan. Until now, barring myself, no one had seen it. And when he suddenly appeared from below the ornamental flap at the base of the fridge door, I rapidly back-pedalled it out of there, triumphantly yelling to Bahadur "See! There he is!" Bahadur, too yelled out "Dikha memsaab, maine bhi usko dekha". Hubby, being on the wrong side of all this action, let out a plaintive bleat "Where?Where is it?"

Pulling him out of the kitchen and shutting the door on Bahadur and the mouse, I gave him an update and joined our daughter in the living room. By now, she had woken up completely and all of us could hear "Thud! Thud! Bang! Bang!" coming from the kitchen as Bahadur battled it out with the mouse.

The door finally slid open and a victorious Bahadur emerged, with a blood stained bamboo in one hand and a mouse held by its tail, in the other. "Take him away!" I shrieked. "But wait! Let me click a snap to show my friends". As I ran for my cell-phone, the mouse started dripping blood onto our floor. "Take him to the landing" came the order from my hubby.

In olden times, when hunters used to go for shikaar, it was customary to click a snap with the dead animal. Like standing with a gun in one hand and a foot on the animal's head! We now had a snap for posterity. Bahadur, with the bamboo in one hand, and the dead mouse, hanging by its tail, in the other hand.

As I hurried into the kichen and started making chappatis to make up for the late start, my daughter called out "Aie, look here". I turned around, let out a scream and then sheepishly realised that the mouse that my daughter had held by its tail to scare me was a little stuffed one that we had picked up from Ikea in Dubai. Roundly scolding her, I ushered her out and started cooking in earnest.

Coming back to my current situation, with a lizard trying to come in and share my breakfast with me, I did the next best thing. Reached for my broom! With blood-curling cries of "Get out! Get out!", I tried shooing her out the door.

The shameless thing proceeded to crawl inside so I panicked and hurriedly opened our utlilty cupboard to reach for the red All-Out spray. My hand closed around a red container and yanking it out, I pulled the lid off, intending to spray the offending lizard.

To my mortification, instead of the acrid smell of All-Out, a pleasant rose essence wafted its way into my nostrils. With one eye on the lizard, I sneaked a peek at the container in my hand. "Shee!Room Freshener!" I muttered in disgust! Thanking my stars, that I had not sprayed the lizard with rose essence, like one does for suwashinis during haldi kunku ceremonies, I ran back to the cabinet and pulled out the right spray this time. A strong whoosh and the lizard vanished. Leaving me to enjoy my morning!

✳

लेख

# उरलेलं - राहिलेलं

**✶ हेमंत विनायकराव तळपदे ✶**

'विठू मला आता जेवण आवरायला मदत कर' आईचे शब्द ऐकून विठू टी.व्ही. पहाणे सोडून सरळ स्वयंपाकघरात आला. आज सकाळी त्यांच्याकडे काका-काकी, चुलतभावंडे, आत्या, भावोजी, आतेभावंडे असे एकूण १५ जण जेवण्यास होते. आईने स्वत: स्वयंपाक केला होता परंतु काहीतरी बिनसलेच. त्याचा चुलतभाऊ अमरदादा, वहिनी, त्यांची दोन मुले मेगाब्लॉकमुळे आलीच नाहीत. आत्याची लग्न झालेली सुचीताई, नवरा व छकुली आले नाहीत. आईने इतकी मेहनत घेऊन केलेले सुग्रास भोजन उरलेच. आता फ्रिजमध्ये बरेचसे पदार्थ ठेवले जात होते. विठू या गडबडीत रमला. आपलं असंच होतं केव्हातरी. कोठेतरी काहीतरी जास्त उरतेच. मग ते नीट राखून ठेवताना आपली त्रेधातिरपिट होते. शक्यतो सत्यनारायण पूजेचा प्रसाद उरलाच पाहिजे असा संकेत आहे. आयुष्यातही अनेक गोष्टी उरतातच. निवृत्त झाल्यावर वयाच्या १८-२० वर्षापासून केलेली धावपळ ५८-६० व्या वर्षी संपते आणि मग आपलं आयुष्य निरोगी असलं तरी उरतेच. समाजाच्या नजरेत आपण उरलेले जीवन व्यतित करत असतो व आपण स्वत:ही या उरलेल्या आयुष्यात तडजोडी करत राहतो.

इतकेच काय; म्हातारपणी शरीर निरनिराळ्या व्याधींनी ग्रस्त असते तरी मनातील उमेद, अनुभव, चांगल्या सवयी संपत नाहीत. त्या कोठेतरी शरीरात वा मनात उरतातच. फारच थोडी माणसे या स्वगुणांचा उचित उपयोग करतात. बाकी बरेचसे मात्र आता आपला वेळ कसा घालवायचा याविषयी प्रपंच करत बसतात.

खरे पाहता या उरलेल्याचं काय करायचं हा मोठा यक्षप्रश्न असतो. आपली आई, बहीण घर चालवतांना सण, वाढदिवस इ. वेळा या उरलेल्या अन्नाचा अपव्यय होणार नाही याची पुरेपूर काळजी घेतात. शक्यतो नामांकीत हॉटेलमध्ये रात्री उरलेले अन्न फेकले जाते अथवा त्याचा डुक्कर गायी इ. जनावरांना उपयोग होतो.

पण मुख्य मुद्दा आपल्या आयुष्याच्या उरलेल्या क्षणांचा असतो. माझ्या परिचयातील अनेक वृद्ध निवृत्त लोक आपला दिवस कसातरी रेटतात. काही मित्रांना बागेत भेटतात; तर काही नियमितपणे देवळात प्रवचनाला जातात.

मात्र असे लोक या वयातही समाजाची पुंजी आहेत. आपला अनुभव, आपले संस्कार या वृद्धांनी तरुणाईपर्यंत व्यवस्थित पोहचवले तर या देशाला एक संस्कारक्षम तरुण पिढी आपोआपच मिळेल. तरुण वर्ग तर संस्कारक्षम होण्यासाठी शिवखेडा, श्री श्री रविशंकरजी यासारख्या थोर गुरुंकडे धावत असतो. पण खरे पहाता याची जरादेखील गरज नसते. घरातले आजी आजोबा, नाना-नानी त्यांच्या उरलेल्या क्षणांच्या अनुभवसिद्ध-ज्ञानाने आपले चांगले मार्गदर्शन होऊ शकते असे मला वाटते.

अजय आता तीस वर्षांचा झाला. बँकेत चांगली नोकरी, सुविद्य बायको सरला, बायकोही खाजगी कंपनीत ऑफिसर. दोन लहान मुले सावनी अन् विश्वास. चांगला सुखवस्तु परिवार. पण तरीही अजयला आजही जीवनात काहीतरी राहिलेलं आहे याची खंत होती. लहानपणी त्याला स्केटिंगचे फार वेड. मुंबईला बिरला मातोश्रीजवळ शिकवणीला जाताना तेथील जाळीतून तो मुलांना स्केटिंग करताना पहात असे. आपणही स्केटिंग शिकावे असे त्याला मनोमन वाटे. एकदा धाडस करून त्याने तेथे प्रवेश केला व

*कविता*

## अहा! संसार संसार!

**- सौ. उज्ज्वल र. ब्रम्हांडकर**

संसार म्हणजे का ऊन असतं?
तो तर असतो वटवृक्ष
आयुष्याच्या माध्यान्ही तर
विशाल छाया देण्यात दक्ष।।
संसार म्हणजे नव्हे सागर
तो तर उत्साहाचा झरा
खळाळणारा वाहणारा
सदैव पुढे पुढे नेणारा।।
संसारात प्रीतीचा
पाश वाटत नाही कधीच
प्रीती म्हणजे जीवनाची
खरी खुरी संजीवनीच।।
हवी कशाला तडजोड
आहे त्यागात सुख सारे
भारतीय संस्कृतीचे
हेच तत्त्वज्ञान खरे।।

काऊंटरवर स्केटिंगच्या फीबद्दल विचारणा केली. रिसेप्शनिस्टने महिना फी रु. ५००/- आहे आणि तीन महिन्यांची फी एकदम भरावी लागेल असे सांगितले. एकदम १५००/- रुपये भरणे अजयच्या आवाक्या बाहेरचे होते. अजयला शिकवणीचे केवळ ४०० रुपये मिळत होते. घरी तर गरिबी होतीच. तो चुपचाप बाहेर पडला. त्याच्या मनात स्केट्स न शिकण्याची खंत तशीच राहिली. अशा अनेक राहून गेलेल्या गोष्टी आपल्याला सतावत असतात. कोणाला पोहणे शिकावेसे वाटते तर; कोणाला पाश्चिमात्य डान्स शिकावा असे वाटते. काहींना सायकलवरून दूरवर रपेट मारावीशी वाटते तर; अनेकांना हेलिकॉप्टरमध्ये एकदा तरी फिरावेसे वाटते. बऱ्याचशा मध्यमवर्गीयांना विमानाचे साधे सुखही मिळत नसते. या गोष्टी इहलोक संपेपर्यंत राहून जातात. त्याची खंत मनात कोठेतरी टोचत रहाते. सर्व गोष्टी मनासारख्या प्राप्त होण्याचे भाग्य क्वचितच एखाद्याला मिळते.

हे केवळ वानगीदाखल दिलेले दाखले आहेत. पण बऱ्याचदा आपल्या आयुष्यात काही महत्त्वाच्या गोष्टीही राहून जातात. रामला शिक्षणात चांगली प्रगती होती. पण वडिलांचे अकाली निधन व आईचा दुर्धर आजार यामुळे घराची आर्थिक जबाबदारी त्याच्यावर पडली. तो लहानमोठ्या नोकऱ्या करू लागला. या व्यतिरिक्त सकाळी वर्तमानपत्रे टाकणे, गाड्या धुणे यात त्याचे बालपण कुस्करले गेले. शिक्षण होऊन थोडेफार मोठे होण्याचे स्वप्न राहून गेले. आजही राम भाकरीच्या तुकड्यासाठी धावपळ करत आहे.

तर काही युवक-युवती या राहून गेलेल्या गोष्टीसाठी बऱ्याचदा स्वत: जबाबदार असतात. माझ्या ओळखीतल्या तीन-चार युवक-युवतींची लग्ने तीस चाळीस वयापर्यंतही झालेली नाहीत. याला सर्वस्वी त्यांचा विक्षिप्त स्वभाव, आडमुठेपणा जबाबदार असतो.

मग या राहिलेल्या गोष्टींचे करायचे काय? आपण सर्व परिपूर्ण नसतोच. काही ना काही राहतेच. कमीपणा म्हणजे पाप नव्हे. याला केवळ दोनच उपाय आहेत. राहिलेली गोष्ट आजही आवाक्याबाहेरची आहे असे स्वत:ला उमजले तर ती सोडून द्या. ती न मिळण्याची खंत जराही बाळगू नका. पण जर राहिलेली गोष्ट आजही आपण मिळवू शकतो असे वाटते तर नव्या उमेदीने ती पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. नशीब नेहमीच सकारात्मक प्रयत्नांना साथ देते. आपण मात्र प्रारंभापासून नकारात्मक विचार जोपासून नशिबाला दोष देत रहातो. म्हणून जास्त झालं अन उरलं. तर कमी पडले म्हणून राहिलं याविषयी जरादेखील संभ्रम न बाळगता जीवन सकारात्मकतेने जगा.

मार्ग असावा सरळ साधा
उरलेल्याची चिंता का व्हावी?
वाटा ते उरलेले सर्वां
राहिल्याची खंत मनी नसावी.
जे उरले ते तुझ्यामुळे
जे राहिले ते माझ्यामुळे
मनी खूणगाठ स्पष्ट असू दे
जीवन हे निर्मोही जगू दे.

*

लेख

# श्री वांच्छा सिद्धिविनायक गणेश मंदिर

**✶ गौरांग कीर्तिकर ✶**

श्री वांच्छा सिद्धिविनायक गणेशमंदिराची स्थापना ४ जून १९२७ साली कै. वासुदेव रामचंद्र जयकर यांच्या स्मरणार्थ कै. पुरुषोत्तम जयकर यांनी केली. म्हणजेच प्रभुतरुणपेक्षा फक्त चार वर्षानंतर या संस्थेची चॅरिटी कमिशनरकडे पब्लिक ट्रस्ट म्हणून नोंदणी केली गेली. तेव्हापासून हे देऊळ 'वासुदेव रामचंद्र जयकर रिलीजियस व चॅरिटेबल ट्रस्ट' च्या विद्यमाने कार्यरत आहे.

देऊळपरिसर पडीक झाला होता. येथे एक सहा खोल्यांची चाळ होती. त्याच्या भाड्यातून देवळाचे व्यवस्थापन व्हावे अशी तरतूद होती. काही काळ येथे एकच ट्रस्टी कामकाज बघत होते. त्या दरम्यान मंदिरातील पुजारी शिरजोर झाला होता व ट्रस्टच्या मालमत्तेची हेळसांड चालली होती.

१९८४ साली कै. सतीशचंद्र विश्वासराव कीर्तिकर, कै. सुधीर भगवान देसाई, कै. एम. के. कीर्तिकर, कै. कृष्णकुमार मानकर व मी स्वत: यांनी मिळून पुन्हा ट्रस्टचा गाडा रुळावर आणण्याचे प्रयत्न केले व श्रींच्या कृपेने त्या प्रयत्नांना यश आले. एम.के. कीर्तिकर यांच्या निधनानंतर सॉलिसिटर राजन मोतीराम जयकर ट्रस्टी म्हणून लाभले. त्यांनी ट्रस्टची न्यायिक बाजू भक्कमपणे सांभाळली आणि एक एक करत सर्व अडथळे दूर केले. साधारण १९९५-९६ च्या सुमारास ट्रस्टचे अधिपत्य कोर्ट रिसिव्हरच्या मदतीने आमच्याकडे आले. तदनंतर देवळाच्या जीर्णोद्धाराकरिता नवीन ५ मजली इमारत बांधण्यात आली. एक छोटेसे सभागृहदेखील बनविले. ट्रस्टला कार्यालयासाठी जागा उपलब्ध झाली व देवळाचे नूतनीकरण करता आले. काही अतिरिक्त फ्लॅट्स बांधून पागडीवर देऊन ट्रस्टला उत्पन्नाचे साधन निर्माण करता आले.

हे देऊळ जनतेत प्रिय आहे. इच्छा पूर्ण करणारा व सर्व विघ्न दूर करणारा म्हणून तो वांच्छा सिद्धिविनायक गणपती अशी त्याची ख्याती आहे. मुख्य गाभाऱ्यात गणपतीची सुंदरशी विलोभनीय अशी संगमरवरी मूर्ती आहे. मंदिर परिसरातच श्री मारुती, श्री शंकर, श्री दत्तात्रेय आणि श्री महालक्ष्मीची छोटीशी व सुबक अशी देवळे आहेत. ही देवळे खास भक्तांच्या सोयीसाठी व त्यांच्या आग्रहाखातर निर्माण करण्यात आली.

सांगणे न लगे की मंगळवारी, विनायकी चतुर्थी, संकष्टी, अंगारकी व गणेश चतुर्थीला देवळात भक्तांची गर्दी उसळते. भक्तांना व्यवस्थित दर्शन व्हावे म्हणून रांग लावायची उत्तम सोय केली आहे.

देवळात हिंदुंचे मुख्य सणपण साजरे केले जातात. महाशिवरात्री, हनुमान जयंती, नवरात्री, दत्तजयंती, जन्माष्टमी इत्यादी उत्साहाने साजरे होतात.

श्रींच्या आशीर्वादाने भक्तांकडून आलेली देणगी व दान पेटीतील उत्पन्न यांचा काटेकोरपणे हिशोब ठेवला जातो. दरवर्षी जमाखर्चाचा ताळेबंद (बॅलन्स शीट) योग्यरित्या ऑडिट करून चॅरिटी कमिशनरकडे सादर केला जातो.

ट्रस्टतर्फे गरजू लोकांना वैद्यकीय मदतीसाठी अनुदान दिले जाते. डायलिसीस, कर्करोग, हृदयविकार, मोठ्या शस्त्रक्रिया इत्यादीसाठी मेडिकल हेल्प दिली जाते. शिक्षणासाठी लोन स्कॉलरशीपचीही व्यवस्था आहे.

अस्मिता फाऊंडेशन ही संस्था अपंगांसाठी स्वयं रोजगाराचे शिक्षण देते. ट्रस्ट या संस्थेला रुग्णवाहिकेचा सालाना खर्च मदत रुपाने देते.

हे देऊळ अंधेरी पूर्वेस, मेट्रो स्टेशनच्या अतिशय जवळ आहे. स्टेशनपासून ३ मिनिटांच्या अंतरावर असल्यामुळे भक्तांना सोयीचे आहे.

सध्याचे कार्यरत ट्रस्टी

१) मिलिंद सतीशचंद्र कीर्तिकर - मॅनेजिंग ट्रस्टी

२) गौरांग श्रीकृष्ण कीर्तिकर - (प्रभुतरुणचे ट्रस्टी)

३) अमित कृष्णकुमार मानकर

४) मनीष सुरेशचंद्र कीर्तिकर

५) अजित मोरोबा विजयकर - (पाठारे प्रभु चॅरिटीजचे प्रमुख ट्रस्टी)

✳

*Best Compliments from*

**Mr. Manish Narang**

**Continental Metal Industries**

*Best Compliments from*

**Mr. Vishal Bijlani**
&
**Mrs. Nysha Bijlani**

# गुण गाईन आवडी


# माझी नेमबाजी

**✶ वैजयंती विश्वास अजिंक्य ✶**

**शब्दांकन- विश्वास अजिंक्य**

योगायोगानेच मी ' नेमबाजी'सारख्या अनोख्या खेळाकडे वळले. २००९ साली माझी ८ वी ची वार्षिक परीक्षा संपली. सुट्टीत एप्रिल-मेमध्ये नेमके काय करायचे ते ठरवलं नव्हतं. त्याच वेळेला एके दिवशी रुईया कॉलेजच्या जिमखान्याचे प्रमुख असलेले माझ्या बाबांचे स्नेही पाटीलसर व पाष्टेसर बाबांना भेटले आणि ''रुईया कॉलेजचा जिमखाना आम्ही अद्यावत केला आहे तो बघायला या.'' म्हणून आग्रहाने जिमखाना दाखवायला घेऊन गेले व तेथे घेत असलेल्या विविध ३५ खेळांची माहिती त्यांनी दिली आणि बाबांना सांगितले की, ''तुझ्या मुलीलासुद्धा एखाद्या खेळात टाकून दे. शक्यतो वैयक्तिक खेळात टाक. सांघिक खेळात टाकलं तर एखाद्या खेळाडूची निवड करताना दुमत होऊ शकतं. वशिलेबाजी सुद्धा होऊ शकते. वैयक्तिक खेळात स्वत:च्या कामगिरीवरच खेळाडू पुढे जातो. जर तिला नेमबाजीच्या खेळात टाकलं तर तिची एकाग्रता वाढेल. तुम्ही असा विचार करु नका की वैजयंती आता ९वीत आहे. पुढच्या वर्षी १०वीला जाईल. मग रोज १ तास खेळासाठी कसा देता येईल? तिला खेळू द्या. खेळाचा तिला फायदाच होईल.अंतिमत: तिचे मार्क वाढलेलेच दिसतील.''

घरी आल्यावर बाबांनी पाटीलसर आणि पाष्टेसरांबरोबर झालेले संभाषण मला सांगितले. नेमका ७-८ दिवसातच पिस्तूल शुटींग आणि रायफल शुटींगच्या प्रशिक्षणाचा बेसिक कोर्स रुइया महाविद्यालयात सुरु होणार होता. मुळात असा काही



खेळ असतो हेच मला ठाऊक नव्हतं. पहिल्या दिवशी मी जेव्हा शुटींग रेंजमध्ये गेले त्यावेळी हे काहीतरी वेगळे आहे याचा मला अंदाज आला. सुट्टीच्या कालावधीत शुटींग करूया असं ठरवलं. पिस्तुल हाताळायला मिळतंय याचंपण अप्रूप होतं. मग त्याची गोडी लागली आणि माझा नेमबाजीचा प्रवास सुरु झाला.

रायफल शुटींग करताना जाड कॅनव्हासचे शुटींग जॅकेट व पँट घालावी लागते. पण पिस्तूल शुटींग करताना जॅकेट घालावे लागत नाही. सुट्टीतच शुटींग करायचं आहे तर रायफल शुटींगचं एवढं सामान कशाला विकत घ्यायचं. म्हणून पिस्तुल प्रकार

निवडला. रुईया महाविद्यालयात जिमखान्याच्या रायफल्स आणि पिस्तुल होत्या. त्या वापरायला मिळणार होत्या. त्यामुळे पिस्तुल विकत घ्यावी लागणार नव्हती. शिवाय तिथे फी भरून इतर शाळा कॉलेजच्या विद्यार्थ्यांना सराव करायची सवलत होती. आणि मुख्य म्हणजे रुईया कॉलेज आमच्या घरापासून चालत १० मिनिटांवर आहे. त्यामुळे सरावासाठी जायला प्रवास करावा लागणार नव्हता. मी एकटीसुद्धा जाऊ शकत होते.

नेमबाजी हा एकाग्रतेचा खेळ. या खेळात त्याचाच कस लागतो. त्यासाठी खेळाडूचा विचार, जिद्द, सकारात्मक दृष्टीकोन, आणि खेळाप्रती असलेले प्रेम महत्त्वाचे असते. ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक पटकावण्याचे ध्येय खूप भव्य, आकर्षक आहे. पण ते साध्य करण्यासाठी आधी स्थानिक स्पर्धा जिंकणे; मग राज्यस्तरीय, त्यानंतर राष्ट्रीय स्पर्धा जिंकणे, या मार्गानेच जावे लागते. वर्ल्ड चॅम्पियनशिप किंवा ऑलिम्पिकची पात्रताफेरी पार केल्याशिवाय या स्पर्धात भागच घेता येणार नाही.

कॅप्टन सॉलोमन इझिकेल नावाचे नेमबाजीचे ख्यातनाम प्रशिक्षक होते. त्यांच्या स्मरणार्थ, नवोदित नेमबाजांसाठी राज्य पातळीवर स्पर्धा भरविली जाते. नवोदित नेमबाजांसाठी ही पहिली मॅच. नवोदितांना या स्पर्धेत भाग घ्यावाच लागतो. या स्पर्धेत ठराविक स्कोअर करून पात्रता फेरी पार केल्यावरच पुढच्या मोठ्या स्पर्धेत भाग घेता येतो. पहिल्याच वर्षी रोज १ तास याप्रमाणे ४ महिने सराव केल्यावर सप्टेंबर २००९ मध्ये झालेल्या या स्पर्धेत मी भाग घेतला आणि चक्क ४थी आले. त्यामुळे लगेच ऑक्टोब मध्ये होणाऱ्या अखिल भारतीय जी.व्ही. मावळणकर स्पर्धेसाठी मी पात्र ठरले. ही स्पर्धा राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेसाठी पात्रता फेरीची स्पर्धा असते. ही स्पर्धा कलकत्त्या जवळील आसनसोल येथे होती. कोणत्याही खेळाडूसाठी केवळ सराव पुरेसा नसतो. त्याबरोबर सामने खेळण्याचा मौल्यवान अनुभवही गाठीशी हवा. सामन्यांचा तणाव हाताळण्याचे कौशल्य सामने खेळतानाच मिळते. माझा तर हा दुसराच सामना होता. तरीसुद्धा अखिल भारतीय पातळीवर मी २२वी आले. पण राष्ट्रीय पातळीवरील नेमबाजी स्पर्धेसाठी लागणारी गुणसंख्या थोडक्यात चुकली. पण त्याचवर्षी डिसेंबर महिन्यात महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालयातर्फे घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय शालेय क्रीडास्पर्धेत १० मीटर एअर पिस्तुल शुटींगमध्ये मी दुसरी आले आणि मला रौप्यपदक मिळालं हे माझे पहिलं पदक. या स्पर्धेपाठोपाठ विभागस्तरीय स्पर्धेत पुन्हा रौप्यपदक पटकावून राज्यपातळीवरील स्पर्धेसाठी पात्र ठरले. ही स्पर्धा पुण्यात बालेवाडीला होती. या स्पर्धेतदेखील माझी कामगिरी समाधानकारक झाली. पण मी राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेकरिता पात्र ठरू शकली नाही पण त्याचवेळी हेही लक्षात आले की, दहावीला गेल्यावरसुद्धा आपण महाराष्ट्र शासनाच्या या स्पर्धेत सहभागी होऊन, जिल्हास्तरीय व पाठोपाठ विभागस्तरीय स्पर्धेत जिंकून राज्य पातळीवर पोहोचलो तरच दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेमध्ये २५ क्रीडागुण मिळतील.

दहावीचे वर्ष उजाडले. जोरदार अभ्यासाचं हे वर्ष. मग सरावासाठी वेळ कसा मिळणार? सरावच नसेल तर सामने कसे जिंकणार? सुट्टीत कसून सराव केला पण शाळा सुरू झाल्यावर सरावासाठी वेळच मिळेना. शाळा सुटल्यावर क्लास. क्लास सुटेपर्यंत शुटींग रेंज बंद झालेली असायची. अशावेळी स्पर्धेआधी काही दिवस कधी शाळेला दांडी, कधी गणिताच्या क्लासला दांडी, कधी मराठीच्या क्लासला तर; कधी हिंदीच्या क्लासला दांडी असं करत करत सराव केला व जिल्हा आणि विभागस्तरीय स्पर्धा जिंकून राज्य पातळीवरील स्पर्धेत सहभागी झाले. त्यामुळे दहावीच्या बोर्डाच्या परीक्षमध्ये २५ क्रीडागुण मिळाले.

नेमबाजी हा मानसिक ताकदीचा खेळ आहे. यात बुद्धिमत्तापातळी चांगली असायला हवी. लक्ष्याचा वेध घेताना तुम्ही काय विचार करता हे सर्वांत महत्त्वाचे. कारण एका छोटयाश्या बिंदूवर तुम्हाला निशाणा मारायचा असतो. मनात येणाऱ्या सर्व विचारांवर नियंत्रण ठेवून,पायाच्या नखापासून ते डोक्यापर्यंत सर्व अवयवांच्या हालचाली थांबवून , श्वास सोडण्याच्या वेळी तुम्हाला वेध घ्यायचा असतो. त्यामुळे नेमबाजीत एकाग्रतेला खूप महत्त्व आहे. त्याचबरोबर आपल्या शरीरातील सर्व अवयव पूर्ण तंदुरुस्त असणे खूप गरजेचे आहे. कारण एका अवयवाने जरी गडबड केली तरी त्याचा नेम साधण्यावर परिणाम होऊ शकतो.

पिस्तुलशुटींगमध्ये मुलींसाठी ४० शॉटस्ची ४०० गुणांची मॅच असते. पहिला शॉट सारी व्यवधाने सांभाळून उत्तम मारायचा. मग त्याची ४० वेळा पुनरावृत्ती करायची. या खेळाला पराकोटीच्या संयमाची आवश्यकता असते कारण यात तेच कौशल्य पुन्हा पुन्हा प्रगट करत रहायचे असते. कंटाळा येऊन चालत नाही. स्पर्धेत नेमबाजी करताना एखादा खराब शॉटसुद्धा एकूण गुणसंख्येवर अनिष्ट परिणाम घडवू शकतो. त्यामुळे प्रत्येक शॉट हा अतिशय काळजीपूर्वक मारावा लागतो.

माझे शालेयशिक्षण दादर पारसी कॅालनीतील जे.बी. वाच्छा हायस्कूलमध्ये झाले व दहावीची परीक्षा ८६% मार्क मिळवून उत्तीर्ण झाले. राज्य-राष्ट्रीय स्पर्धेतील सहभागी खेळाडूंना ११वी प्रवेशासाठी ३% जागा शासनाने राखून ठेवल्या आहेत. त्यामुळे मला अकरावीला रुईया महाविद्यालयात कला शाखेत सहज प्रवेश मिळाला. कॉलेज आणि शुटींगरेंज एकाच ठिकाणी असल्यामुळे सरावाला जास्त वेळ देता आला. पण मी राष्ट्रीय पातळीवर पोहोचले नव्हते. तंदुरुस्त राहण्यासाठी व्यायामाची गरज होती. त्यासाठी रुईया महाविद्यालयातीलच व्यायामशाळेत प्रवेश घेतला. कसून व्यायाम सराव आणि त्याचबरोबर अभ्यासही केला. आणि यावर्षी झालेल्या 'कुमार सुरेंद्र सिंग नेमबाजी स्पर्धेत' सुवर्णपदक पटकावून राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पात्र ठरले.

८ वर्षात मी १० मीटर पिस्तुल शुटींगच्या ४० विविध स्पर्धामध्ये भाग घेतला आहे व १६ स्पर्धामध्ये पदक मिळविले आहे. या ४० विविध स्पर्धामध्ये ५ राष्ट्रीय पातळीवरील तर १५ राज्यपातळीवरील स्पर्धांचा समावेश आहे. २०११ व २०१२ साली स्कूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडियाने आयोजित केलेल्या बारावीपर्यंत असलेल्या 'राष्ट्रीय नेमबाजी' स्पर्धेत मी महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व करून महाराष्ट्राच्या संघाला २०११ साली रौप्यपदक तर २०१२ साली 'सुवर्णपदक' पदक मिळवून देण्यात मोलाची कामगिरी बजावली. या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत विजयी झाल्याबद्दल मला महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक संचालनालयातर्फे २०११ साली रु ७५००/- तर २०१२ साली रु ९०००/-ची शिष्यवृत्ती देण्यात आली. तर त्यावेळी मी शिकत असलेल्या रुईया महाविद्यालयाने देखील मला 'क्रीडाभूषण' पुरस्कार देवून सन्मानित केले होते. २०१३ व २०१४ अशी लागोपाठ २ वर्षे माझी आंतरविद्यापीठ नेमबाजी स्पर्धेसाठी मुंबई विद्यापीठाच्या संघात निवड झाली होती.

नेमबाजीत कारकीर्द नक्कीच घडविता येऊ शकते. माझ्याकडे पैसे नाहीत मग मी नेमबाजी कशी करणार हा विचार बदलायला हवा. सरावासाठी, स्पर्धेला जाण्यासाठी पैसे लागतातच पण पहिल्याच दिवशी लाखभर रुपये लागत नाहीत. अकादमी आहेत, प्रायव्हेट कोचेस आहेत, जिथे वेपन वापरायला मिळेल, पिस्तुल शुटींगचे हे माझे आठवे वर्ष. पण पहिली ७ वर्षे माझ्याकडे स्वत:चे पिस्तुलही नव्हते. मी रुईया कॅालेजचीच पिस्तुल वापरत होते. टप्प्याटप्प्याने साहित्य विकत घेतले. सुदैवाने मला रुईया महाविद्यालयाचेच लीना मॅडम आणि शांतारामसरां- सारखे चांगले प्रशिक्षक मिळाले. घरच्यांच्या पाठिंब्याशिवाय तर मी काहीही करू शकले नसते. मी आणि बाबा स्पर्धेसाठी दौऱ्यावर असताना आई आमचा व्यवसाय सांभाळते आणि मी दौऱ्यावरून यायच्या दिवशी हटकून माझ्या आवडीचे पदार्थ बनवते आणि माझी खोली आवरून ठेवते.

नेमबाजीच्या या खेळाने मला खूप काही दिले.दहावीला असताना २५ क्रीडागुण, अकरावीला खेळांडूसाठी राखीव असलेल्या जागेतून रुईया महाविद्यालयात थेट प्रवेश, महाराष्ट्र शासनाची शिष्यवृत्ती, रुईया महाविद्यालयाने दिलेला 'क्रीडाभूषण' पुरस्कार, त्याचबरोबर २०१२ साठी प्रभूप्रभातने सुवर्णपदक देऊन तर पाठारे प्रभू महिला समाजाने २०१६ साली 'घे भरारी' पुरस्कारासाठी असलेले 'रौप्यपदक' देऊन मला सन्मानित केले. नेमबाजीच्या स्पर्धांच्या निमित्ताने खूप ठिकाणी फिरता आले. नवीन मित्रपरिवार मिळाला. सध्या मी प्रभादेवी येथील 'रचना संसद कॅालेज ऑफ अप्लाईड आर्ट ॲन्ड क्राफ्ट' मध्ये कमर्शियल आर्टच्या ४थ्या आणि शेवटच्या वर्षाला शिकत आहे आणि नेमबाजीच्या या खेळाचा जास्तीत जास्त आनंद घेत राहणार आहे.

*

**गुण गाईन आवडी**

# जिवलग सखी

**✶ मृदुला प्रभुराम जोशी ✶**

यथा काष्ठं च काष्ठं च समेयातां महोदधौ।
समेत्य च व्यपेयातां तद्वद् भूतसमागमः।।

या शाश्वत सत्य सांगणाऱ्या संस्कृत श्लोकाचं शब्दप्रभू महाकवी ग. दि. माडगूळकर यांनी मराठीत यथार्थ भाषांतर केलं आहे ते या दोन ओळीत -

दोन ओंडक्यांची होते सागरात भेट
एक लाट तोडी दोघां, पुन्हा नाही गाठ
क्षणिक तेवि आहे बाळा, मेळ माणसांचा...

खरंच आहे ते, आपल्या आयुष्याच्या प्रवासात आपल्याला अनेक माणसं भेटतात. काही जवळ येतात, काही दूर जातात, काही जीव लावतात. तर काही जीव जाळून दूर होतात. मात्र एकदा जवळ आल्यानंतर वर्षानुवर्षे ती जवळीक तितक्याच आपुलकीनं जपणारे आणि टिकवून ठेवणारे फारच थोडे. माझ्या सौभाग्यानं मला लाभलेली अशी माझी 'जिवलग सखी' म्हणजे कुमुद... जगासाठी डॉ. कुमुद कानिटकर, पण माझ्यासाठी फक्त 'कुमुद'. कुमुद म्हणजे चंद्राच्या दर्शनानं हर्षभरित होऊन उमलणारं कमळ. ही आमची कुमुदही तशीच प्रसन्न, हसतमुख आणि तेजस्वी आहे आणि कदाचित त्यामुळेच आमची मैत्री गेली ६६ वर्ष टिकून आहे, एवढंच नव्हे तर अधिकाधिक घट्ट होत चालली आहे. या सहासष्ट वर्षात अनेक वळणं वाकणं आली तरी मैत्रीत कधीही अंतराय आला नाही. ती तशीच अबाधित राहिली.

वयाच्या सुमारे सहाव्या - सातव्या वर्षी आमची पहिल्यांदा भेट झाली ती भातुकलीच्या निमित्तानं. दादरच्या हिंदु कॉलनीत आमची घरं समोरासमोर होती आणि मे महिन्याच्या सुट्टीत एकमेकींच्या घरी जाऊन दंगा करायला निमित्त हवंच असायचं. ते मिळायचं बाहुला-बाहुलीच्या लग्नाचं. कुमुदचा बाहुला आणि अरुणाची बाहुली. लग्न अगदी



डावीकडून लेखिका, बागेश्री परीख आणि कुमुद कानिटकर

साग्रसंगीत व्हायचं, इतकं की छोट्या बाबागाडीत त्यांना ठेवून आम्ही चक्क हिंदु कॉलनीच्या चौथ्या गल्लीपासून पाचव्या गल्लीपर्यंत त्यांची वाजतगाजत वरातसुद्धा काढायचो. बहुतेकवेळा आमची धाड पडायची ती कुमुदच्याच घरावर, कारण तिचं घर म्हणजे तिच्या वडिलांनी बांधलेला एक सुबक टुमदार बंगला होता. आजुबाजूला प्रशस्त अंगण, लपाछपी करायला भरपूर झाडं आणि उंच भिंती आणि कितीही मस्ती केली तरी ओरडणारं कुणीही नाही. कुमुदचे वडील प्रा. डॉ. व्ही. एम. भावे हे प्रख्यात वैज्ञानिक होते आणि त्यांचा स्वत:चा इंडस्ट्रियल पर्फ्युम्स तयार करण्याचा घरातच मोठा कारखाना होता. त्या व्यवसायाचं सर्व काम बघण्यात कुमुदची आई - मैनाताई भावे - सतत मग्न असल्यामुळे आम्हाला दटावायला त्यांना वेळच नव्हता.

शाळेत आम्ही अगदी एका वर्गात नसलो तरी अभ्यास करायला घरी एकत्रच बसत असू. कुमुद ही तैलबुद्धी मुलगी असल्यामुळे अभ्यासात, गृहपाठात तिचीच आम्हाला सदैव मदत होत असे. भातुकलीचं

वय सरलं आणि आम्हाला वेगवेगळे विषय खुणवायला लागले. विषय कुठलाही असो, कुठेही जायचं असो, माझी आणि कुमुदची जोडी ठरलेलीच. हिंदु कॉलनीतून निघायचं आणि लोकल ट्रेननं चर्चगेटला जायचं. ईरॉस सिनेमाथिएटरमध्ये जुने इंग्रजी चित्रपट पहायचे, वॉल्ट डिस्नेच्या 'टॉम ॲन्ड जेरी' सारख्या कार्टून फिल्म्स पाहायच्या. हिंदु कॉलनीपासून चालत किंग्ज सर्कलच्या अरोरा चित्रपटगृहात जाऊन उत्तमोत्तम इंग्रजी चित्रपट पाहायचे. कधी नवीन आलेल्या गाण्यांच्या रेकॉर्डस् घेण्यासाठी दादरला जायचं तर; कधी आमच्याच शाळेच्या (किंग जॉर्ज) हॉलमध्ये सतत लागणारी छानछान संगीत नाटकं पाहायची हे अभ्यासाव्यतिरिक्त करायचे छंद जोपासायला मला कुमुदनंच शिकवलं. शिवाय दोघींनाही वाचनाची प्रचंड आवड असल्यामुळे येईल त्या नव्या पुस्तकाचा तात्काळ फडशा पाडायचा तोही कुमुदच्या साथीनंच.

कॉलेजला जायला लागेपर्यंत आम्ही दोघी 'इनसेपरेबल' झालो होतो. इतकं की ती सेंट झेवियर्समध्ये सायन्सला आणि मी रुइयामध्ये आर्टस्ला असलो तरी रोज संध्याकाळी न चुकता भेटायचं आणि रमतगमत चालतचालत माटुंग्याला जाऊन तिच्या आजींना भेटायचं आणि एकमेकींच्या दिवसभरातल्या सगळ्या गोष्टींची उजळणी करायची यात कधी खंड पडला नाही. वार्षिक परीक्षेच्या वेळी तर माझा मुक्काम तिच्याच घरी असायचा. कारण तिच्या घरचं शांत वातावरण आणि तिच्या आईची प्रेमळ देखरेख. आम्ही दोघीही अभ्यासात सारख्याच हुशार असलो तरी एकमेकांशी स्पर्धा करण्याचं कधी चुकूनही मनात आलं नाही. याचं मुख्य कारण कुमुदचा निकोप दृष्टिकोन आणि मृदु स्वभाव. मैत्रिणी-मैत्रिणींमध्येही कधीकधी मतभेद होतात, भांडणं होतात, चिडचिड होते असं म्हणतात; पण आज ६६ वर्षांत कुमुदचं आणि माझं एकदाही भांडण झाल्याचं मला आठवत नाही.

कुमुदच्या स्वभावाचा एक विशेष म्हणजे तिनं एकदा एखादी गोष्ट करायची ठरवली की 'शेंडी तुटो वा पारंबी तुटो' पद्धतीनं तिनं ती शेवटाला नेलीच पाहिजे. मग ती शिक्षणाच्या बाबतीत असो, करियरच्या बाबतीत असो की इतर काही. तिचं उद्दिष्ट तिच्या डोळ्यांसमोर स्वच्छ असतं आणि ते साध्य करण्यासाठी ती कुठलेही प्रयत्न बाकी ठेवत नाही.

मुंबईत ऑरगॅनिक केमिस्ट्री हा विषय घेऊन ती बी.एस्सी. झाली. आणि लगेच स्वप्रयत्नांनी प्रवेश मिळवून बॉस्टनजवळच्या ॲमहर्स्ट येथील युनिव्हर्सिटी ऑफ मॅसॅच्युसेटस्मध्ये एम.एस. आणि नंतर पी.एच.डी. करायला अमेरिकेला गेली. तिथे असतानाच तिला दिलीप कानिटकर हा तिच्यासारखाच तैलबुद्धी तरुण भेटला आणि त्याच्याशी विवाह करून ती भारतात परतली. त्यानंतरची बरीच वर्षं ती तिच्या व्यापात आणि मी माझ्या संसारात गुंतलो असल्यामुळे आमच्या भेटीगाठी कमी झाल्या. शिवाय दिलीपच्या कामाच्या निमित्ताने ती कधी मलेशियात, कधी नायजेरियात, कधी इंग्लंडमध्ये तर कधी अमेरिकेत अशी सतत फिरतीवर असायची. पण कुठेही असली तरी तिच्या आणि माझ्या पत्रव्यवहारात कधीच खंड पडला नाही. किंबहुना एअरमेलनं पत्रं पाठवण्याची सवय मला तिच्यामुळेच लागली. १९६४ पासून सुरू झालेला आमचा हवाई पत्रव्यवहार अगदी आत्ताआत्तापर्यंत म्हणजे ईमेलचा जमाना येईपर्यंत चालू होता. मला कंप्यूटरची ओळखही कुमुदनंच करून दिलेली आहे.

खूप वर्षं ती नाशिकच्या कॉलेजमध्ये आणि नंतर मुंबईच्या जयहिंद कॉलेजमध्ये केमिस्ट्रीची प्राध्यापक म्हणून काम करत होती. तिथेही तिनं आपल्या उत्तम कामाचा ठसा उमटवला होताच, शिवाय तिच्या आवडीच्या काही छंदांच्या क्षेत्रातही तिनं उत्तुंग भरारी घेतली होती. अनेक वर्षं ती पोस्टाची तिकिटं जमवून, त्यांचा विषयवार अभ्यास करून आंतर भारतीय स्पर्धांमध्ये भाग घेत असे आणि त्यात मानाचे पुरस्कार पटकावत असे. दुसरीकडे तिनं नाणी जमवण्याचा छंदही जोपासला, आणि त्यातही नाणकशास्त्राचा अभ्यास करून तिनं एक विशिष्ट स्थान प्राप्त केलं.

तिच्या बुद्धिमत्तेचा खरा कस लागला तो मात्र अगदीच वेगळ्या क्षेत्रात. मुळात तिला संशोधनाची आवड होतीच, पण प्राध्यापकीतून निवृत्त झाल्यावर तिच्या संशोधनाला वेगळंच वळण लागलं. केवळ योगायोगाने ती शिल्पशास्त्र, पुरातत्त्वशास्त्र, मंदिररचनाशास्त्र अशा गहन क्षेत्रांकडे वळली आणि

त्या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय कीर्ती प्राप्त करून घेण्याइतकं महत्त्वाचं काम तिनं गेल्या काही वर्षात केलं आहे.

तिनं ध्यास घेऊन, एकाच विषयाचा पाठपुरावा करून जगाला नव्यानं ओळख करून दिलेलं काम म्हणजे 'अंबरनाथ शिवालय'. मुंबईच्या एशियाटिक सोसायटीकडून तिला हे काम करायला एका वर्षाची अभ्यासवृत्ती मिळाली, पण त्यानंतर मात्र अखंड परिश्रम करून तिनं अंबरनाथच्या शिवमंदिराचा सर्वांगीण अभ्यास केला आणि जवळपास विस्मृतीत गेलेल्या त्या मंदिराला नवजीवन मिळवून दिलं. पुरी बारा वर्ष ती या मंदिराचा अभ्यास करत होती. त्यासाठी तिनं कष्टांची तमा बाळगली नाही. तिथल्या शिल्पांचे फोटो काढणं, त्यांचा अभ्यास करणं, त्यातून नवीन संशोधन उभं करणं आणि त्यावर आधारित पुस्तकं लिहून ती जगभरातल्या शास्त्रज्ञांच्या नजरेला आणून देणं हे महान कार्य तिच्या हातून घडलं आहे. तिनं लिहिलेल्या 'अंबरनाथ शिवालय' या इंग्रजी ग्रंथाला फ्रान्समधील संस्थेचा अत्यंत प्रतिष्ठेचा 'इकुओ हिरायामा' पुरस्कार मिळाला आहे आणि हे पुस्तक मोठमोठ्या विद्वानांकडून नावाजलं गेलं आहे. या क्षेत्रात तिच्या गुरु आणि मार्गदर्शक आहेत त्या श्रेष्ठ कला इतिहासतज्ज्ञ डॉ. देवांगना देसाई असं कुमुद नम्रतेनं सांगते. महाराष्ट्रातल्या मराठी लोकांना मराठीतूनच आपल्या प्राचीन वारशाची ओळख व्हावी म्हणून तिनं 'अंबरनाथ शिवालय' याच नावाचा एक मराठी ग्रंथही लिहिला आहे.

माझ्या आणि तिच्या गाढ मैत्रीला एक वेगळाच पैलूही आहे. तिच्या ग्रंथलेखनात आणि तत्सम बौद्धिक कामांत मी तिची मुद्रितशोधक आणि पुस्तकांची संपादक या नात्यानं सहभागी असते. आमची दोघींची वाटचाल अगदी समांतर झालेली आहे. त्यामुळे आमची दोघींची जोडी अशीही अभंग, 'इनसेपरेबल' झालेली आहे. शाळेत होती तशीच.

✳

## हास्यचित्र



गुण गाईन आवडी

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# A Father Figure To me

**✶ Achala Subhash Desai ✶**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀



Anant Dhondusheth Shirgaonkar is ANNA to me and others who are associated with this gentleman. He is a father figure to me. I was destined to meet Anna of Dabhol with the grace of the late Smt. Shailabala Sathe nee Agaskar who was already working with Anna from Dadar. I was introduced to Anna in 1995 and till date I visit him once a year. He was the founder of 'Sagar Putra Vidya Vikas Sanstha' in Dabhol which looked after the needs of the less fortunate students of the neighbouring villages.

Born on 5th Sept. 1930 in Visapur to poor parents did not get formal schooling. He grew up with self-study and helped fellow students to study. At a very young age he had this drive to do social work especially in the field of education. Politically very active with an urge to get freedom from the British rule, he went to jail several times. He gave up his flourishing medical store and entered the social field full time. All this he could do because of the strong support of his better half Nandini nee Shevanti Ganpat Belvalkar of Shrungartali. Nandini lived to be known as 'Kaki' and was loved and admired by young and old. She was the light in Anna's difficult path of life. He was rightfully given the title of ''Dalit Mitra'' by the Maharashtra State Govt. for the work he did for the downtrodden. He was associated with great leaders, writers and social workers all his life. Now at the age of 86 he has slowed down the pace of social work and retired from the many institutions that he workd for, heart and soul. This strong man has crumbled after the death of Kaki - his better half. Its been 4 years now that he is trying to come to terms of living alone but always ready to welcome visitors.

It was in 1995 that I got involved with Anna's 'Punya Smaran Yojana' where we could give a photo of a departed relative with a small write up and Rs. 1000/- in his name. I did so with the photo of my late father Mr. Anant Vinayak Kirtikar. Students from the boarding affiliated to Sagar Putra Vidya Vikas Sanstha were fed with a sweet in the meal with the interest earned from the collection. Children were asked to stand in the assembly and read out the write up of the departed soul. This initiated each child to public speaking. A good idea indeed! Since then I've been visiting the Vashishthi Kanya Vasati Gruha' Its amazing to see the discipline and quality education given to those girls. They are focused in their work and grow up to be

good individuals. All this happened at the behest of Anna Shirgaonkar.

He has now indroduced the ‘Seven Stars’ to the Vaidya Secondary School and Patil Junior College of Arts & Commerce, Anjanvel. We have sponsored ten girl students for their annual fees. Anna fondly calls us Seven Stars- Dr. Meenakshi Desai, Mrs. Urmila Kothare, Mrs. Adnya Ajinkya Loke, Mrs. Suhasini Kothare, Mrs. Anuradha Talpade, Mrs. Aparna Kirtikar and Mrs. Achala Desai. Anna is working on yet another project at Guhaghar named “Guhaghar Taluka Apang Punarvasan Sanstha.’

Being a historian by passion, he has written many books which speak volumes about the history of the Konkan Region. ‘Historic Dabhol. Present and Future’ is one of them. His hobby of collecting glass bottles of different size and shape and all types of keychains is unique. Its because of Anna, that I’ve come to love the Konkan area. The simple and clean life of the villagers, their love and hospitality and offcourse the abundant bature, keeps calling me every year to Dabhol. Its a yatra we seven stars undertake every year for Anna and his blessings. He too longs to meet us as the visitors have dwindled with his retirement from active social work. He works from home and is prompt in giving guidance to whoever approaches him.

I am praying to the lord to keep him healthy and fit till his last breath. I really feel blessed to be associated with this father figure called ANNA.

✳

## हास्यचित्र



गुण गाईन आवडी

# An Unsung Hero

**✶ Vinod Pradhan ✶**



**Dhwanit Vinesh Talpade**

This is a true story, and the hero is a kid of 10-11 years. It happens this way. My sister who is now above 75 years had never suffered from Diabetes Mellitus. Suddenly while she had gone to Nigdi a place near Pune, she started feeling unquenchably thirsty, and drank a lot of cold drinks and water. Her family realized that something was amiss and on return decided to get her examined by their family doctor.

The doctor advised pathological tests. The tests revealed that the sugar in her blood was 345 mgm (hyperflycemia). The doctor advised some tablets to bring down the sugar along with some instructions on diet.

It was middle of May, schools were closed so the gardson was at home. Son had gone to his office and the daughter-in-law who is a teacher was called to school for some work. She left with instructions to her son to give soup to his grand-mother at a particular time. Only the grand-mother and grandson were at home. At the specified time the grandson went to wake up his grand-mother, thinking that his grandmother was sleeping he tried to wake her up by calling her. However even after 4-5 attempts the grand-mother was not opening her eyes.

Realising something was amiss, without wasting a minute, he called his father at his office asking him to come immediately as his grand mother was not opening her eyes. Next he called his mother in the school with the same message. He didn't stop at that, he knew there was a doctor in the next wing, and he called his number. To his bad luck the doctor had gone out and the doctor's daughter picked up the phone. From the tone of the grandson the doctor's daughter who is not a doctor thought that there was something serious, and came down to their flat. When she saw the state of the grand-mother, she immediately called for an ambulance and then her father who was a doctor.

When they reached the hospital, the RMO immediately checked the blood sugar. The effect of medicine was so strong that the sugar had come down to 20 mgm, this is known as Hypoglycemia. The doctor immediately put her on Glucose infusion. The doctor mentioned that a further delay of 30 minutes would have proved fatal.

The presence of mind of this young man who did not panic nor wait for his grand-mother to open her eyes but kept his coll saved his grand-mother.

The name of this hero is Dhwanit Vinesh Talpade.

✳

गुण गाईन आवडी

# माझी मुलगी

**✶ अपर्णा उदय कीर्तिकर ✶**



**रुचिरा उदय कीर्तिकर**

रुचिरा किंवा बकुळ माझी मुलगी. ४८ वर्षांपूर्वी ही नावे थोडी आगळी वेगळी होती. (आत्या व मावशीने ठेवलेली) पण ती नावे तिने सार्थ केली आहेत असे मला वाटते. वेगवेगळ्या कलात्मक गोष्टींमध्ये असणारी तिची 'रुचि' व 'बकुळीच्या फुलांच्या मंद सुवासाप्रमाणे पसरणारी तिची मित्र-मैत्रिणींमध्ये व नातेवाईकांमध्ये असणारी लोकप्रियता वाखाणण्याजोगी आहे.

तिच्या जन्मानंतर मी बी.एड. करताना थोडा काळ तिला माझ्या माहेरी ठेवले होते. तेथे ती माझे आई-वडील, काका-काकी व सर्व भावंडांमध्ये तिच्या लाघवी स्वभावामुळे प्रिय झाली. नंतरही आईच्या घराजवळील शाळेत असणाऱ्या माझ्या नोकरीमुळे व तिच्या शाळाप्रवेशामुळे तिचा खूपसा वेळ माझ्या माहेरच्या माणसांमध्येच जायचा. बाळाचे पाय पाळण्यात दिसतात; त्याप्रमाणे लहान असताना ती सदैव आरशासमोर उभी राहून वेगवेगळे हातवारे, हावभाव करायची. माझे बाबा मला म्हणायचे, ''माई (म्हणजे मी) तुझी लेक मोठी नखरेल होणार आहे.'' आणि त्याचा प्रत्यय ती शाळेत गेल्यावर आला. शाळेतील सांस्कृतिक कार्यक्रमांतील नृत्यांमध्ये तिचा नेहमी सहभाग असायचा. त्यामुळे रंगमंचाची भिती न वाटता तिच्यात सभाधीटपणा आला. वक्तृत्वस्पर्धा, विज्ञान प्रदर्शन यात तिचा नेहमी सहभाग असायचा.

कलागुण तिच्यात जन्मजातच असावेत. तिची आजी (कै. सौ. वासंती आत्माराम कीर्तिकर) व मावश्या (सौ. प्राजक्ता नं. विजयकर व सौ. वीणा वि. कोठारे) या उत्कृष्ट चित्रकार. तो गुण तिच्यात पुरेपूर उतरलेला आहे.

प्राथमिक शाळेत असताना एका चित्रकला स्पर्धेत तिने साध्या ब्राऊन पेपरवर रंगीत पेन्सिलीने जे चित्र काढले होते त्यात तिची कल्पनाशक्ती दिसून आली. 'माय ड्रीम' या विषयांतर्गत तिने चित्र काढले होते ते 'आकाशातील इंद्रधनुष्याला झोपाळा बांधून त्यावर झोका घेणारी मुलगी'' तसेच आकाशकंदील स्पर्धेत तिने दोन पतंग जोडून सुंदर आकाशकंदील केला होता. दोन्ही स्पर्धांत तिला प्रथम क्रमांक मिळाला होता.

माध्यमिक शाळेत गेल्यावर शाळेने बसविलेल्या एका नृत्यनाटिकेतील तिची परीची प्रमुख भूमिका पाहून कै. सुलभा देशपांडे यांनी तिला त्यांच्या 'चंद्रशाळा' या संस्थेच्या नृत्यनाटिकांमध्ये सहभागी करून घेतले होते. 'अपना हाथ जगन्नाथ', 'दुर्गा झाली गौरी' या नृत्यनाटिकांचे अनेक प्रयोग त्यांनी केले. 'दुर्गा झाली गौरी' या नृत्यनाटिकेच्या १००व्या प्रयोगापर्यंत ती दुर्गेची मुख्य भूमिका करू लागली होती. नृत्याचे तथाकथित शास्त्रोक्त शिक्षण तिने तोपर्यंत घेतले नव्हते. परंतु चंद्रशालेचे नृत्य दिग्दर्शक कै. गुरू पार्वतीकुमारांकडून नृत्याचे व अभिनयाचे धडे तिने गिरविले. १०वी पास होईपर्यंत ती शाळेच्या प्रत्येक नृत्यामध्ये व

नृत्यस्पर्धांमध्ये सहभागी होत होती. खारच्या कै. प्रवीण राणे यांच्या होम क्लबच्या वार्षिक स्नेहसंमेलनातही तिचा काही वर्षे सहभाग असायचा.

अभ्यासात तिला चांगली गती होती; पण चित्रकला ही तिची आवड होती. त्यामुळे १० वीत चांगले गुण मिळवूनही तिने जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये प्रवेश घेऊन 'कमर्शियल आर्ट' मध्ये पदवी प्राप्त केली. अंतीम वर्षात तिने छायाचित्रण हा प्रमुख विषय घेतला होता. त्यामुळे छायाचित्रणाची तिला आवड असून त्याची उत्तम जाण आहे.

माझ्या गैरहजेरीत ती घरी वेगवेगळे खाद्यपदार्थ करून धाकट्या भावांना जेवायला घालायची. त्यामुळे स्वयंपाकाची आवड तिला पूर्वीपासूनच होती. त्यात लग्नानंतर नवरा मिळाला तो खवय्या. स्वत:चे रेस्टॉरंट असले तरी वेगवेगळ्या मोठमोठ्या रेस्टॉरंटमध्ये जाऊन वेगवेगळ्या देशातील खाद्य संस्कृतींशी तिची ओळख झाली. ते पदार्थ स्वत: करून मुलांना खायला घालायची तिच्यात आवड निर्माण झाली.

दोघांनाही प्रवासाची आवड असल्याने तिने परदेशात खूप प्रवास करून तेथील संस्कृतीचे निरीक्षण करून खाद्यसंस्कृतीचा आस्वाद घेतला. तसेच तेथील सांस्कृतिक ठेवा व निसर्गाचा आस्वाद घेऊन छायाचित्रण केले.

ज्वेलरी डिझाइन, केक मेकिंग आणि केक डेकोरेशन, चॉकलेट मेकिंग आणि डेकोरेशन असे छोटे छोटे अभ्यासक्रम तिने पूर्ण केले आहेत. त्यामुळे नवीन नवीन डिझाईनचे अलंकार ती स्वत: बनवून घेते. कलात्मक दृष्टिकोन असल्याने माझ्या भावंडांच्या मुलामुलींच्या लग्नात दागिन्यांची निवड व खरेदी, तसेच कपड्यांची खरेदीही तिच्या सहभागाने केली गेली.

आता जरा मोकळीक मिळत असल्याने आपली अपुरी राहिलेली आवड जोपासण्यासाठी ती कथ्थकचे रीतसर शिक्षण घेऊन कार्यक्रमात सहभागी होते. तसेच मित्र-मैत्रिणींच्या विनंतीवरून विविध प्रकारची सजावट केलेले केक, तसेच चॉकलेट्स करून त्यांना पुरविते.

मुले शाळेत असेपर्यंत जातीने तिने त्यांच्या खाण्यापिण्याकडे, आवडी-निवडीकडे, संस्कारांकडे लक्ष दिले. फुटबॉल खेळण्यासाठी व शाळेतील स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी दोघांनाही प्रोत्साहन दिले. आता त्यातून जरा मोकळी झाल्यावर तिने सामाजिक मैत्रीचे संबंध वाढविण्याकडे लक्ष दिले. मुळचाच लाघवी स्वभाव असल्याने तिचा मित्र-मैत्रिणींचा परिवारही खूप मोठा आहे.

ती सुंदर नसेल; पण तिचा चेहेरा फोटोजेनिक आहे. टापटीप राहण्याची आवड असल्याने कुठेही जाताना प्रसंगानुसार स्वत: डिझाईन केलेले कपडे व त्यावर योग्य असे अलंकार घालून ती स्वत:ला नेहमी प्रेझेन्टेबल ठेवते. त्यामुळे तिचे सर्वांना कौतुक वाटते. अशा माझ्या मुलीचा मला अभिमान वाटतो.

*

**कविता**

## 'काळ्या पैशाचं पोर'

**-हेमंत विनायकराव तळपदे**

जन्म झाला जेव्हा त्याचा सारे आप्तजन आनंदिले
वाटलेल्या माव्याच्या पेढ्यांनी कौतुक घरोघरी जाहले
पाळणा, बाबागाडी, तीनचाकी त्याने मनसोक्त उपभोगिली
काळ्या पैशाच्या किमयेने ऐहीक सुखे त्यास लाभली.
बाप ओरबाडत होता सरकारी नोकरीचा फायदा
मुलगाही उमजत होता काळ्या पैशाचा कायदा
उर्मटपणा रुजत होता जवानीच्या त्या उंबरठ्यावरी
पैशाचा मदहोश वाढे, शिक्षणाकडे दुर्लक्ष होई.
अनेक उपद्व्याप वाढले धंदेही अनेक झाले
बापाच्या काळ्या पैशावर अनेक सौदे सहजी जाहले.
परि काहीतरी चुकलेच कंपनीने तगादा लावला
पैसे वेळेवरी न पहुचता यमराज घरी उभा ठाकला.
तीन गोळ्या सुसाटत सुटल्या छाती अन् डोक्याचा भुगा झाला
काळ्या पैशाचा ठिसूळ इमला जमिनीत नामशेष झाला.

लेख

# अपंगत्व: एक आजार की अवस्था

**✶ प्रणिता प्रभाकर ✶**

व्यक्ती तितक्या प्रकृती ही म्हण तंतोतंत खरी आहे.समाज हा अनेक प्रकारच्या व्यक्तींचा मिळून बनलेला असतो. त्यात लहानांपासून थोरांपर्यंत सर्व जातीजमातीचे, वेगवेगळ्या चणीचे, उंचीचे तसेच सामर्थ्य/कौशल्य (शारीरिक आणि मानसिक) असलेले लोक येतात.परंतु खेदाची बाब अशी आहे की ज्या व्यक्तींचे शारीरिक किंवा मानसिक सामर्थ्य /कौशल्य नैसर्गिकरित्या कमी जास्त अंशाने कार्यक्षम असते अशा व्यक्तींना समाजात स्थानच मिळत नाही. किंबहुना त्यांची गणती होताना दिसत नाही. अशा व्यक्तींच्या माथी 'अपंग' हा शिक्का मारलेला दिसतो.

काही वर्षांपूर्वी म्हणजे साधारण पन्नास एक वर्षांपूर्वी अपंग व्यक्ती म्हणजे आजारी किंवा वेड लागलेली व्यक्ती असे संबोधले जाई. तेव्हा त्यांना एखाद्या खोलीत कोंडून ठेवले जाई. परंतु जसजशी वर्षे पुढे निघून गेली तसतशी सुधारणाही होत गेलेली आपण पाहिली. अपंगत्व म्हणजे एकप्रकारचा आजार आहे अशी कल्पना आजपावेतो आपल्या समाजात प्रसारित होती. परंतु ती मिथ्या आहे हे घसाफोड करून सांगितले तरी ते अमान्यच आहे. परंतु आता काही अंशी सरकार आणि समाज जागृत झालेला आहे असे वाटते.

अपंगत्व हा आजार नसून ती शारीरिक किंवा मानसिक अवस्था आहे. ही अवस्था जन्मापासून असते किंवा जन्मानंतर काही वैद्यकीय कारणांमुळे प्राप्त होते.ह्याची कारणमीमांसा आपण करूयात. गरोदरपणात स्त्रीला प्रकृती अस्वास्थ्यामुळे औषधांचे सेवन करावे लागणे , तिला दारूचे किंवा सिगारेटचे व्यसन असणे किंवा मनावर एकप्रकारचे दडपण आल्यामुळे गर्भाच्या वाढीवर त्याचा परिणाम होतो. प्रसूती होताना चिमट्याने प्रसूती होणे, बाळाच्या गळ्याभोवती नाळेचे वेटोळे असणे, बाळ विलंबाने रडणे किंवा जन्मत:च कावीळ झाल्याने काचेच्या पेटीत (Incubator) ठेवणे ,बाळाच्या डोक्यात ताप जाऊन त्याला आकडी येणे किंवा वंशपरंपरागत आजार असणे, नवराबायकोचे रक्तगट न जुळणे; ही काही जुजबी आणि ढोबळ कारणे आहेत. आकडी आल्यानंतर त्यावर डॉक्टर औषधोपचार करतात. परंतु आकडीमुळे शरीराच्या ज्या काही अवयवांवर परिणाम होतो त्यासाठी भौतिक किंवा वाक्‌उपचारांची गरज असते. औषधांची गरज लागत नाही. ज्याला आपण इंग्रजीत फिजिकल थेरपी किंवा स्पीच थेरपी म्हणतो. अशाप्रकारे बाळाच्या वाढीत काही न्यूनता दिसली तर प्राथमिक प्रतिक्रिया ही नकारार्थी असते. बाळाचे आईवडील आणि इतर नातेवाईक मंडळी हे सत्य पचवू शकत नाहीत. त्यामुळे बऱ्याचदा बाळाला सोडून देतात किंवा त्याचा परित्याग करतात. इतकेच नव्हे तर जन्म देणाऱ्या आईला दूषण देऊन घराबाहेर काढतात. ह्या गोष्टी समाजात घडलेल्या आहेत आणि घडत आहेत. त्यामुळे वाचकांनी ही अतिशयोक्ती आहे असे कृपया समजू नये.परंतु काही कुटुंबे आलेल्या प्रसंगाला धीरोदात्तपणे सामोरे जाऊन,जंग जंग पछाडून मग त्या बाळावर उपाययोजना करतात. हे सर्व करत असताना आईवडीलांसोबत घरातील इतर मंडळींनीसुद्धा बाळाच्या संगोपनाची जबाबदारी उचलणे महत्त्वाचे आहे. खास करून बाळाची भावंडे. त्यांना समजावून सांगणे म्हणजे तारेवरची कसरत होय. मग अशा वेळेस आईवडीलांमध्ये दुफळी माजण्याचा संभव असतोआणि पर्यायाने

कुटुंबाची वाताहत होते. तेव्हा परिस्थितीचे भान ठेऊन संसाराचा गाडा ओढणे हे महत्त्वाचे आणि अपरिहार्य आहे. हे सर्व होईपर्यंत बाळाचे शाळेत जाण्याचे वय निघून गेलेले असते त्यामुळे बाळ शिक्षणापासून वंचित राहाते. तेव्हा अशा परिस्थितीत जेथे भौतिक उपचार किंवा वाक्‌उपचार घेतले जातात तेथील तज्ज्ञ मंडळी किंवा बालरोगतज्ज्ञांनी वेळीच बाळांच्या पालकांना शिक्षणासंबंधी जागरूक केले तर वेळ, वर्ष आणि मेहनत फुकट जाणार नाही.अशा वेळेस पालकांना काऊन्सिलरची व समुपदेशनाची जास्त गरज असते. बाळाला थेरपीसाठी घेऊन जाताना किंवा परतताना आजूबाजूची माणसे आश्चर्यकारकरित्या टक लावून आपल्याकडे बघत असतात. अशा वेळेस त्यांची नजर न चुकवता त्यांना आपल्या बाळासंबंधी माहिती देणे स्तुत्य वाटेल. हे एकप्रकारचे समाज प्रबोधनाचेच काम आपण करतोय अशी भावना पालकांच्या मनात उपजली पाहिजे. शेजारपाजारचे लोक किंवा सोसायटीमधील लोक काय म्हणतील किंवा हसतील हा न्यूनगंड मनात न ठेवता आणि पर्यायाने समाजापासून परावृत्त न होता उलटपक्षी वर उल्लेख केल्याप्रमाणे समाजप्रबोधनाचे काम तर होतेच; त्या परीस मुलाचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते ती आपली स्वत:कडूनच. वेगळ्या प्रकारचे शारीरिक/मानसिक कौशल्य किंवा सामर्थ्य असणाऱ्या व्यक्तींमध्ये आत्मभान निर्माण करणे जरुरीचे आहे.

ह्याच्या सोबत त्यांना शिक्षणाचीही गरज असते. इतकेच नव्हे तर; तुमच्या आमच्यासारखे विचार करण्याची ताकद आणि भावनाही असते. हे आपण लक्षात घेणे जरुरीचे आहे. ज्यांच्याकडे मानसिक स्वास्थ्य आणि थोड्याफार फरकाने शारीरिक सामर्थ्य असते अशा विद्यार्थ्यांना विशेष म्हणजे स्पेशल शाळेत न घालता सर्व साधारण शाळेत घातले पाहिजे आणि तो अट्टाहास असावा. त्यांना त्यांच्या अनुषंगाने शिकवले तर जरूर त्यांच्यात प्रगती झालेली आपल्याला दिसून येईल.असे केल्याने खऱ्या अर्थाने समाज सुशिक्षित आणि प्रगत होईल. ह्याच्या सोबत जर आपण आजुबाजूच्या परिसराचा कायापालट केला तर सर्वांचे आयुष्य सुकर होईल. उदा. चढउतार करण्याकरिता उतरंडीची (ramp) व्यवस्था असणे तसेच त्यांना सहजगत्या आत्मसात करता येण्यासारख्या सुविधा असणे जरुरीचे आहे. त्यांच्या कुवतीनुसार शाळेत, कॉलेजमध्ये तसेच व्यवसायाच्या ठिकाणी सोई होणे महत्त्वाचे असते जेणेकरून त्यांना त्यांच्या दैनंदिन जीवनात कोणतीही बाधा येणार नाही.

आज सरकार आणि समाजाने ह्यासंबंधी अनेक घोषणा केल्या आहेत. परंतु त्या अजूनही बासनातच असल्यासारखे वाटते. सरकारने अशा विविध प्रकारे कार्यक्षम (differently abled) असणाऱ्या व्यक्तींकरिता राखीव जागा,व्हीलचेअर वापरणाऱ्या व्यक्तींसाठी उतरंडीची योजना किंवा सार्वजनिक ठिकाणी विशिष्ठ प्रकारच्या टॉयलेट्‌सची व्यवस्था असे अनेक उपक्रम राबवलेले पाहिले. परंतु शेवटी हे उपक्रम म्हणजे तोंडाला पाने पुसली असे वाटते. हेही नसे थोडके. आता असे म्हणण्याची वेळ आली आहे, कारण की फक्त योजना आणि सुविधा जाहीर करून चालत नाही तर; त्याकरिता दृष्टिकोन बदलावा लागतो. आपल्याकडे समाजकल्याण विभाग ( social welfare department ) म्हणून सरकार कडे एक खाते आहे.ह्या खात्यातर्फे अनेक उपक्रम चालविले जातात. परंतु खेदाची बाब अशी आहे की, त्या उपक्रमांच्या अंमलबजावणीकडे लक्ष देण्यास खात्यातील कोणत्याही व्यक्तीस वेळ नसतो आणि एखाद्याने जर त्याचा पाठपुरावा केलाच तर उडवाउडवीची उत्तरे देऊन त्या व्यक्तीस थकवतात. परंतु त्यांना त्याचे सोयरसुतक नसते.सरकारने ज्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत त्याचे जतन करणे हे आपले कर्तव्य आहे.

तेव्हा आपण प्रत्येकाने एक सुजाण नागरिक म्हणून येथे कानाडोळा करता कामा नये.अशा वेळेस जर एखाद्या NGO ने ह्यात लक्ष घातले आणि खरोखरच समाज प्रबोधनाचा वारसा उचलला तर हेही नसे थोडके.

*

लेख

# "LOG KYA KAHENGE??" - THE QUESTION THAT STILL HAUNTS

✶ *MIHIKA NAVALKAR* ✶

India has always been a patriarchal country. It is very difficult to conclude whom to blame this on – should we blame it on the Mythological *Stories* told to us? Or to all those who blindly followed,believed and enforced what was being told to them?

Since eternity, in our society women have been forced to occupy a secondary place in relation to men. Right from the Ramayana and Mahabharata women have always been at the receiving end. Men project the dominant viewpoint as universal truth. And over the years it has been just followed by objectifying women and treating them as mere doormats or punching bags. Since the very beginning of time,the doors of educational, economic, social, political and cultural opportunities were gradually closed for them.

The birth of the son was an occasion to rejoice and that of a girl of grief. Female Foeticide is the worst kind of torture and violence that womankind could be possibly facing. The thought of murdering an unborn child in itself gives you jitters, people who actually do that are no less than cold blooded murderers. Even today, we still have people coming up to us and saying, ***"Ohh its a girl, dont worry next time it will be a boy"*** or ***" I want a boy, cause he is the one who would take my name ahead" , "Ladka hua hai, Maine is ghar ko warris diya hai"***. Whats more surprising is that we feel the illiterates are the ones propagating this, but, unfortunately its also a very good amount of the highly educated class who go to an extent of making such demeaning remarks and demands. Be it the deepest of the rural areas or the modern cities , killing the girl child is still rampant across the country. Its sad to see people becoming so shallow-minded. They say a woman only is a woman's best friend, but since ages we have had examples of women destroying women as well. Be it the saas-bahu drama over the bahu bearing a daughter, the domestic violence for the greed of dowry or a friend demeaning the character of another because of jealousy. Over the years this seems to be decreasing gradually with more and more educated girls growing up to be responsible women. The day is not to far when our country will be free of female foeticide.

Inspite of the all this, in the age of a male dominated society women of caliber have surpassed the skills of men. The visible achievements of women as teachers, doctors, pilots, politicians and explorers etc. have demolished the patriarchal notions of confining women's role to home. Today we have women like **Kiranjit Ahluwalia** who fought against domestic violence, **Sunitha Krishnan** a victim of a horrific gangrape when she was only 16, she now runs a successful NGO that rehabilitates sex trafficked women**,** despite facing death threats**, Indra Nooyi**,the current chairman and CFO of the second largest food and beverage business, PepsiCo, **Chanda Kochar,** currently the MD & CEO of india's largest private bank ICICI Bank, **Suhasini Mulay,** who got married only when she felt the time was right, at the age of 60,**Nandita Das** known to do roles that break stereotypes, she started her own campaign 'Dark is Beautiful' and never endorses any fairness creams**,Sushmita Sen,** who adopted her first child when she was 25 and is a single mother of two beautiful daughters now,**Neena**

**Gupta,** she raised a child outside of a wedlock way back in the 1980s, **Bachendri Pal,** back in 1984, when not many women in India had the freedom to do what they wanted to, she became the first Indian woman to climb Mount Everest. In a society that has seen women as the weaker and the second sex, here's a shoutout to the ones who decided to live the way they wanted to, no matter how crazy or rebellious. Isn't it evident that it is difficult to progress if we restrict women to specified roles and subordinate them to men. Even to raise children in today's environment and to make them fit to face the challenges of a competitive future, a woman needs to be fully aware of her choices and decision-making.

Apart from the violent torture from the society, their personal freedom in respect of movement, dress, diet, marriage is dominated by men too. Women also began to be enslaved. They were equated with cattle or commodities that could be sold and purchased. Various obligations, restrictions and regulations were imposed on them and different penalties and punishments were prescribed if a woman violated them. Women even today are judged by the kind of clothes they wear and the kind of job they do. Why is it that even today every daughter in the country is expected to cook or know all the kitchen chores or is expected to run the house. "***Naari hi ghar ka dekhbhal karti hai"*** - this statement is echoed through every household. Are sons so incompetent that they cant even cook for their family or take care of the house ? Are men suppose to be only bread-winners? Today women are capable to be both the home-maker and bread winners. They have the capacity to run the family physically, emotionally and monetarily on their own. Women have always been side-lined and over-shadowed in spite of the fact that they are numerically half of the world's population.This has resulted in women being unable to take a dignified place as a free and independent individuals associated with men on an equal intellectual and professional wavelength.

Moreover, every man wants a wife who is beautiful, well-educated and fashionable , but these are the same men who expect their wives to slog in kitchen, take care of kids and cater to every other homely responsibility all on their own. Men being the more "dominant" gender in our society it is equally their responsibility to share the load with their wives in every aspect. Of course with changing times , we also find liberal and open-minded men who do treat women as equal and share their responsibilities. They also give them a helping hand to manage home, family and work irrespective of what profession the woman belongs to or even if she is a home-maker.

Sadly , women even today are still a victim to a lot of things. They fall victim to the society , to their friends and family and sometimes even to themselves. A young girl is still told who she should be friends with and that what she wears would define her character. Boys can roam freely till late night, oh but its not safe for girls to be out for so long. Yes,it is not so easy, to set your own boundaries, make your own choices and rise above people 's( judgement. But thats what a woman needs to do- ***STAND UP*** for herself.

When the most loved and worshipped superstar posts an open letter or a video in favour of women, thats when it catches everyones eye, and that is how maybe just a slow change but indeed a change would happen. As Amitabh Bachchan rightly said to all women out there- ***"People will talk. They shall say some terrible things. But that doesn't mean you have to listen to everyone. Never ever worry about* – LOG KYA KAHENGE?."**

✳

## वात्रटिका

### अपशकून

दिवसातून सतरांदा मांजर जायची आडवी,
प्रत्येक वेळी सात पावलं पाठी जायचा अवी.
सरतेशेवटी मांजर त्याने सरळ पाळली घरात,
आता सारखी मांजर जाते पाठी पावलं सात.

**-डॉ. सुमन नवलकर**

# बाल्कनीतून

✶ नंदकुमार कृ. विजयकर ✶

मी घरांचे दोन प्रकार मानतो. एक बाल्कनी असणारे आणि दुसरे बाल्कनी नसणारे. आणि मग पर्यायाने ज्यांच्या घराला गॅलरी किंवा बाल्कनी असते, त्यांना मी भाग्यवान समजतो. बिन बाल्कनीच्या घरात राहाणारे थोडे कमनशिबीच! ज्या कोणी स्थापत्यतंत्रज्ञाने घराला प्रथमच गॅलरी जोडली त्याच्या कर्तृत्वाला खरोखरच दाद दिली पाहिजे. म्हणजे कसं आहे पहा. घराला खिडक्या असतात. त्यातून बाहेरचं जग दिसतं. हवा, उजेड आणि कधी कधी पावसाचे शिंतोडे खिडकीतून आत येतात. पण चार भिंतींच्या बंदिस्त जागेतून थोडं बाहेर येऊन बाहेरची मोकळी हवा खायची असेल तर बाल्कनीसारखा दुसरा पर्याय नाही. बरं; ऊन, पावसापासून थोडंफार संरक्षणही मिळतं. बाल्कनी कशी ऐसपैस असावी. स्वच्छ आणि मोकळी. पण बहुधा घरातील टाकाऊ माल गॅलरीत पडलेला असतो. मुलांचा खेळ, सायकली, झडलेला झाडू, फाटका फडका... असं बरंच काही. कपडे वाळत टाकायची तर ही हमखास जागा. त्यात फुलझाडं असतात. लहानमोठ्या कुंड्या, काही धडक्या काही फुटक्या. फुलझाडं असावीत, नाही असं नाही. पण कधी कधी त्याचा अतिरेक होतो. संपूर्ण गॅलरी हिरवी झापडं लावल्यागत पानांनी भरून गेलेली असते. काही महाभाग तर बाल्कनी काचा लावून बंद करतात. काहीजण गॅलरीची किचन बनवतात. किचनची बेडरूम बनवतात; काय वाट्टेल ते करतात. आता मुंबईसारख्या मोठ्या शहरात जागेचे भाव आकाशाला भिडलेले. त्यात बिल्टअप, सुपरबिल्टअपच्या जंजाळात जागेचा संकोच झालेला. मग असे उपद्व्याप केले जातात. पण मला मात्र वाटतं, बाल्कनी ही बाल्कनीच राहायला हवी.

बाल्कनी कशी प्रशस्त असावी. मोजक्याच वस्तू त्यात असाव्यात. एक आरामखुर्ची घालून सकाळचा पेपर वाचता वाचता, गरम गरम चहाची मजा चाखावी. बाजूला एक छोटीशी रॅक असावी. त्यावर दोन चार पुस्तकं, थोडी लेखनसामग्री. म्हणजे सवडीप्रमाणे लेखन, वाचन करावं. नाहीतर बाहेरचं जग न्याहळत स्वस्थ बसावं. आकाश पाहावं- सकाळचं, रात्रीचं. आता सभोवतालच्या टॉवरानातून आकाशाचा एक चतकोर दिसला तरी समाधान मानून घ्यायचं. हे सगळं स्वप्नवत् वाटतं आणि हे माझं स्वप्न तसं अपुरंच राहिलं. कारण आमच्या घराला गॅलरी नाही हे दुर्दैव. मनासारखी गॅलरी नाही ही खंत बाळगून होतो.

लहानपणी शाळेला सुट्टी पडली की, मी आजोळी राहायला जात असे. आम्हा सर्व भावंडांचा गोतावळा तिकडे जमे. मामाचं टोपीवाला लेनमधील माझं सर्वात आवडतं घर. पहिल्या मजल्यावर दोन गॅलेऱ्या होत्या. जेमतेम २/३ माणसं उभी राहू शकत. बरं गॅलरी अर्धा एक फूट बाहेर आलेली. पण तिथे उभं राहून गल्लीची दोन्ही टोकं स्पष्ट दिसत. गॅलरीला मोराचं नक्षीकाम केलेले लोखंडी कठडे होते. मी जेव्हा जेव्हा मोराच्या पिसाऱ्यात पाय ठेवून चढायचा प्रयत्न करत असे त्यावेळी मागून हटकून कोणीतरी हटकायचं. 'अरे, वर चढू नकोस. पडशील' माझा सारा वेळ गॅलरीत उभं राहाण्यात जात असे.

गल्ली, गॅलरी आणि मी असं मेतकूट होतं. गल्लीचा दिनक्रम ठरलेला असायचा. सुरवात वासुदेवाच्या स्वारीने होई. वासुदेवाची ललकारी, घंटांचा किणकिणाट आणि बासरीचे स्वर कानी पडले की आमची गॅलरीकडे धाव असायची.

## वात्रटिका

### नवीन

एक टी.व्ही. सिरियल, चालली वर्ष तीन,
प्रेक्षक कंटाळून म्हणाले, 'दाखवा काही नवीन'
सिरियलने मारली मग पंधरा वर्षांची उडी,
नवीन चेहऱ्यांत प्रेक्षकांना वाटू लागली गोडी.

**-डॉ. सुमन नवलकर**

आमचं घर गल्लीच्या मध्यभागी होतं. तशात त्या दोन गॅलऱ्या. त्यामुळे डोंबारी, पोतराज, गारुडी, फेरीवाले सर्वांचा मुक्काम आमच्या घरासमोर असायचा. शिवाय आण्या दोन आण्याची हमखास मिळकत करण्याचं ते एकमेव स्थान होतं. डोंबाऱ्याची मुलं खेळ संपल्यावर पैशासाठी पितळी परात फिरवायचे तेव्हा समोरच्या चाळीतून डोकावणारी डोकी एकेक करून आत जायची. आम्हा मुलांचा सुट्या नाण्यांसाठी मामामागे लकडा लागायचा. मग दोन चार नाणी मिळाली की ती गॅलरीत उभं राहून बरोबर त्या परातीत टाकण्याची आमची धडपड सुरू व्हायची. डोंबाऱ्याच्या पाठोपाठ कडकलक्ष्मी यायची. वाकड्या वेताच्या छडीने ढोलकीवर घासताना जो टर्रऽऽऽ टर्रऽऽऽ आवाज व्हायचा, त्याने छातीत कापल्यासारखं वाटायचं. पोतराजच्या चाबकाचे फटके आणि कडकलक्ष्मी डोक्यावर मखर घेऊन अंगावर धावून आल्यावर पोतराजची उडालेली घाबरगुंडी पाहून आम्ही घरात पळत होतो. दुपारी गल्लीत एक वेडी म्हातारी बाई येई. ती आपल्या चिरक्या आणि कमालीच्या कर्कश आवाजात एकच गाणे म्हणायची, 'खायाला नाय मज देत, बाई मी कुणाची गं' असं म्हणताना ती कमरेत वाकून जोराने मूठ जमिनीवर आपटायची. या बाईला कोणीही भीक घालत नसे. 'आला पेपरमिंटवालाऽऽ दोन पैशाला घेऊन आलाऽऽऽ' अशी ललकारी ऐकली की, गल्लीत बाळगोपाळांची हीऽऽ झुंबड उठायची. हा पेपरमिंट विकणारा माणूस चिनी दिसायचा. पेपरमिंटचे छोटे मोठे तुकडे, रासबेरी, ऑरेंज, मींट असे अनेक स्वाद आणि रंगातले हे पेपरमिंट आमचं मोठं आकर्षण होतं. हा माणूस पेपरमिंटबरोबर सिनेमाची छोटी मोठी हँडबिलं द्यायचा. याचंही मोठं अप्रूप वाटत असे.

गल्लीत अनेक फेरीवाले यायचे. कल्हईवाला, वसईचा भाजीवाला, टाकी लावणारी बाई, चाकू सुरीला धार लावणारा अशा कोणाच्या ना कोणाच्या हाळ्या चालू असायच्या. पण एका आवाजाने मात्र माझी पाचावर धारण बसायची. अनाथाश्रमाचे बँडपथक प्रभातफेरीला यायचे. गल्लीत कुठलाही आवाज आला की गॅलरी गाठणारा मी बँडचा आवाज आला की, लपण्यासाठी आंघोळीची खोली गाठत असे. 'नंदा, ऑरफनेजवाले आलेत. अभ्यास करत नाहीस, मस्ती करतोस. थांब तुला त्या मुलांबरोबर पाठवून देतो' असं मामा, मामी, आजी कोणी ना कोणी मला भीती घालत असते. तिकडे सर्व मुलं एकत्र राहातात. स्वतःची कामं स्वतः करतात. नियमित व्यायाम आणि अभ्यास करतात. रविवारी प्रभातफेरीला निघतात. हे सर्व मला ठाऊक झालं होतं. एकदा मनाची तयारी केली होती. समजा त्या बँड पथकातून फिरावं लागलं तर तो लोखंडी त्रिकोण वाजवायचा असं मनोमन ठरवलं होतं. टोपीवाला लेनमधील गणेशोत्सव म्हणजे आमच्या आनंदाचा अत्युच्च क्षण. मांडव घातला जाई. वरून ताडपत्रीने तो बंद केला जाई. त्या मांडवाचा मध्यभाग बरोबर आमच्या गॅलरीसमोर येई. मध्यभागीच स्टेज उभारलं जाई. मांडवाच्या ठराविक उंचीमुळे गॅलरीचा खालचा दोन अडीच फुटाचा भाग मोकळा राही. गॅलरीत खाली बसून त्या उघड्या जागेतून सर्व कार्यक्रम बघता येत. पण घरातली मोठी माणसं आम्हा बच्चे लोकांना तिकडून हुसकावून लावत. 'तुम्ही खाली जा पाहू. इकडे गर्दी करू नका.'

मनासारखी बाल्कनी मला अमेरिकेत मिळाली. रोमाकडे चॅपलहिलला ३/४ महिन्यांचं वास्तव्य होतं. अवाढव्य अपार्टमेंट आणि ऐसपैस गॅलरी. मी एकदम खूष झालो. सकाळ, संध्याकाळ जेव्हा वेळ मिळेल तेव्हा माझा मुक्काम गॅलरीत असे. चॅपलहिलचा परिसर खूपच निसर्गरम्य होता. भरगच्च हिरवाई. उंच उंच झाडी आणि पक्ष्यांचा किलबिलाट. सकाळी सकाळी एक तरुण मुलगी जॉगिंग करताना पाहात असे. समोरच्या रस्त्यावरून धावत जाई. स्पोर्टस्

**कविता**

## तुझ्याविना

**- सौ. विजयश्री अ. नवलकर**

दयाघना ईश्वरा प्रार्थिते करुणा कर मजवरी
मम 'पुत्रारे' तू परमेशा पूर्ण शतायु करी
तूच सांग देवा अन्न आणि धनावर कोण जगते?
पुत्र प्रेमावाचुनी मातेस जग शून्यच रे वाटते ।।१।।

मातेच्या प्रेमावाचून दुसरे काहीही खरे नसते
पुसे माता उदरी येऊनी विसरलास कसा माते
जीव असा हा कुडीत घेऊनी मी वृद्धाश्रमी राहते
बालपणीची माया अन् प्रेम, असे खोटे का असते।।२।।

गरम उदक अंगावर पडून, भाजलास तेव्हा
आठव तुरे तुझी कुणीरे कशी केली असेल सेवा
बालपणी पडत होतास, रोज मला कशास पाया
प्रेम कसे आटले तुझेरे येई का कधी रे माया।।३।।

विवाहबंधनात पडूनी प्रेम विरूनी कारे जाते
विचार कर एकदाच, मातेचे प्रेम कसे असते
असेच जग असते म्हणूनी म्हणती 'यशवंत' कवी
'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी'।।४।।

ड्रेसमध्ये तिचा शिडशिडीत बांधा खूप आकर्षक दिसायचा. धावताना तिची पोनी टेल उडायची. तिला रोज सकाळी पाहायची मला सवयच लागून गेली. एक दिवस तिला यायला बराच उशीर झाला. लांबून येताना ती दिसली. पोटाजवळ गळ्यात कसलीतरी पिशवी अडकवलेली दिसत होती. मी निरखून पाहू लागलो. जवळ आल्यावर लक्षात आलं, तिनं आपल्या बाळाला कांगारू बॅगमधून आणलं होतं. म्हणजे ती एका मुलाची आई होती? विशेष म्हणजे त्या पिलाला गळ्यात अडकवून ती नेहमीप्रमाणेच धावत होती. खरोखरच मी त्या अमेरिकन फिटनेसला मनोमनी सलाम केला.

समोरच्या झाडावर एका हमिंगबर्डचं घरटं होतं. हा पक्षी सारखा गॅलरीच्या कठड्यावर तरंगत येऊन बसायचा. मी कोपऱ्यात आरामखुर्चीवर बसून त्याची गंमत पहात असे. पण हळुहळू त्याच्या फेऱ्या कमी होत गेल्या. नंतर तो यायचा थांबला. बहुधा त्याला माझं रिकामटेकडेपण आवडलं नसेल! एकदा दुपारी त्या कॉलनीत दोन पोलीस व्हॅन आल्या. त्यातून चार पोलीस खाली उतरले आणि चारही दिशेला धावले. बरीच गडबड, धावपळ चालली होती. थोड्यावेळाने दोन पोलीस ऑफिसर एका बलदंड काळ्या माणसाला पकडून आणताना पाहिले. तो माणूस उघडाबंब होता. पोलीस ऑफिसर चांगलेच धट्टेकट्टे होते. पण तो काळा माणूस एवढा अवाढव्य होता की, चार माणसांना भारी पडला असता. जाताना त्याने वर माझ्याकडे पाहिलं. तो असा काय पाहात होता जणुकाही मीच पोलीसांना बोलावून त्याला अटक करवली होती. त्यानंतर दोन दिवस मी बाल्कनीत जायचंच बंद केलं.

अमेरिकेहून भारतात परतलो आणि बाल्कनीच्या सहवासाला मुकलो. खिडकीतून बाहेर पाहिलं. या अवधीत समोर दोन टॉवरचं बांधकाम चांगलं १५ व्या मजल्यापर्यंत आलं होतं. या टॉवरला बाल्कन्या होत्या. चकचकीत स्टीलचे कठडे आणि काचेचे आच्छादन त्यामुळे त्या प्रशस्तही वाटत होत्या. मनात उगाच एक भिती भिरभिरली. उद्या या उंच उंच बिल्डिंगमध्ये लोक राहायला येतील. बरोबर लहान मुलं असतील. त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ग्रीलची सुविधा पुरवणं आवश्यक होतं. पण बिल्डर लोक कधीही अशा गोष्टींचा विचार करत नाहीत. आणि मागाहून लोक आपापल्या मर्जीनुसार ग्रील काम करतात. त्यामुळे संपूर्ण इमारत विद्रूप दिसते. अमेरिकेहून येऊन बरेच दिवस झाले. पण तिकडची बाल्कनी सारखी स्वप्नात यायची. तो हमिंगबर्ड माझ्या डोक्यावर तरंगायचा. पोनीटेलवाली इकडून तिकडे धावताना दिसे. त्या काळ्या माणसाने डोळे वटारून माझ्याकडे पाहिलं आणि मी भानावर आलो. कधी कधी असं वाटायचं; ती बाल्कनी उचलून इकडे आपल्या घराला जोडली तर काय बहार येईल... आणि मग आजुबाजूच्या परिसराचं काय? जाऊ दे कल्पना कराव्या तेवढ्या थोड्या. असो, एक गंमत सांगू का; या लेखाचं बहुतांश लेखन मी तिकडच्या बाल्कनीत बसून केलं.

*

कथा

# लेट लतीफ

**✶ कल्पना सुभाष कोठारे ✶**

‘ओ नो!’ वसुधा चरफडत स्वत:शीच बोलली, आजही तिची बोरिवली फास्ट लोकल थोडक्यात चुकली. फास्ट गाडी येत असल्याची घोषणा झाली तेव्हा ती जिना चढून पुलावर पोचली होती. परंतु नुकत्याच चर्चगेटहून आलेल्या अंधेरी गाडीतील जमावाने ती ढकलली गेली. बोरीवली गाडीच्या लेडीज डब्यापर्यंत ती पोचण्यापूर्वीच, फास्ट गाडी हलली होती. लहान मुलाच्या हातातील आइस्क्रीम टपकन खाली पडून, नुसती काडी हाती उरावी तसेच काहीसे वसुला वाटत राहिले. नाईलाजाने तिने उलटया दिशेस, दोन नंबर प्लॅटफॉर्मवरील नुकत्याच रिकाम्या झालेल्या अंधेरी स्लो गाडीकडे मोर्चा वळवला.

खिडकीतून राधा तिला हात करीत होती. राधाने राखून ठेवलेल्या जागेवर बसता बसता, वसुने नाराजी व्यक्त केलीच! ‘शी! थोडक्यासाठी चुकली गं फास्ट ट्रेन! आता नक्कीच रागावणार बॉस!’ ‘जाऊ दे गं! आपली भेट झाली नं त्यामुळे? बॉसला इतकं काय घाबरायचं? शाळा आहे का ती? सहा महिनेच झालेत नं तुला नोकरीला लागून? असे कितीसे लेटमार्कस् लागलेत?’ ‘अगं राधा, तुला ठाऊक नाहीय सध्या आमचा बॉस ‘तो’ नसून ‘ती’ आहे. पूर्वीचे जॉली, पारसीबाबा निवृत्त झालेत. त्यांची खडूस मुलगी, आता आमची बॉस आहे. रजेचा अर्ज आधी द्यावा लागतो नं, तसा उशीरा येण्याचा अर्ज टाकावा लागतो हल्ली! पावसाची एक्स्क्यूजही चालत नाही बयेला!’

‘बया? हळू बोल! कुणी ऐकलं तर?’ ‘ह्यॅ! इकडे कोण ऐकणाराय? ती मॅडम् तिकडे कुलाब्याला राहते. शोफरड्रिव्हन कारने, बरोब्बर साडेदहाला येऊन पोचते. तिला आम्हाला लोकलवाल्यांचे प्रश्न कसे कळणार?’ ‘दिसायला कशी आहे गं तुझी बॉस? स्टार्चड् साड्या नेसते? ‘साडी? माय फूट! पूर्ण पाश्चात्य पेहराव असतो. स्कर्ट ब्लाऊजवर जॅकेट, टाय किंवा बो, कधीकधी शर्ट पॅन्टवर जॅकेट, पायात उंच टाचांचे सॅन्डल्स तर कधी मॅचिंग शूज! जीन्स मात्र कधीच नाही. आम्हालाही जीन्स घालायची परवानगी नाही. नशीब! युनिफॉर्म नाही घालायला लावत आम्हाला!’ ‘पुरे गं तुझ मॅडम पुराण! आता भेटलोच आहोत तर छान गप्पा करु या की!’ ‘अय्या हो! विसरलेच होते! मागे भेटलीस, तेव्हा म्हणाली होतीस तो तुझा कांदेपोहे कार्यक्रम झाला का गं?’ ‘हल्ली कांद्यापोह्यांना कोण विचारतंय? पिझ्झा, बर्गरके दिन है जनाब!’ ‘म्हणजे? आधीच ऑर्डर देऊन ठेवायची अन् बघायला आलेल्या मुलासमोर, लाजत, लाजत पिझ्झा बॉक्स पुढे करायचं की काय?’ ‘नो वे! एस.एम.एस. करून पिझ्झा पार्लरला भेटायला बोलवायचं, गप्पा करायच्या की संपलं!’ ‘अय्या! त्याने जर तुझा नंबर डिलीट केलाच नाही, अन् सारखे मेसेजेस केले तर?’ ‘असं नसतं बाळे! म्युचली ठरतं पुढच्या भेटीबद्दल!’ ‘किती पिझ्झा झाले मग तुझे आतापर्यंत? एनी प्रोग्रेस?’ ‘नॉट सो फार - माझं जाऊ दे गं तुझं काय चाललंय सध्या ते सांग. कॉम्प्युटर क्लास काय म्हणतो? एखादा डॅशिंग हीरो भेटला की नाही तिथे?’ ‘याबाबतीत झीरो हं माझा! घरी ये नं, एकदा गप्पा करायला - जेवायला येतेस का या रविवारी?’ ‘जेवायला नको - दुपारी येईन मग वरसोवा बीचवर चक्कर टाकू - कविता ऐकवशील नं तुझ्या?’ ‘नक्की! ये मात्र तू - फोन कर आधी हं?’ ‘अच्छा! बाय वसू!’ राधा बाय करून चर्नीरोडला उतरली. वसुधाही चर्चगेटकरिता

दाराजवळ येऊन उभी राहिली.

वसुचे लक्ष वारंवार मनगटी घड्याळाकडे जात होते. झपाझप जिना उतरून चढून तिने अंडरग्राऊंड क्रॉसिंग पार केले. पारसी विहीर जवळ आली. सिग्नलला 'क्रॉस नाऊ' येण्याची वाट पाहत असतानाच, तिच्या कानी गाड्यांच्या ब्रेक्सचा कर्णकटु आवाज पडला. तिच्यासमोरून आडव्या जाणाऱ्या गाड्यांपैकी एकीने जबरदस्त ब्रेक मारला होता. 'कुई, कुई, करत एक छोटासा काळा कुत्रा मरता, मरता वाचला होता. भर रस्त्यात फुटपाथच्या दिशेने पळत आलेल्या त्या पपीला वसुधाने नकळत उचलले होते. न्हवे! तिच्या नकळत उचलण्यानेच तो जीव वाचला होता. रहदारी पूर्ववत चालू झाली होती. कुत्र्याचा मालक म्हणून कोणीच समोर आले नाही. हातातील भेदरलेल्या पपीचे काय करावे ते क्षणभर वसुला कळेचना! त्याला कुठे जखम झालेली तर दिसत नव्हती. दोन पावले मागे येऊन वसुने पपीला अलगद पारसी विहीरीपाशी जमिनीवर सोडून दिले. गोडुल्या, घाऱ्या, पपीच्या डोळ्यांना नजरेनेच 'बाय' करून ती ऑफिसच्या दिशेने चालू लागली. सुदैवाने आता सिग्नलही 'क्रॉस नाऊ' म्हणत होता.

सी.टी.ओ.च्या पायऱ्यांशी ती परत थबकली. तिच्या पायातील सँडल्सचे व्हेल्क्रोज निघाले होते. ओणव्याने सँडल्स नीट करीत असताना तिची नजर सहज मागे गेली तो काय नवल! ते काळे कुत्र्याचे पिल्लू तुरुतुरु चालत, चक्क तिच्या मागोमाग येत होते. 'ओ माय गॉड! या ब्लॅक ब्युटीचं करू तरी काय? आधीच उशीर झालाय त्यात हे नसतं लचांड मागे लागलंय. हे मेले ट्रॅफिक पोलिस, सिग्नल्स झाल्यापासून गायबच असतात.' वसुधाच्या विचारांची साखळी, तिच्या पायाइतकीच भराभर चालू होती. हुतात्मा चौकाचा सिग्नल पार करून तिने ऑफिसजवळील फुटपाथ गाठला. पपी तिच्यामागे येतच होते. जो, तो, ऑफिस गाठण्याच्या गडबडीत होता. पपीकडे कोणी ढुंकूनही पाहत नव्हते. वसुधा मात्र, ते आर्जवी घारे डोळे, तो कुई, कुई आवाज, तो केसाळ मृदू स्पर्श, अजुनही सोबत घेऊनच चालत होती.

वसुधाचे ऑफिस पहिल्या मजल्यावरच होते. ऑफिसची इमारत येताच, लिफ्टसमोरील रांगेत उभी न राहता, ती दगडी जिना चढू लागली. पपीही

## वात्रटिका
### परिणाम

पेपरमिंट चघळत चघळत ती कथा लिहायची,
कथेचा शेवटही ती आंबट-गोड करायची.
एकदा पेपरमिंटस् संपली, खाल्ला आलेपाक,
युद्धकथा लिहिली तिने, माणसं मेली लाख

**-डॉ. सुमन नवलकर**

दुडक्या चालीने पायऱ्या चढत होते. वसुधाचा एक डोळा पपीवर व दुसरा घड्याळावर होता. अखेर दयेचे पारडेच झुकले. तिने पटकन वाकून पपीला उचलले व खांद्यावरील शबनमवजा पर्समध्ये टाकले. तिने ऑफिसचा काचेचा दरवाजा खांद्याने ढकलला. आत शिरताच विठ्ठल प्यूनच्या हाती ती पपीला सोपविणार होती.

'अरे देवा! आधीच उशीर झालाय, अन् विठ्ठलही कुठे दिसत नाहीय! करू तरी काय याचं?' वसुधाला एखाद्या भुलभुलैयात अडकल्यासारखे वाटत होते. साडेअकरा वाजत होते. म्हणजे जवळजवळ, एक तास उशिराने ती पोचली होती. 'लेट लतीफ आला रे!' जोगळेकर ओरडला. अन् एनक्लेव्हजमधून इतरांची डोकी वर आली. 'अरे, एक नाही! दोन लेट लतीफ्ज दिसताहेत' कोणीतरी म्हणाले अन् हास्याचे कारंजे उसळले. मीनाक्षी खुणेने 'काय हे?' म्हणून दुरुनच वसुधाला विचारत होती. मीनाक्षीचे कॉम्प्युटर शेवटच्या टोकाला होते. तिच्याजवळ वसुधाचे टेबल होते. विठ्ठल दिसत नव्हता. बहुधा तो मॅडमच्या केबिनमध्ये असावा. पहिलेच टेबल जोगळेकरचे होते. त्यावर वसुधाने शबनमवजा पर्स ठेवली. डोके बाहेर काढून घारे डोळे इकडेतिकडे बघू लागले. 'अहो काय हे वसुधा मॅडम?' जोगळेकर म्हणाला, 'अहो, माझं नाहीयं हे - सध्या लपवता का तुमच्या कपाटात? माझ्या टेबलला कपाट नाहीय हो - नंतर विठ्ठलला देईन-' 'अहो पण मॅडम आल्यावर मी काय एक्सप्लनेशन देऊ?' 'म्हंजे? अजून मॅडम आलेल्याच नाहीत?' ताणलेले रबर सुटावे तसे वसुच्या मनाचे झाले.

## वात्रटिका

### बालसंगोपन

रात्री बाळ जागायचं, आजी बसायची घेऊन,
आई आणि बाबा त्याचे गुडूप जायचे झोपून.
आजोबा म्हणाले आजीला 'करुया युरोप टूर,
आईबाबांना आळवू दे बालसंगोपनाचा सूर.'

**-डॉ. सुमन नवलकर**

तरीही परवानगी न घेताच तिने जोगळेकरच्या टेबलवरील पाण्याचा ग्लास घटाघटा पिऊन रिकामा केला. एव्हाना मीनाक्षी सोडून सारेजण जोगळेकरच्या टेबलाजवळ गोळा झाले होते. 'हाऊ क्यूट!' 'कुठून आणलं?' 'पण प्राण्यांच्या क्रेशमध्ये का नाही ठेवलं?' 'ऑफिसमध्ये कशाला?' एका मागोमाग प्रश्नांचे फटाके फुटत होते. वसुने थोडक्यात पपीचा जीव वाचविल्याची कथा सांगितली.

'आला! विठ्ठल आला! म्हणजे मॅडम पण येतच असणार'' कुणीतरी म्हणाले. वसुधाने 'घुमजाव' केले. घाईघाईने विठ्ठलला गाठले. त्याच्या हातातील मॅडमचा पी.सी. घेऊन, तिने पपी विठ्ठलकडे दिले. विठ्ठल अवाक होऊन बघतच राहिला. 'अरे, जा नं बाबा, लपव कुठे तरी याला, मी ठेवते पी.सी. मॅडमच्या टेबलवर!' मान डोलावीत विठ्ठल पॅन्ट्रीकडे वळला. मॅडमच्या नीटनेटक्या टेबलवर, योग्य दिशेने पी.सी. ठेवून ती केबिनबाहेर आली. तेव्हा शाळेतील विद्यार्थ्यांप्रमाणे एकासुरात सारेजण 'गुडमॉर्निंग मॅडम' म्हणत होते.

आज मॅडमनी मात्र नेहमीप्रमाणे 'गुडमॉर्निंग एव्हरीबडी' म्हटले नाही. सेलफोन कानाशी लावून त्या कोणाशीतरी बोलत होत्या. हातानेच खुणावून त्यांनी सर्वांना बसण्याची परवानगी दिली. टिपिकल इंग्रजी मिश्रित पारशीत (गुजरातीत) मॅडम बोलण्यात व्यस्त होत्या. वसुधाला, आजचा मॅडमचा पेहराव जरा विचित्र वाटला. बिस्कीट रंगाच्या स्कर्ट ब्लाऊझवरील जॅकेट मॅचिंग नव्हतं. स्टॉकिंग्ज व शूजही मॅच होत नव्हते. घाईघाईत तयार होऊन यावे तशा त्या वाटल्या, तरीही त्या नेहमीप्रमाणेच सुंदर दिसत होत्या. पांढऱ्या शुभ्र झालरीच्या ब्लाऊझमधून वर आलेली त्यांची गोरी मान एखाद्या देठासारखी वाटत होती. ऑरेंज शेडचे लिपस्टिक त्यांच्या गोऱ्या, गुलाबी चेहऱ्याची शोभा वाढवीत होते. लिलीचे फूलच जणू! तुरमणाप्रमाणे मॅडमचा तपकिरी हेअरकटही गोड दिसत होता. मात्र कळीला सुरकुत्या पडाव्यात तशा मॅडमच्या कपाळावरील आठ्या वाटत होत्या. मॅडमचे निरीक्षण करता, करता वसुधा तिच्या टेबलशी येऊन पोचली होती. मॅडम केबिनमध्ये अदृश्य झाल्या होत्या. आता इंटरकॉमचे बटन वाजणार अन् नेहमीप्रमाणे विठ्ठल मॅडमची कॉफी, ट्रेमध्ये घेऊन पँट्रीतून बाहेर येणार, असे वसुला वाटले. पण बेल वाजलीच नाही. म्हणजे मॅडम अजूनही फोनवरच बोलत असाव्यात. मीनाक्षीने पपीविषयी काही विचारण्याआधीच, वसुने टेबलवर पर्स ठेवली आणि धावतच तिने पँट्री गाठली.

विठ्ठलने खुणेनेच सारे 'आलबेल' असल्याचे तिला सांगितले. गणू, विठ्ठलचा मदतनीस, मॅडमच्या कॉफीचा ट्रे हाती धरून उभा होता. गणू पँट्रीबाहेर पडताच, विठ्ठलने 'शुक, शुक' करून तिला झाडुच्या कपाटाजवळ बोलाविले. तिथे पपीचे मुटकुळे शांत झोपले होते. बिच्चारं थकलं असणार इतकं चालून! आपल्यालाही थकवा घालवायला कॉफी हवी - असे वाटून वसु मशीनमधून स्वत:साठी मग भरून घेऊ लागली. पँट्रीच्या दारातून मॅडम येताना दिसल्या मात्र, फुंकर न मारता कॉफीचा घोट गिळल्याने, वसुला चांगलाच चटका बसला. मॅडम अजूनही कानाला मोबाइल लावून बोलतच होत्या.

'डोंच्यु वरी पपा, विठ्ठलला भेजते नं मी. हूं छू नां! विठ्ठल विल सर्च फॉर युवर लतीफ!' 'लतीफ?' वसुने भिवया वर करून विठ्ठलला मूक प्रश्न केला. विठ्ठलने खांदे उडविले, मॅडम्‌ना तो म्हणाला, 'काय झालं मॅडम्?' 'अरे पपा लई अपसेट हाय सकाळसुन! त्येंचा लतीफ हरवलाय नी!' 'लतीफ कोण?' विठ्ठलच्या या प्रश्नाचे उत्तर मिळतच नाही कारण झाडूच्या कपाटाचे दार ढकलून पपी उड्या मारत बाहेर आलेला असतो. विठ्ठलचे 'अरे, अरे' संपून, आश्चर्याने नुसताच 'आ' वासला जातो. कारण मॅडमने पपीला उचलून कडेवर घेतलेले


असते. जीभ बाहेर काढून पपी चक्क मॅडमचा चेहरा चाटत असतो. कुत्र्याचे लाड करीत मॅडम विचारतात, 'अरे हेला कपबर्डमध्ये कोणी ठेवला? ओ. के. इनफ् लतीफ. केटला परेशान केला तू पपाला? गाडीत घुसुनशान आला काय तू माझ्यासंकट? वेट! लेट मी टेल पपा! पपाऽ लतिफ इज हिअर विथ मी! हां! हां! ड्रायव्हर संगती भेजते. डोंच्यू यू वरी पपा - विठ्ठल हेला घरी घेऊन जा हं! मी ड्रायव्हरला फोन करते' मॅडमनी पपीला विठ्ठलच्या हाती सोपविले. वसु संपत आलेली कॉफी पिण्याचे नाटक करीत, समोरचे नाटक बघत उभीच होती. विठ्ठलने मॅडमना अपघातातून वाचलेल्या पपीची गोष्ट सांगायला सुरवात केली. केवळ वसुधामुळे पपी वाचला, हे विठ्ठल रंगवून सांगत होता. आपण इतरांना सांगितलेली गोष्ट, विठ्ठलला कशी कळली? वसुधाला प्रश्न पडला होता. इतक्यात दार लोटून गणु आला व त्यानेही विठ्ठलच्या कथाकथनास हातभार लावला तेव्हा वसुच्या डोक्यातले कोडे सुटले. गणुनेच विठ्ठलला सारी कथा रंगवून सांगितली असणार!

'माय डिअर, थँक यू सो मच वसुधा!' म्हणत, मॅडम वसुशी चक्क शेकहॅन्ड् करीत होत्या. नेहमीच्या रागीट चेहऱ्यावर प्रसन्नतेचे गुलाब फुलले होते. तरीही जरा घाबरतच वसु म्हणाली, 'मॅडम तुमच्या डॉगीचं नाव लतीफ आहे?' 'अरे ते तुमी लोग उशिरा येणाऱ्याला 'लेट लतीफ' म्हणून चिडवते ना? आय लाइक्ड द साऊंड ऑफ दॅट सो तेच नाव मी पपाच्या पपीला ठेवला. 'व्हेरी, व्हेरी क्यूट नो? बाय् लतीफ! परत अशी गडबड करायची नाय हां! विठ्ठल ड्रायव्हरला गेट नीट लावायला सांग हां लतीफ पपाजवळ देल्यावर! कम ऑन बेबी- गो पपा इज वेटिंग फॉर यू' मॅडमनी अखेरचे पपीला थोपटून निरोप दिला व त्या केबिनकडे वळल्या.

निरोप समारंभ पार पडला अन् गणूचा चेहराही! कारण कारमध्ये बसुन फिरण्याची संधी, त्याला न मिळता विठ्ठलला मिळाली होती. एक लतीफ विठ्ठलच्या मांडीवर बसून मजेत घराकडे परतत होता. तेव्हा दुसरी लतीफ खुर्चीवर बसत, कामाच्या फाइलमध्ये डोके खुपसत होती.

*

## हास्यचित्र



❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# छोटद्या-मोठ्यांकरिता

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

**कथा**

## चुटपुट

**- डॉ. सुमन नवलकर**

''आजी, आज आमचे विज्ञानाचे पेपर मिळाले. मला पन्नासपैकी सेहेचाळीस मिळाले आजी, पण ना, खरं तर मला सत्तेचाळीस मिळायला हवे होते. एक गाळलेला शब्द बरोबर होता माझा. पण बाईंनी चुकून चूक दिलाय. त्यामुळे एक मार्क कमी झाला ना माझा?''

''अरे, पण मग तू बाईंकडे गेला का नाहीस? वाढवून का नाही घेतलास तो तुझा चुकून कापलेला मार्क?''

''अगं, बाईंजवळ खूप गर्दी जमली होती. त्यात आणखी मी कुठे जाऊ?''

''पण आता चुटपुट लागून राहिलीय तिचं काय?''

''अगं चुटपुट तर लागणारच ना? एकेका मार्काने नंबर किती खाली जातो ते माहितीय ना? शिवाय नंबराचं जाऊ दे. पण बरोबर असलेला गाळलेला शब्द चूक दिला म्हणजे वाईट वाटणारच ना?'' बोलताना मीतचा चेहरा हिरमुसला.

''आज नाही तर नाही, पण उद्या तरी दाखव तुझा पेपर बाईंना आणि वाढवून घे तो मार्क. नाहीतर ही चुटपुट कायम लागून राहील मनाला.'' एका मार्कासाठी आजी दुसऱ्या दिवशी बाईंकडे जायला सांगतेय हे ऐकून मीत चकितच झाला. नाहीतर ''जाऊ दे रे'' हे आजीचं आवडतं वाक्य.

धाकट्या जीतने मीतची सायकल जोरात चालवून भिंतीवर आपटली, तरी आजी म्हणणार, ''जाऊ दे रे; मोठा भाऊ आहेस ना त्याचा?''

जीतच्या चार चापट्या खाल्ल्यावर मीतने त्याच्यावर हात उगारला तरी आजी म्हणणार, ''जाऊ दे रे; लहान आहे ना तो?''

जीतच्या आधी उठूनही मीतला आधी आंघोळीला जायला नाही मिळालं, तरी आजी म्हणणार, ''जाऊ दे रे; तुला आरामात मिळेल बघ आंघोळ करायला.''

दोन कॅपस्‌पैकी कोणती जीतला हवी असेल ती दिल्यावर उरलेली मीतला देताना बाबाही म्हणणार, ''जाऊ दे रे; पुढल्या वेळी तुला देईन आधी निवडायला. बस्स?'' दोन पेन्सिली असोत, दोन पेनं असोत, दोन कंपासपेट्या असोत, दोन वेगवेगळ्या चित्रांच्या वह्या असोत - आईसुद्धा पहिली निवड जितला देणार आणि मीतला म्हणणार, 'जाऊ दे रे.'' त्यामुळे 'उद्या जा आणि मार्क वाढवून घे'', असं आजीने म्हटल्यावर चकितच झाला मीत.

''आजी, तू आज ''जाऊ दे रे'' असं नाही म्हणालीस?'' त्याने आजीला विचारलंही. मग आजी म्हणाली, ''ही चुटपुट फार वाईट असते मीत. ती आयुष्यभर आपला पाठलाग करते. माझ्या बाबतीतही अशी चुटपुट लावणारी गोष्ट घडली बघ.''

'गोष्ट' शब्द ऐकल्यावर जीत पण धावत आला. म्हणाला, ''सांग ना आजी ती गोष्ट.''

दोघे आजीच्या समोरच बसले. मग आजीने केलीच सुरुवात सांगायला.

''मी ना रे तुमच्या एवढीच लहान होते बघ.'' आजीच्या पहिल्याच वाक्याला जीतला शंका आली, ''माझ्याएवढी की मीतएवढी? कोणाएवढी होतीस आजी?''

''हे बघ, मधे-मधे प्रश्न नाही विचारायचे. नाहीतर काय सांगत होते ते विसरायलाच होतं बघ. साधारण तुमच्याएवढी होते. थोडी मोठी, थोडी लहान किंवा मधलीच.''

''प्रश्न सगळे नंतर विचारू जीत. गोष्ट संपल्यावर.'' मीतने जीतला समजावलं. मग आजीने पुढे गोष्ट

सांगायला सुरुवात केली.

''तर आमच्या कॉलनीत गणेशोत्सव असायचा. रोज रात्री करमणुकीचे कार्यक्रम असायचे. नाटकं, नाच, गाणी आणि रविवारी सकाळी वेगवेगळ्या स्पर्धा असायच्या. पळायची, लंगडीची, संगीत-खुर्ची, चमचा-लिंबू, पीठ पैसा.''

''चमचा-लिंबू आणि पीठ-पैसा या कसल्या शर्यती गं आजी?'' यावेळी मीतलाच शंका आली. शर्यत कसली आहे हे कळल्याशिवाय गोष्ट ऐकायला मजा तरी कशी येणार?

''अरे, चमचा-लिंबू म्हणजे चमचा तोंडात पकडायचा. चमच्यात लिंबू ठेवायचं. एक-दोन-तीन म्हटलं की धावत सुटायचं. समोरच्या रेषेपर्यंत जो आधी पोहोचेल तो जिंकला. अट एकच, की लिंबू चमच्यातून पडता कामा नये. आणि पीठ-पैसा म्हणजे एका ताटलीत नाणं ठेवून त्यावर बचकाभर पीठ टाकून ठेवायचं. एक-दोन तीन म्हटलं की मुलं समोरून पळत-पळत येणार, बशीतलं किंवा ताटलीतलं पीठ फुंक-फुंक फुंकणार. पिठाखालचं नाणं दिसलं की ते लगेच तोंडात पकडणार आणि पळत परत आपल्या जागेवर येणार. अट एकच पिठाला किंवा नाण्याला हात लावायचा नाही.''

''बाप रे! किती भयंकर स्पर्धा आजी. पीठ सगळं तोंडावर उडत असेल ना?'' जीतला पुन्हा शंका आली. ''आणि तोंडातही जात असेल ना गं पीठ?''

''तर रे! तोंडातच नव्हे, तर नाकात, डोळ्यांत, केसांत सगळीकडे पीठच-पीठ! मग स्पर्धा झाल्यावर झाडायचं ते पीठ. सुकं-सुकंच. लगेच पाणी नाही लावायचं. नाहीतर सगळं तोंड चिकट. मग शेवटी जाऊन चूळ भरायचे.''

'परवा त्या मोनाच्या वाढदिवसाला तिच्या तोंडालाच केक फासला. तसंच नै आजी?'' मीतच्या या प्रश्नावर आजी म्हणाली, ''अरे, केक किती चवीष्ट. तोंडावर पोहोचेल तिकडे जीभ तरी फिरवता येईल. पीठ तोंडात गेलं तर त्याला ना चव ना ढव.''

''ढव म्हणजे काय गं आजी?'' या जीतच्या प्रश्नावर मात्र आजी म्हणाली, ''प्रश्न शेवटी. तर त्या पीठ-पैसा शर्यतीत मी भाग घेतला होता. 'एक-दोन-तीन' म्हटल्यावर धावत जाऊन फू-फू, फू-फू करत जोरजोरात पीठ फुंकलं. खालचा पैसा पटकन तोंडात पकडला. धावत परत आले. पाहते तो काय? बाकी सगळे अजूनही पीठ फुंकत होते. मी चक्क पहिली आले होते. सांगता-सांगता आजीचे डोळे चमकले. आत्ताच स्पर्धा जिंकून आल्यासारखे.

''आम्ही लहान मुलं स्पर्धेत भाग घ्यायचो. त्यावेळी कॉलेजमध्ये असलेली मुलं बश्या मांडणं, त्यांत नाणी ठेवणं, वर पीठ टाकणं, स्पर्धकांची नावं लिहून घेणं, जिंकलेल्या मुलांची नावं लिहून ठेवणं अशी जबाबदारीची कामं करायची. तर झालं असं की आम्हा पहिल्या तीन आलेल्या मुलांची नावं त्यापैकी एका मोठ्या मुलाने लिहून घेतली. कॉलनीत बहुतेक सगळ्यांची नावं सगळ्यांना ठाऊक असायची. त्या मोठ्या मुलाने आमची नावं लिहून घेतल्यावर आम्ही पीठ झाडायच्या कामाला लागलो. बक्षिससमारंभ गणेशोत्सवाच्या शेवटच्या दिवशी असायचा. गणपती विसर्जन करून आल्यावर रात्री मोठ्या समारंभात बक्षिसं मिळायची.

मी खूप खुशीत होते. घरी आल्यावर आई-बाबांना सांगितलंही मला पहिलं बक्षिस मिळालं म्हणून. माझे दोघे भाऊ, म्हणजे तुमचे अमर आजोबा आणि सागर आजोबाही खूश झाले. स्टेजवर बक्षिस घ्यायला जायचं म्हणजे नवा फ्रॉक हवाच ना? भाषणं, अहवाल-वाचन असं सगळं झाल्यावर बक्षिस समारंभ सुरू झाला. लंगडी, धावी, चमचा-लिंबू अशी एकेका स्पर्धेची बक्षिसं जाहीर होता होता पीठ-पैसा शर्यतीचं नाव घेतलं. मी सरसावून बसले. आता आपलं नाव घेतलं की जायचं. बक्षिस घ्यायचं. अध्यक्षांना नमस्कार करायचा. प्रेक्षकांकडे पाहूनही नमस्कार करायचा. बक्षिस काय असेल बरं?

पण माझं नाव न घेता वाचणाऱ्याने भलत्याच मुलीचं नाव घेतलं. 'नीना'. आमचं दोघींचं आडनाव एकच होतं. पण माझं 'सीमा' नाव घेण्याऐवजी त्याने तिचं नाव घेतलं. ती माझ्या जवळच बसली होती. ती काही उठण्याच्या तयारीत नव्हती. कारण तिला बक्षिस मिळालेलंच नव्हतं. पण मग तिच्या आजूबाजूच्या बसलेल्या तिच्या मैत्रिणी तिला म्हणायला लागल्या, 'जा ना गं. एवढं बक्षिस मिळतंय तर घे ना.' तिने जरासे आढे-वेढे घेतले. इकडे तो स्टेजवरचा माणूस पुन्हा-पुन्हा तिचं नाव घेत होता. मग काय? उठली ती. गेली सरळ आणि घेऊन आली बक्षिस. मी हे सगळं पाहत होते. जरा

हुशारी दाखवून गेले असते स्टेजवर आणि सांगितलं असतं की बक्षिस मला मिळालंय म्हणून, तर मिळालं असतं ना माझं बक्षिस मला?

बक्षिस घेऊन ती पुन्हा तिच्या जागेवर येऊन बसली. बक्षिसावरचा कागद उघडला. आत गोष्टींचं पुस्तक होतं. खरं तर माझं होतं ते. पण होतं तिच्या हातात. असे तर आमचे आई-बाबा आम्हाला खूप गोष्टींची पुस्तकं घेऊन द्यायचे. कपाटभर गोष्टींची पुस्तकं होती आमच्याकडे. पण बक्षिस ते बक्षिस ना रे?'' बोलता बोलता आजीचा आवाज भरून आला. डोळेही भरून आल्यासारखे वाटले. म्हणाली, ''तेव्हा दहा वर्षांची असेन मी आणि आता पासष्ट वर्षांची आहे. म्हणजे पंचावन्न वर्षं झाली त्या गोष्टीला. पण अजून जसंच्या तसं आठवतं सगळं मला. घरी आले. आई-बाबांना सांगितलं सगळं आणि रडलेही. बक्षिस मिळणार म्हणून नवा हिरवा फ्रॉक घालून गेले होते आणि रिकाम्या हातांनी परत आले.''

''तेव्हा माझे आई-बाबा काही बोलले नाहीत मला. बोलून उपयोगच नव्हता. बक्षिस-समारंभ तर होऊन गेला होता. पण चुटपुट अजून वाटतेय, इतक्या वर्षांनी. म्हणून सांगतेय तुला मीत, उद्या पेपर घेऊन जा आणि तुझा तो कापला गेलेला मार्क वाढवून आण. हक्कच आहे तो तुझा. परीक्षा तर तीन माहीच आहे. गुण नाही मिळाला, तरी काही फार मोठं बिघडणार नाहीये. पण चुटपुट कायम राहते आणि पुन्हा-पुन्हा त्रास देत राहते.''

जीत व मीत गप्प झाले. गोष्ट ऐकताना खूप-खूप प्रश्न विचारायचं ठरवत होते. पण आता तर एकदेखील प्रश्न आठवत नव्हता. पीठ फुंकून-फुंकून आजीने मिळवलेल्या, पण तरीही आजीला मिळू न शकलेल्या बक्षिसाची रुखरुख आजीबरोबर आज नातवांनीही अनुभवली होती.

रात्री वेळापत्रकाप्रमाणे पुस्तकं-वह्या बॅगेत भरताना मीतने आठवणीने विज्ञानाची ती उत्तर-पत्रिका बॅगेत ठेवली; 'उद्या आठवणीने गुण वाढवून घ्यायचा' असं पक्कं ठरवून. एकदा का गुण वाढवायचं मनाशी ठरवलं, मग चटकन झोपही लागली त्याला. आज आजीचंही मन थोडं हलकं झालं होतं. नातवांना बक्षिसाची गोष्ट सांगितल्यावर चुटपुट खूप कमी झाली होती. तरीही झोपेत ते नीनाला मिळालेलं गोष्टीचं पुस्तक आलंच आजीच्या स्वप्नात.

*

## हास्यचित्र



# छोटया-मोठ्यांकरिता

## कविता

### घर असावे तर असे

-आरती जयेश कोठारे
(इयत्ता ८वी)

घर असावे तर असे
विचारा बरे कसे ?

त्याला हव्यात चार भिंती
सुख, समृद्धी, समाधान आणि शांती
आनंदी असावीत माणसांची घरटी!

घर असावे तर असे
विचारा बरे कसे ?

त्यात पाहिजेत आपुलकीची माणसे
चला सगळ्यांनी जपुया हे नाते
आता राग लोभ कशाला बरे ?

घर असावे तर असे
विचारा बरे कसे ?

हवा त्या घरची असावी जिव्हाळ्याची
भाषा त्या घरची असावी प्रेमाची
कृपा असावी त्या घरावर परमेश्वराची!

घर असावे तर असे
घर असावे तर असे!!!

✳

### Saving the world

**-Aarti Jayesh Kothare**
Std. VIII

The world is dwindling and we have to save it,
Why don't you all help a little bit?
Everyone will get his or her share,
If you'll really really care.

Geography is changing day by day,
This is what the news reporters say,
Now is the time to stop all this,
You have already warned by the snake's last hiss.

Saving the world is not an easy task,
Come on remove your selfish mask,
See the nature and its living forms,
Why to keep such dreadful norms?

Live and let others live is the true norm of life,
Why do you feel to cancel it with a very sharp knife?
Please save me our mother is crying,
What is the harm in just trying?

Cause this is the day you can change the world,
This is the day you can care the world,
This is the day you can share the world,
And this is the day you can save the world…

✳

लेख

# Superstition

✶ *Pooja Mandar Kothare* ✶

Superstition is a kind of blind faith based on fear and ignorance. Not only the illiterate, old and tribal but even the educated fall prey to such unreasonable notions. It is observed that superstitions are of various types and people belonging to different nations are influenced and subjected to it in some form or the other. There are plenty of hilarious superstitions lingering in Indian culture.

Throwing light on a few on them that can put you in a split of laughter.

★ Bribing God happens everywhere irrespective of one's caste, creed or religion. We all at some point or other indulge in this act. "God please help me pass this examination with flying colours and then I shall dedicate sweets worth a particular amount to you", such pleads are often heard from students. Is this a prayer or a give and take offer? Adults too visit religious places to attain the so called darshan but the motive is some personal benefit in return. Sometimes fasting for a day or two or for that matter a week (in some cases) is a form of bribing God, and I just don't understand as to why God will enjoy watching you starve? Abstaining from food will never take you close to God. It's your actions, attitude and kindness that matters and takes you an inch closer to the Almighty. Pure faith is a deep personal conscience and is not surrounded with fear but superstitious beliefs have a baggage of apprehensions. A person believing in superstitions is always haunted by unknown fears and anxieties.

★ Week days particularly Tuesdays and Thursdays are the days on which trimming ones nails, hair cut or wash is to be strictly prohibited. Why? Because we have been hearing from our elders that engaging in such activities on the prescribed days causes harm to God. That means even if your nails are long enough to hurt someone or your tresses cause sweat and foul odor is absolutely fine. In short on Tuesdays and Thursdays you may look as filthy as possible.

★ The most common of the lot is a black cat crossing your path. The poor cat may be in a hurry to reach her kitten at the other end of the road so unknowingly she may have crossed your way. But we consider it as a bad omen. Some wait for few minutes while some chant mantras and then carry on their journey with a vision that the mantras wipe off the misfortune. Thus, the black cat is seen as a biggest villain.

· Do not sweep your floor in the evening hours as it brings bad luck. Our ancestors were deprived of electricity and would use wick lamps thus to avoid accidents during night time, they must have avoided sweeping floors during evening/night time.

★· Number 3 and 13 are ill-fated. If a group of three is heading for some work, then we often hear the quote "Teen Tigaada Kaam Bigaada". It is often seen that a group of three carry a pebble (pebble personified as the fourth person) with them so as to reduce the negativity output. It is observed that people avoid purchasing a house with the number 13 in their address. Many high-rise builders skip the 13th floor entirely. So absurd! If one turns 13 does that mean a year of doom? The numerology aspect

seems very funny and strange.

- ★ You are stepping out of your house for some important task and somebody sneezes then that action seems to curtail the work that you are about to perform. Logically thinking how can someone sneezing affect your work? Sneezing is reflex reaction that usually occurs with the common cold, flu or tickly dust irritating the inside of your nose. There is absolute no connection.
- · On the arrival of a baby boy, the mother is asked to avoid non-vegetarian food on Mondays. If a girl child is born such a condition is not laid. I will not be surprised if women feminist oppose. Why such an order only for baby boys and not for baby girls? Personally speaking avoiding non-vegetarian food on certain days is a way to make sure that adequate veggies are consumed for health benefits. But majority avoid non-vegetarian food on the pretext of auspicious days.
- ★ Menstruating women are impure and cannot enter temple or visit religious functions. Yet another belief inadvertently spread during ancient times and still harbors in majority of Indian households. Probably women in the olden days avoided certain things during those days because of discomfort and slowly must have turned into a ritual. How can a common biological phenomenon in women that is related to fertility and birth be associated with dirt or impurity? It is high time we accept women with their natural processes and break these baseless norms. I am very proud of India's rich culture and traditions. However, there are certain rituals that are blindly followed and its time we abandon such customs that deprive women from attending sacred functions. Worshipping with menstruating – What's wrong in it?
- ★ Banyan tree and ghost tales go hand in hand. Banyan tree houses spirits so avoid it in the night is a never missed instruction. Our ancestors probably knew of photosynthesis and the effects of inhaling carbon dioxide in the night. Hence they must have discouraged people from venturing near a banyan tree at night and stories of ghosts were woven around these trees.
- ★ Fallen hair around the house brings fight in the family. But how can mere hair provoke family members to engage into a squabble? The real reason behind this superstition could be that if you leave the fallen hair inside the house then with the wind blow it could end up in the food.
- ★ Ultimate of all superstitious beliefs in India is to use lemon and chili totems to ward off evil eye. How on earth can we identify an evil eye? Are we humans so powerful that our mere wicked thoughts can harm other fellow beings? Our ancestors tried to propagate the use of lemon and chillies in their daily life as both are rich in Vitamin C and with a pierced thread, it absorbs the vitamins and different nutrients present that vaporize in the air. Thus we inhale this air and use their properties for our health benefits. However, this practice turned into a superstition.
- · If someone is having hiccups it is assumed that someone is remembering him/her. A hiccup is an involuntary contraction of the diaphragm that may repeat several times per minute. It is a natural process.
- ★ Crows are referred as our ancestors. What about other birds? It is a general belief that feeding crows pacifies the departed soul. They are considered as the "messenger" between the worlds of the living and the dead. Poor crows must be blessing us for serving them food on moral grounds. They are ignorant that we humans have royally associated them with death rituals and the delicacies offered are not prepared keeping them in mind but in turn we incarnate them as our ancestors who take their form and relish home food.
- ★ Why do we refrain from, accepting money or prashad with our left hand? Why this abhorrence for the left hand? I fail to understand why the left hand is considered so inauspicious although it is very much an important part of our body. In fact, the most

## वात्रटिका

### चमत्कार

खिडकीवर ती पोपटाला रोज हरभरे ठेवायची,
तृप्त होऊन शीळ घालत स्वारी उडून जायची.
अचानक ती गेली, मुलाने केलं पिण्डदान,
कावळ्याऐवजी पोपटानेच येऊन खाल्लं पान.

**-डॉ. सुमन नवलकर**

vital organ — the heart — is also on the left side! Is it fair to discriminate our own body part? For years together, the world has applauded when Allan Border, Yuvraj Singh and Brian Lara hit fours and sixes with their left hands and won crucial matches.

★ In today's scientific world, there are tons of people who believe that eyelid twitching is a sign for something. Most of us try to find if the right or left eyelid twitch brings luck or misfortune. Eyelid twitches are common and can occur due to stress, lack of sleep and other lifestyle factors. To me with dedication and hard work success comes easily. Unbelievable eyelid twitches predict gain or loss.

★ Rain on the wedding day is considered sacred in some cultures. It’s said to bring fertility and wealth. I find it difficult to comprehend as to how can incessant rains be whole heartedly welcomed on the wedding day? With a downpour there will be a drop in the number of guest invited, the bride and groom if arranged an open air party will be highly disappointed showcasing damp clothes. Everything becomes a fiasco with the clouds bursting on the day of nuptials.

★ There are many false notions about scratching different areas of your body. If your right palm scratches you shall receive money if left then you lose money. Have you ever had occasions wherein money came in due to right palm itching? Feet itching have various beliefs attached varying from sorrow, to sign of getting new shoes or onset of a lovely journey. The itchy feet myth alters from culture to culture. Itchy nose indicates a curse or a sign of fight. God! Nose seems to be a very dangerous part. The followers of this myth get goose bumps the moment theres an itch.

There is a plethora of such illogical superstitions that distorts one’s mind set. It is a widespread social problem. People feel desperate to find reasons for all the misfortunes they come across. Thus, stress makes one superstitious and they hide their mistakes by blaming it on luck. It is hard to control all the circumstances in your life, but you can definitely control how you react to them and what you do about it. This is far more important than being lucky or unlucky. Everyone has ups and downs in life, it’s not always a piece of cake and trying situations are bound to arise, we need to accept them with a positive attitude and make a plan to improvise circumstances instead of thinking that superstitions or rituals can affect the outcome of your life.

Superstitious beliefs are irrational, deeply rooted in our minds and societies. Common sense plays a crucial role while taking tough decisions than depending on odd supernatural signs. Let reason govern your choices, not superstition. Superstitions are completely erroneous, it is proven that the positive power of mind and prayers can improve the probability of success in your life. Let’s all fill our life with positive approach and eradicate ridiculous superstitions that have no logical basis whatsoever.

How can superstitions dictate our life? With education, rational thinking and scientific attitude no doubt superstitious beliefs can lead a natural death. As adults it is our prime responsibility to make sure our future generation is away from blind faith.

Today we have learnt the scientific explanations for many natural events. But yet the educated modern man is not completely free from the shackles of fallacies.. How about you?

✳

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# If cricket is a religion, are the Pathare Prabhus atheists?

***✶ Rohan Talpade ✶***

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

"It is more difficult to get into Mumbai's Ranji team than to play for India." I remember my coach telling this to one of the emerging prospects of the cricket club I played for when he failed to overhaul the MCA U-19 trials.

Quite obviously with hundreds of clubs, thousands of professional cricketers and double the number of galli-cricketers, it becomes a mighty privilege to play for the most successful Indian Ranji side, Mumbai.

Evidently, Mumbai has produced many matchless cricketers who've gone onto become world beaters. The Gavaskars and the Tendulkars have made the Maharashtrian community proud and prominent on the world map.

Narrowing down to my point, have you ever given a thought to a PP representing India? Wouldn't you love to see someone from the PPs take up the most followed sport in India and become a celebrated cricketer?

If you go by the new song - Har Galli mein Dhoni, we either fall short of the gallis or we don't have a Dhoni within ourselves. The Pathare Prabhu community has yielded a numerous artists and professionals in various fields then why not a cricketer?

Somewhere down my hazy memory, I can recollect when I went to watch my club play against the Pathare Prabhu Cricketers at the Prabhu Jolly in Azad Maidan, Churchgate. As a cricket and Pathare Prabhu fanatic, I travelled all the way to Azad to watch and hope my community's club topple the side I represented.

To inform the readers, it was a 'E' division Kanga League match on a Sunday. I met a few PP representatives who to my surprise, informed me that they had been hiring "professionals" to take part and represent the Pathare Prabhus in the league. Reasons for the same are best to known to them.

My club lost the toss and was asked to take the field by PP. The sad part was that, these so called PP "professionals" didn't seem professional enough to play cricket. My club side had a new ball pace bowler who could easily notch up the 125-130 km/hr mark but PP's opener did not bother to wear a helmet.

To head the frustration, the top order seemed like a frustrated bunch of street cricketers who came to a 'maidan' only to enjoy a Sunday. Most of them randomly slogged every third ball, eventually leading PP to bundle out for a score less than 100. My club's batsmen kept batting for the rest of the day to pocket a first innings victory without breaking a sweat. I felt a little humiliated at the end of it as a proud Pathare Prabhu.

My parents, grandparents and uncles have recited stories where they've watched and represented the Andheri XIs

or the Khar XIs across Pathare Prabhu tournaments. So why have we suddenly gone from insane to mundane?

It is either that we've become slothful to care about the Pathare Prabhu club or that we haven't been rightly informed. It is very demeaning to see the club float down the table in the league, which has manufactured legends like Tendulkar and Gavaskar in the past decades, after every season.

Houshy Kala and Social Samaj jointly took a great initiative by organizing a cricket tournament for us after a break of a few years. The results were clear - we discovered a bunch of young cricketers who displayed their exceptional skills. If they are backed with the right kind of support, I'm sure our community can make an inevitable mark on the cricket field too.

The Kanga league is played over a duration of two months only on weekends - majorly on Sundays where the fate of the game is decided in just 90 overs. If we can promote and channel a group of focused Pathare Prabhu cricketers, the club can improve and maybe one day produce a cricketer who will play for the national side.

It only requires the right investment of time and energy to bring about a change. Instead of just sitting back and criticizing, I hope we can dig into the matter and mint gold. Afterall, who wouldn't be pleased to give mother India another proud son!

✳

## हास्यचित्र



# चकित झालात?

टीव्हीवर अनेक जाहिराती दाखवल्या जातात. दर पाच मिनिटांनी चालू मालिकेत खंड पाडून रसभंग केला जातो. यातील अनेक जाहिराती बाष्कळ, बालीश आणि बिनडोक असतात. अशाच काही जाहिरातीवर हे व्यंगचित्रात्मक भाष्य.


**-नंदकुमार कृ. विजयकर**




नवीन साबणाच्या वडीने कपडे धुतल्यापासून कपड्यावर असे पांढरे पट्टे दिसायला लागले.




ती - अहो हे काय? लिंबं आणायला सांगितली होती.
तो - तो दुकानदार म्हणाला यात शंभर लिंबांची शक्ती आहे.



त्या दोघी सासू-सुना, ते चॉकलेट खाल्यावर खाली चौकात येऊन धिंगाणा घालतात.




पूर्वाश्रमीची सुप्रसिद्ध लोकप्रिय सिनेतारका.... सध्या नवऱ्याला पाणी पाजते.





ती नवीन टूथपेस्ट वापरल्यावर तो असाच खिडकीतून उडी मारतो आणि मग भर चौकात, आगगाडीच्या डब्यावर, रहदारीत बेभान नाचतो.




ती नवीन वॉशिंग पावडर आणल्यापासून तो सारखा चिखलात लोळत असतो.




कमाल आहे या लोकांची, घराला एकही कोपरा ठेवला नाही.




नवीन कॉनफिडन्स प्लस वापरायला लागल्यापासून.......

## लेख

# कन्या

**✶ शैलेश विजयकर ✶**

कन्या म्हणजे मुलगी, एक स्त्री. तिचा जन्म कुठे कोणापासून झाला? ही कोणाची बहीण, कोणाची मुलगी, कोणाची वहिनी, कोणाची आई तर कोणाची पत्नी. असे असतानादेखील एक स्त्री कोणाची आई होऊन देखील मुलाचं लग्न झाल्यावर येणाऱ्या सुनेला हुंड्यासाठी किंवा वंशाचा दिवा अर्थात् 'मुलगाच हवा' असा अट्टाहास का?'

या २१ व्या शतकात प्रत्येक स्त्री आपल्या परीने आपल्या क्षेत्रात उच्च पदावर विभूषीत झालेली आहे. जसे की सरोजिनी नायडू, कल्पना चावला, इंदिरा गांधी, मार्गारेट थॅचर, मदर टेरेसा इ. सर्वच स्त्रिया पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून घराचं कर्तेपद सांभाळत असताना, आपल्या क्षेत्रात कार्यरत असताना असं का? शाळेत परीक्षेत मुलांपेक्षा मुलीच पुढे असतात. मुली एअर फोर्स मध्ये (एअर फोर्स पायलट) कार्यरत आहेत, मग दोघांमध्ये एवढा भेद का?

रिओ ऑलिंपिक २०१६ चा इतिहास बघता, भारताला मेडल्स मिळवून देणारी आणि भारताचे नाव उज्ज्वल करणारी कुस्तीपटू साक्षी मलीक ही पहिलीच स्त्री तर, पी.व्ही.सिंधू बॅडमिंटनमध्ये नाव उज्ज्वल करताहेत.

त्यांनी भारताला मेडल आणून दिलं आणि त्यांना बीएमडब्ल्यू गाड्या भारतरत्न सचीन तेंडुलकरच्या हस्ते मिळाल्या. हा सगळा स्त्रीनं घडवलेला इतिहास पाहता आता तरी सासूंनी मुलगी नको असा अट्टाहास सोडून सुनेनं जन्म दिलेल्या बाळाचे स्वागत करून त्याला आपले करून त्यास स्वीकारावे.

'पहिली बेटी धनाची पेटी' ही म्हण विसरलात का?'

## हास्यचित्र



❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# कविता

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

## प्रेमाचा मनरेगा

**-सुहासिनी कीर्तिकर**

पांढऱ्या केसांची
ती पांढरपेशी
पायऱ्यांवर उभी
कम्पाऊंडच्या पाशी

अंधारला रस्ता समोर
शेजारी वहाते गटार
टाळत दिव्यांचा मार
तिथेच थांबली मोटार

आत तो अन ती
त्याचे हात तिच्याभवती
ती चंचल, लवलवती
हात 'हातोहात' सळसळती

'नको पाहू, नको पाहू' म्हणत
तिच्या नजरेने दिलाच की दगा
आपलं वय सांभाळत-विसरत
पाहू लागली अनिमिष त्या दोघा

''अरे, राजरोस दंगा
घुसळत अंगागा
कसला हा आचरट
प्रेमाचा 'मनरेगा'?''

म्हातारी कुरकुरली
तशातही थरथरली
पायांखालची
पांढरपेशी
पायरीही
बिथरली!

## प्रौढा

**-विजयश्री नवलकर**

केस पाहूनी पिकलेला बावरली ती प्रौढा
दर्पणी पाही पुन्हा पुन्हा जीव जाहला वेडा।।
तारुण्य सरले ते स्वप्न विरले संसाराचे
जाहले मन दु:खित तिचे आले विचार साचे।।
कैसा गेला माझा काल वीस वर्षांपूर्वी
नको स्मृति मुळी त्याची जीवा या दुर्दैवी।।
सापडले प्रेमात एका तरुणाच्या सुंदर
झाले वेडे माझे मन भेटाया आतूर।।
''सुधीर नाव त्याचे आई करूं का? पाणीग्रहण''
विचारता असला प्रश्न वाटे समीप ये मरण।।
नाही आपुल्या जातीचा ज्ञात नसे का तुजला?
कशास पुससी तूं मज बाळे प्रश्नच असला।।
हृदयी बसता हा घाव, वाहे प्रीतीची जखम
सत्वरी राया रे त्यजीले भावनांना कायम।।
अखेरचा निरोप घेता निराश झाले मन
संयमाचा घालूनि बांध घरी आले परतुन
आई गेलीस तू निरोप घेऊनी जगताचा
आला मज कंटाळा एकल्या या जीवनाचा।।
तारुण्याचे ''फुलपाखरु'' उडून गेले त्वरी
प्रौढपणाचा सहारा जणू तळपे माझ्या शिरी।।
संसार झाला आई तुझा अन् लेकरांचा
वगळले गेले मी, घाला अन्यायाचा?।।
रोज शिकविते विद्यार्थ्यांना न्यायाने वागा
परि असल्या अन्यायाला काय करू सांगा

## बुद्धिबळ

**- सौ. उज्ज्वल र. ब्रम्हांडकर**

बुद्धिबळाचा डाव मांडिला
शिवशक्तीने भुवनपटी
नशिबांचे ते नियम करुनी
केली मानव सोंगटी।। धृ.।।
त्यात असती अनेक राजे,
वजीर आणि राण्या
हत्ती, उंट अन् घोडा, प्यादे
सर्व विविध कहाण्या
ठरवुनी दिल्या प्रत्येकाला
काही ठराविक अटी।।१।।
करार मदार नी बंधन नियमही
यांचा एकच ताल
सरळ सरळ ती फारच असते
फक्त हत्तीची चाल
उंटाला पण सांगत राही
तिरका चाली पटीं।।२।।
घोडा पटकन उडी मारतो
फक्त अडीच घरे
आणि थांबतो तिकडेच तसा
म्हणता पुरे पुरे
वजीर आपला कसाही जातो
प्याद्याला आपटी।।३।।
खेळाडूही तेच असती
अन् प्रेक्षकही तेच
खेळात म्हणूनी येत नाहीत
बंध कोणतेच
मुक्तपणाने स्वैरपणाने
खेळ चालला तटीं।।४।।
नियमाचे कारण कधीही
विचारायचे नाही
कारण असे विचारणे मुळी
नियमातचि नाही
प्रत्येकाचे नियम वेगळे
तरीही सांचे उरती।।५।।
कोणत्याच राजाला कधीही
शह बसत नाही
बुद्धिबळाचा डाव कधीही
संपतचि नाही
खेळ चालला अव्याहत तो
तुमच्या अमुच्या साठी।।६।।

✳

## कामना

**नेहा दळवी**

सागर प्रीतीचा अथांग
मनात उठती लाख तरंग .....

तुझ्या सवे होते रंग
करुनि मज जे गेले दंग......

प्रणयाचे हे ठसे मनावर
चैतन्याला कसला आवर .....

ओढ तुझी ही एक अनावर
खिन्न मनाला कैचा सावर ?

गूढ असे एक गुपित होते
लल्लाटी, पण, जे लिखित होते...

जीवनात ना काहीच उरले
होते जे ते सर्वच सरले....

मिळाले मजला काही किंचित
तुझ्या सवे ते क्षण अलौकिक...

चहूओर आता एकच भास
तुझेच स्पर्श, तुझा सुवास !!

✳

## हेच कळे की

-विजयश्री नवलकर

असाच वारा मंद वाहवा
असेच पक्षी गात रहावे
मीलनाचे तुझ्या नि माझ्या
क्षण मोलाचे असेच यावे
असाच सूर श्रवणी यावा
अशीच गीते घुमत असावी
तुझ्या नि माझ्या संगतीची
अशीच जीवा आस रहावी
हेच कळे की सुगंध घेऊनी
अशीच सांज सकाळ यावी
तुझ्या नि माझ्या जीवनाची
सुंदर एक कथा बनावी

*

## सय

-सुहासिनी कीर्तिकर

आभाळ आले ओथंबून
बांधाशी जरा थांबून.... थांबून
थेंबांचा पारा लकाकला
पानाप्राणात विसावला
ओलेत्याने दंगून झिंगून
पिसाटले वादळ भिंगून.... भिंगून
फांद्यांनी घातला पिंगाच पिंगा
श्वासांनी केला हिरवा दंगा
पानांच्या टाळ्या
झुलती लय
मनात पालवी
फुलांची सय

*

## सखी

-हेमंत विनायकराव तळपदे

सखी आज तव प्रियतमेस
वाहतो ही भावनांची कुसुमांजली
गतकालच्या प्रवाहास वाहिलेल्या
त्या आठवणींची शिदोरी रसीली.

यौवनीच्या सुकोमल क्षणांना
मी आनंदाने अनुभवले.
परि मनी कोपरा एक रिता
स्थान तुझे त्यात जपले.

आलीस भार्या म्हणूनी तू
जीवनपर्व नवे सुरू झाले
काळाच्या प्रत्येक विषमतेवर
मात करुनी तू जिंकलेस.

कोण म्हणती तव चतुर
कोण दर्शविती माफक चुका
परि जाणतो मी मनी माझ्या
तव ह्रदयीच्या त्या संवेदना.

सरळसाधे जीवन जगलो
कृतार्थ झालो या जगी
तृप्त तुझा हा सहवास लाभता
झालो खरोखर संसारी सुखी.

आज माझा पतीधर्म सांगतो
मोल तुझे मी खरे उमजणे
साथ तुझी निरंतर लाभो मजला
प्राथितो विधात्यास हे मागणे

*

# प्रभु तरुण भाऊबीज

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती सुहासिनी सुहास कोठारे | १००१ |
| २. | श्री. विजय ग. प्रधानकडून सौ. सुनेत्रा विजय प्रधान स्मरणार्थ, | १००० |
| ३. | सौ. हर्षा निलेश कोठारे | ५०१ |
| ४. | सौ. प्रतिमा विनोद प्रधान | ५०० |
| ५. | सौ. नीता दिपक विजयकर | ५०० |
| ६. | सौ. मयुरा गुंजारव नायक | ५०० |
| ७. | सौ. रीटा मंदार नायक | ५०० |
| ८. | श्रीमती माधुरी विहंग नायक | ५०० |
| ९. | श्री. विहान श्रीनल कोठारे | २५१ |
| १०. | सौ. ज्योत्स्ना रामकृष्ण तळपदे | २५१ |
| ११. | सौ. कल्पना सुभाष कोठारे | २५१ |
| १२. | डॉ. सौ. सुमन सुवर्णकुमार नवलकर | २५० |
| १३. | सौ. सुरेखा प्रदीप कोठारे | २५० |
| १४. | सौ. धनश्री विनेश तळपदे | २५० |
| १५. | श्रीमती यशोदिनी यदुवीर राणे | २०१ |
| १६. | सौ. निलन दिपक धैर्यवान | १५० |
| १७. | सौ. आशा जयबाल विजयकर | १५० |
| १८. | सौ. शोभा रंजन विजयकर | १०२ |
| १९. | श्रीमती उर्मिला विजय धैर्यवान | १०१ |
| २०. | प्रा. सुहासिनी अशोक कीर्तिकर | १०१ |
| २१. | सौ. अनुराधा सीमित देसाई | १०१ |
| २२. | सौ. वैजयंती जयेश सक्सेना | १०१ |
| २३. | सौ. सुहास नंदकुमार विजयकर | १०१ |
| २४. | सौ. अश्विनी दिप विजयकर | १०१ |
| २५. | सौ. जयश्री राजशेखर राणे | १०१ |

# प्रभु तरुण भाऊबीज

| | | |
|---|---|---|
| २६. | सौ. सुजाता दिवाकर कोठारे | १०१ |
| २७. | सौ. मेघना विवेक विजयकर | १०१ |
| २८. | सौ. श्रुता आनंद तळपदे | १०१ |
| २९. | सौ. आश्विनी यश तळपदे | १०१ |
| ३०. | डॉ. सौ. सुरेखा बन्सी धुरंधर | १०० |
| ३१. | सौ. नंदा दिपक नवलकर | १०० |
| ३२. | श्रीमती यशाली दिपक नवलकर | १०० |
| ३३. | श्रीमती श्रिया दिपक नवलकर | १०० |
| ३४. | सौ. मेनका जयपाल तळपदे | १०० |
| ३५. | श्रीमती शिल्पा रसिक तळपदे | १०० |
| ३६. | सौ. रोनिका सचिन विजयकर | १०० |
| ३७. | सौ. भारती रसिक विजयकर | १०० |
| ३८. | सौ. भावना मोनित विजयकर | १०० |
| ३९. | श्रीमती लुवीना समित विजयकर | १०० |
| ४०. | सौ. कुंदा प्रताप वेलकर | १०० |
| ४१. | सौ. ऐश्वर्या तेज वेलकर | १०० |
| ४२. | सौ. पूजा मंदार कोठारे | १०० |
| ४३. | श्रीमती मिनल विजय कोठारे | १०० |
| ४४. | सौ. मिनल हेमंत जयकर | १०० |
| ४५. | सौ. रश्मी प्रमोद जयकर | १०० |
| ४६. | सौ. श्रुतिका विपुल जयकर | १०० |
| ४७. | श्रीमती वृंदा शाम जयकर | १०० |
| ४८. | सौ. निकेता प्रशांत राणे | १०० |
| ४९. | सौ. ऐशाना अलोक प्रधान | १०० |



## प्रभुतरुणास देणगी

श्री. निनाद अरूण रणजीत यांजकडून आजीव सदस्यत्व रु. ५००/-

### ज्ञातीवृत्त

दिनांक १८/९/२०१६ रोजी परळ येथील दामोदर सभागृहात सौ. जयश्री टी. यांच्या अध्यक्षतेखाली पाठारे प्रभु महिला समाजाचा १०२ वा वर्धापनदिन साजरा झाला. या समारंभाचे सविस्तर वृत्त पुढील अंकी. महिला समाजाला शुभेच्छा.

## परीक्षेतील सुयश

**एस्.एस्.सी.**

कु. वरदा राहुल नायक ९४ टक्के

**एम्. कॉम. (पार्ट वन)**

कु. विनिता महेश कमलाकांत कोठारे ६८ टक्के

✳

## प्रभुतरुणाची डायरी

**मरण**

| | | | |
|---|---|---|---|
| १६-९-१६ | सौ. माधुरी कोतवाल, (पूर्वाश्रमीच्या माधुरी नायक) | वय ७९, | केम्स कॉर्नर |
| १८-९-१६ | श्री. मोहन विश्वनाथ कोठारे, | वय ७५, | इर्ला-विलेपार्ले |
| २९-९-१६ | श्रीमती सुधा शरद दळवी, | वय ७७, | गोरेगाव |
| ०१-१०-१६ | श्रीमती शीला मुकुंद कोठारे, | वय ९१, | बोरीवली |
| ०३-१०-१६ | श्रीमती मृणाल विजय धुरंधर | वय ८० | मुगभाट, ठाकुरद्वार |


*Best Compliments*

*from*

✷

Mr. Waseem Khan

*Best Compliments*

*from*

Mrs. Sonal Bhatia

**Sonal Aggarwal and Associates**



**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र**

स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह अँड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०० ०१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०० १०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : २६७८ ०० ४४